# तृतीय वर्ष कला

## सत्र - V (CBCS)

## अभ्यासपत्रिका – V
## राजकीय विचार
# पाश्चिमात्य राजकीय विचार

## विषय कोड : 97051

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. सुहास पेडणेकर**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविन्द्र कुलकर्णी**
प्रभारी कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर बनकर**
**सहयोगी प्राध्यापक**
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक** : **डॉ.भगवान लोखंडे**
सहयोगी प्राध्यापक
डी.जी.तटकरे कला आणि वाणिज्य महाविद्यालय
तळा जि-रायगड.

**लेखक** : **प्रा. निलेश पाटील**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग, गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी

**डॉ. श्रीकांत देविदास महादाने**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग
डॉ. पतंगराव कदम कला आणि वाणिज्य महाविद्यालय, पेण

: **प्रा. सागर कांबळे**
सहायक प्राध्यापक
सर परशुरामभाऊ कॉलेज टिळक रोड पुणे

: **डॉ. सत्यपाल कांबळे**
सहायक प्राध्यापक
विवेकानंद कला सरदार दिलीपसिंग वाणिज्य विज्ञान
महाविद्यालय औरंगाबाद

**जून २०२२, मुद्रण - १**

**प्रकाशक**
**संचालक, दूर आणि मुक्त अध्ययन संस्था.**
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
**मुंबई विद्यापीठ मुद्रणालय**
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १ | आधुनिक राज्य | १ |
| २ | स्वातंत्र्य आणि न्याय | २१ |
| ३ | क्रांती आणि धुरिणत्व | ४७ |
| ४ | स्त्रीवाद आणि बहुसंस्कृतिवाद | ५४ |

तृतीय वर्ष कला

सत्र - V (CBCS)

अभ्यासपत्रिका – V

राजकीय विचार

# पश्चीमात्य राजकीय विचार

## अभ्यासक्रम

**Module 1: Modern State**
1.1 Niccolo Machiavelli [1469-1527]
1.2 John Locke [1632-1704]

**Module 2: Liberty and Justice**
2.1 John Stuart Mill [1806-1878]
2.2 John Rawls [1921-2002]

**Module 3: Revolution and Hegemony**
3.1 Karl Marx [1818-1883]
3.2 Antonio Gramsci [1891-1937]

**Module 4: Feminism and Multiculturalism**
4.1 Simone de Beauvoir [1908-1986]
4.2 Will Kymlicka [1962-till date]

# १

# आधुनिक राज्य

**घटक रचना**

१.१ उद्दिष्ट
१.२. प्रस्तावना
१.३ निकोलो मॅकियावेली
१.४ जॉन लॉक
१.५ विद्यापीठीय प्रश्न

## १.१ उद्दिष्ट

१) आधुनिक काळातील सुधारणावादी राजकीय विचार प्रवाहाची ओळख करून देणे.

२) मॅकियावेलीचे राजकीय विचार, राजाला केलेला उपदेश, राज्यनिर्मिती बाबतचे विचार समजून घेणे.

३) राज्यनिर्मितीसंबंधी जॉन लॉकचा सामाजिक करार सिद्धांत, राज्याची कार्ये, आधुनिक लोकशाहीची पायाभरणी कशी झाली आहे ते समजून घेणे.

## १.२. प्रस्तावना :

रोमन साम्राज्याच्या अस्तानंतर सरंजामशाहीचा अस्त होऊन आधुनिक राष्ट्र-राज्ये निर्माण झाली. आधुनिक राजकीय विचारप्रवाहांचा जगात प्रचार-प्रसार झाला. राज्यसत्तेवरील धर्मसत्तेचे श्रेष्ठत्व नाहीसे होऊन बुद्धिवाद, मानवतावाद, वास्तववाद या त्रयींवर आधारित आधुनिक जीवन जगण्याचा विचार मानव करू लागला. राजकीय क्षेत्रही त्यापासून अलिप्त राहिले नाही. मॅकियावेलीने आपल्या राजकीय विचारांतून राजनीतीचे धर्म आणि नीतिमत्तेपासून अलगीकरण करून राज्यसत्तेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. म्हणून त्याला आधुनिक राज्यशास्त्राचा जनक म्हटले जाते.

१७ व्या शतकात हॉब्ज, लॉक आणि रुसो या विचारवंतानी राज्यनिर्मितीबाबतचा सामाजिक करार सिद्धांत मांडून राज्याची निर्मिती करारातून झाली असल्याचे सांगितले. करारावादी विचारवंतानी राज्याच्या ईश्वरी वरदान सिद्धांताचे खंडन करून राज्य संस्था ही मानवनिर्मित असल्याचे सांगितले. या तिन्ही विचारवंतांच्या विचारांमध्ये भेद असले तरी त्यांच्या राजकीय विचारांचा राजकीय परिणाम आधुनिक काळातील लोकशाही विकसीत होण्यात झाला हे विशेष. प्रस्तुत प्रकरणात आपण जॉन लॉकचा सामाजिक करार सिद्धांत, त्याचे नैसर्गिक हक्कांबाबतचा विचार, प्रतिकाराचा हक्क याविषयी आपण अभ्यासणार आहोत.

## १.३ निकोलो मॅकियावेली

जन्म ३ मे, १४६९ मृत्यू २० जून, १५२७

मॅकियावेली हा आधुनिक युरोपातील राजकीय विचारांचा प्रणेता होता. तो सांस्कृतिक पुंरुजीव्‍नाचा प्रणेता, धर्मातीत राजसत्तेचा पुरस्कर्ता आणि राष्ट्रवादाचा प्रवक्ता आहे. अरिस्टॉटलनंतर राज्य शास्त्राची शास्त्रीय स्वरुपात मांडणी करण्याचे श्रेय त्याला दिले जाते. इतिहासात घडलेल्या घटनांचा आधार आणि धडा घेऊन त्यांचा वर्तमानातील राजकीय व्यवहारासाठी उपयोग त्याने करून घेतला. मानवी स्वभावाला केंद्रबिंदू मानून आपले राजकीय विचार मांडले. आदर्श चिंतन आणि स्वप्नरंजनावर भर देण्यापेक्षा त्याने वास्तवावर अधिक भर दिलेला दिसतो. राजकीय जीवनाची चिकित्सक मांडणी त्याने केलेली आहे. त्याचे राजकीय विचार हे प्रत्यक्ष संघर्ष आणि अनुभवातून साकारलेले दिसतात. नैतिक भावनेला प्राधान्य देऊन केलेल्या बौद्धिक मीमांसेच्या स्वरूपातील प्राचीन राज्यशास्त्र आणि धर्माला केंद्रस्थानी ठेवून मांडणी करणारे मध्ययुगीन राज्यशास्त्र यापेक्षा आधुनिक राजकीय वास्तवाशी जुळणारे नवे राज्यशास्त्र निर्माण करण्याचे श्रेय त्याला दिले जाते आणि म्हणून त्याला ‘आधुनिक राज्यशास्त्राचा जनक’ असे म्हटले जाते.

### १.३.१ विचारांवरील प्रभाव

१) तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव

२) डेनिंगच्या मते, **मॅकियावेली** हा सर्वार्थाने काळाचा अपत्य आहे

३) इटलीची दुरावस्था : इटलीचे एकक एकीकरण करणे, ते राष्ट्र समर्थ व्हावे, त्या राष्ट्राचे कल्याण व्हावे त्याचे साध्य होतं आणि या साध्या भोवतीस त्याचे राजकीय विचार फिरत राहतात.

### १.३.२ ग्रंथसंपदा

**मॅकियावेली**ने राजकीय विचारांची व्यवस्थित मांडणी एका ग्रंथात केलेली नाही. खालील ग्रंथातून त्याच्या राजकीय विचारांचे दर्शन घडते.

१) द प्रिन्स

२) द आर्ट ऑफ वार

३) द डिस्कोर्सेस

४) हिस्टरी ऑफ फ्लॉरेन्स

**१.३.३ अध्ययन पद्धती** : मॅकियावेलीची अध्ययन पद्धती ही प्राचीन आणि मध्ययुगीन राजकीय विचारवंतांच्या तुलनेत भिन्न आहे. धर्मसत्ता व राज्यसत्ता यांच्यातील आंतरसंबंध, एकमेकांच्या क्षेत्रात दोघांच्या प्रमुखांना हस्तक्षेप करण्याचा अधिकार, दोघांचे अधिकार क्षेत्र, एकमेकांशी श्रेष्ठ - कनिष्ठत्त्वाच्या समर्थनार्थ केले जाणारे युक्तिवाद इ. सेंट ऑस्टिन, थॉमस अक्वीनान्स या विचारवंतांच्या राजकीय चिंतनात या विषयांना प्राधान्य मिळालेले दिसते.

राजकीय विचारांच्या क्षेत्रांमध्ये त्याने पुढचे पाऊल टाकलेले आहे. त्याचे सर्व श्रेय त्याच्या 'द प्रिन्स' या ग्रंथाला जाते. राज्यशास्त्राचा अभ्यास करण्याची ऐतिहासिक पद्धती सर्वोत्तम असल्याचे मत त्याने मांडले. मानवी इच्छा, स्वभाव कोणत्याही काळामध्ये सारखे असतात त्यामुळे त्याला पडणारे प्रश्नही सारखेच असतात म्हणून माणसाने आपल्या प्रश्नांसाठी पूर्वीचे उत्तर लागू करणे आणि जुने वर्तन प्रकार पुन्हा आचरणात आणणे स्वाभाविक ठरते. सतत आढळणाऱ्या वर्तन चौकटीच्या आधारावरच कोणत्याही सामाजिक शास्त्राची उभारणी केली जाऊ शकते. आजच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी कालच्या घडामोडींचा अभ्यास उपयुक्त ठरतो, तर भविष्यातील अंदाज वर्तवण्यामध्येही त्याचा आधारे सहज शक्य होते. त्याने समकालीन परिस्थितीशी साधर्म्य असणारे प्रसंग प्राचीन ग्रीक व रोमन इतिहासातून शोधून काढले. रोमन साम्राज्याचा प्रभाव त्याच्या विचारांवर पडलेला होता; परंतु इतिहासाचा त्याने साधन म्हणून वापर केला.

**१.३.४. मानवी स्वभावाबद्दलचे विचार :** त्याच्या सर्व राजकीय विचारांचे मूळ हे त्याचा मानवी स्वभावाचा सिद्धांत आहे. मानवी स्वभावाविषयी त्याचे विचार 'द प्रिन्स' आणि 'द डिस्कोर्सेस' या ग्रंथात मांडलेले आहे.

त्याच्या मते, मनुष्य हा अत्यंत स्वार्थी, दृष्ट प्राणी आहे. त्याची सर्व सामाजिक आणि राजकीय कृत्य ही स्वार्थप्रेरित असतात. मनुष्य हा कृतघ्न. दांभिक. भित्रा. लोभी असतो. जोपर्यंत स्वार्थ सिद्ध होईपर्यंत, त्याचे कल्याण साधले जाते तोपर्यंतच तो तुमचा असतो. त्यानंतर मनुष्य काहीही करायला तयार असतो. परंतु आपले ध्येय साध्य झाले की तो आपली वृत्ती बदलतो. स्वार्थ कसा जपावा याचे शिक्षण त्याला समाजातच मिळते आणि म्हणून त्याला समाज आणि राज्याची गरज असते. म्हणून तो राजाला सांगतो की राजाने प्रेमापेक्षा भीतीचा वापर करावा. अशा माणसांचे प्रेम मिळवण्यापेक्षा त्याच्या मनावर भीती बसविण्याचा प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे माणसेही दुबळी. अज्ञानी. दृष्ट असतात राजाने लोकांच्या दोषाचा अचूक फायदा करून घ्यावा. मनुष्य हा लोभी, संपत्तीचा भोक्ता असतो. तो कायम असमाधानी असतो. आपल्या इच्छा आणि आकांक्षांची पूर्तता करण्यासाठी तो कायम प्रयत्नशील असतो. आत्मसंरक्षणाची भावना ही सातत्याने त्याला प्रेरणा देत असते आणि यातूनच त्याची संपत्ती बाळगण्याची वासना जन्म घेते. प्रिन्समध्ये तो म्हणतो की व्यक्ती आपल्या वडिलांचे मरण विसरू शकते; परंतु आपल्या संपत्तीचे अपहरण करणाऱ्या व्यक्तीला ती कधीही विसरू शकत नाही. डीस्कोर्सेस मध्ये सुद्धा त्याने मानवी स्वभावाचे विवेचन केले आहे. मनुष्यप्राणी केवळ भौतिक स्वार्थपोटी विचार करतो किंवा प्रेरित होतो. या ग्रंथात त्याने राजेशाही ऐवजी गणराज्य शासन पद्धतीचे समर्थन केलेले आहे. कारण हे शासन जास्तीत जास्त लोकांना भौतिक भरभराटीची संधी देते. राजेशाहीमध्ये मात्र सर्व लाभ राजाच घेण्याचा प्रयत्न करतो. मॅकियावेलीच्या मते, भौतिक भरभराट हा एकमेव विचार लोकांच्या मनात पायाभूत असतो. थोडक्यात, मानवी स्वभाव हा अपरिवर्तनीय, जगात सर्वकाळ, सर्वत्र सारखाच असतो, असे विचार त्याने मांडलेले आहेत. थोडक्यात त्याने माणसाच्या केवळ नकारात्मक बाजूवर भर दिलेला असून, चांगल्या बाबींकडे दुर्लक्ष केले आहेत.

**१.३.५.राजनीतीचे धर्म आणि नीतिमत्तेपासून अलगीकरण** :

मॅकियावेलीच्या राजकीय विचारांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याने राजनीतीचे धर्म आणि नीतिमत्तेपासून केलेले अलगीकरण होय. राज्यशास्त्राचा नीतिशास्त्र व धर्मशास्त्र यांच्या प्रभावापासून मुक्त आणि स्वतंत्र विचार सर्वप्रथम त्यानेच केलेला आहे. राज्यशास्त्राला स्वतंत्र सामाजिक शास्त्र म्हणून विकसित करण्याचे श्रेय अरिस्टॉटलला जाते; पण तो सुद्धा 'चांगले जीवन' हे राज्यसंस्था टिकून राहण्याचे प्रयोजन समजतो. मात्र मॅकियावेली राज्यसत्ता हेच साध्य असून, राजकीय सत्तेची प्रतिष्ठापना आणि विस्तार करणे हे मुख्य साध्य आहे असे समजतो. त्यासाठी सार- असार, नैतिक- अनैतिक, चांगले-वाईट, धार्मिक- अधार्मिक कृत्य राजाला करावे लागले तरी काही हरकत नाही, असे तो म्हणतो. मॅकियावेली म्हणतो राजाने धार्मिक नियमांना महत्त्व देऊ नये. धर्माचे आचरण करणे. शुद्ध नैतिक नियमांचे पालन करणे हे राजाच्या बाबतीत प्रशंसनीय असले तरी जो राजा नियमांना महत्त्व देत नाही तो राजा यशस्वी होतो. त्यामुळे राजाने धर्मदयाळू असल्याचे नाटक करावे; परंतु गरज भासल्यास सत्ता टिकवण्यासाठी कोणत्याही गैरमार्गांचा अवलंब करण्यास मागे पुढे पाहू नये.

धर्माबद्दल बोलताना तो असे म्हणतो की, धर्म आणि धार्मिक विचारांमुळे माणसे दुर्बल बनतात आणि दृष्ट व्यक्तींच्या कटकारस्थानांना बळी पडतात. धर्माचा वापर लोकांना फसवण्यासाठी केला जातो. तत्कालीन इटलीची दुरावस्था धर्मामुळे झाली असल्यामुळे धर्माला त्याचा विरोध होता. धर्मसत्ता ही राज्यसत्तेपासून स्वतंत्र आणि राज्यसत्तेपेक्षा श्रेष्ठ असता कामा नये, असे त्याचे मत होते. आवश्यकता भासल्यास राज्यकर्त्यांनी धर्मविरोधी आचरण करावे, असे तो म्हणतो. तो धर्मविरोधी असला तरी धर्म ही एक उपयुक्त बाब असल्याचे तो सांगतो. धर्माच्या भीतीमुळे लोक राजाच्या आज्ञांचे पालन करतात. धार्मिक नियमांचे पालन करण्यातून गणराज्य महान होतात. या नियमांचा भंग केल्यास राज्य लोप पावू शकते. शासन कोणत्याही प्रकारचे असो राज्यांमध्ये धार्मिक विधी, रुढी-परंपरांना स्थान असले पाहिजे. एक वेळ लोक राज्याच्या आज्ञांचे उल्लंघन करू शकतात; परंतु धर्माज्ञा मोडण्याचे साहस ते करू शकत नाही. त्यामुळे कायदे बनवणारे नेहमीच आपले कार्य हे ईश्वराचे असल्याचे भासवितात. म्हणून अशक्य वाटणाऱ्या गोष्टी या धर्माच्या आधारेच साध्य होऊ शकतात. त्याच्या राजकीय विचारांचा केंद्रबिंदू हा राज्याची सुरक्षितता आणि त्याचे अस्तित्व टिकून राहणे हा होता आणि म्हणून राजाने आदर्शपेक्षा वास्तवाला महत्त्व देऊन, परिस्थितीला अनुसरून कार्य केले पाहिजे, असे तो म्हणतो. राज्याचा राज्यकारभार हा नीतिनिरपेक्ष असावा. व्यक्ती हितापेक्षा राज्यहिताला प्राधान्य द्यावे. थोडक्यात, सत्ताप्राप्तीसाठी कोणताही मार्ग समर्थनीय आणि योग्य ठरतो, असे तो म्हणतो.

**१.३.६.राज्यनिर्मिती बद्दलचे विचार** : मॅकियावेलीच्या राजकीय विचारात मानवी स्वभावाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे असून, त्या अनुषंगाने त्याने आपले राजकीय विचार मांडले आहेत. त्याच्या मते, राज्यनिर्मितीच्या मुळाशी सुद्धा माणसाची स्वार्थबुद्धी असते. स्वार्थ जपण्याचे शिक्षणही त्याला समाजात मिळते आणि म्हणून व्यक्तीला समाज आणि राज्य या संस्थांची गरज भासते. व्यक्ती हा स्वभावत: सत्तापूजक असतो. त्यामुळे स्वतःची आणि राज्याची सत्ता वाढवण्याची त्याची मुख्य इच्छा आणि आकांक्षा असते. व्यक्तीला समाजशील बनविण्याचे कार्य राज्यसंस्था करते. त्याला समाजामध्ये सुरक्षितता आणि स्वास्थ्य हे राज्यामुळे लाभते. मॅकियावेलीच्या मते कीर्ती ही गुणांवर अवलंबून असते. गुण म्हणजेच शौर्य

होय. त्याच्या मते युद्धामध्ये विजयी होणारा पुरुष हा शूर होय. युद्धात विजयी होण्यासाठी दूरदृष्टी, शौर्य, शिस्त, निश्चय, साहस आणि ध्येयाची स्पष्ट कल्पना इत्यादी गुण आवश्यक असतात. मॅकियावेलीच्या मते राज्य ही एक विवेकयुक्त संघटना आहे.

**राज्याची कार्ये :**

- संपत्ती व प्रजेचे संरक्षण करणे
- बाहेरील शत्रूंपासून समाजाचे संरक्षण
- जनतेची आर्थिक भरभराट होईल अशी परिस्थिती निर्माण करणे.
- संपत्तीमान, चैनी- ऐशारामी लोक राज्यात निर्माण होणार नाही याची काळजी घेणे.
- नागरिकांच्या कला -कौशल्याचा योग्य वापर
- पात्रतेप्रमाणे दर्जा देणे
- गुणी माणसांचा राज्यासाठी उपयोग करून घेणे.

मॅकियावेली हा कायद्याच्या राज्याचा पुरस्कार करतो. कायद्यासमोर कोणताही भेदभाव करता कामा नये. सर्वांना राजाने समानतेने वागवावे. तसेच कायद्यामध्ये सत्ताधाऱ्यांचा हस्तक्षेप त्याला मान्य नाही. जनतेच्या अडीअडचणी वेळोवेळी नष्ट करणे हे कायद्याचे मुख्य प्रयोजन आहे. नागरिकांच्या सर्व सद्गुणांचा मूलश्रोत म्हणजे कायदा होय. नागरिकांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी अचूक आणि काटेकोरपणे झाली पाहिजे. नागरिकांचा समान हित साधणारा कायदा नागरिकाला योग्य वर्तनाचे प्रशिक्षण देत असतो. त्यामुळे नागरिकांच्या मनात अधिसत्तेविषयी आदर निर्माण होतो. कायद्यासंबंधी ईश्वरी कायदा आणि नैसर्गिक कायदा सिद्धांताला त्याने विरोध केला आहे. त्याच्या मते कायदा हा मानवनिर्मित असून, तो राज्याकडून व्यक्तीचे वर्तन नियंत्रित करण्याचे मुख्य साधन आहे. सत्तासामर्थ्य, पराक्रम या गोष्टी राज्यासाठी आवश्यक असल्या तरी केवळ भीतीच्या बळावर राज्य टिकू शकणार नाही. त्यासाठी कायद्याचे अधिष्ठान असणे आवश्यक असते. मानवी वर्तनाचे नियमन. नैतिक गुणांचा परिपोष आणि चारित्र्य निर्मितीचे कार्य हे कायद्यामुळे घडते. थोडक्यात, कायदा हा ईश्वराने आणि निसर्गाने निर्माण केलेला नसून तो मानवनिर्मित आहे असे तो म्हणतो.

त्याच्या मते, राज्य चालवण्याची कला आणि सैनिकी कला यामध्ये साम्य आहे. गुप्त निर्णयपद्धती, परिस्थितीची जाणीव, प्रसंगधावनता, त्वरित निर्णय घेण्याची क्षमता, आश्चर्यकारक हालचाली, प्रजाजनांच्या अपेक्षांना दिलेला चकवा या गोष्टी सैनिकीकलेइतक्या राज्य चालवण्यासाठीसुद्धा महत्त्वाच्या असतात. कटकारस्थानामुळे राज्याची सुरक्षा धोक्यात येऊ शकते आणि म्हणून राज्याने कटप्रतिबंधक यंत्रणा सज्ज ठेवली पाहिजे. थोडक्यात, सैनिकी नेतृत्व आणि राजकीय नेतृत्व या दोघांसाठी लागणारे गुण एकाच प्रकारचे असतात

**राज्याचा विस्तार :**

निरंतर सत्ता टिकवणे हे राज्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. प्रत्येक मानवी व्यवहार गतिमान असतो. प्रगती आणि अधोगतीच्या दिशेनेच त्याची वाटचाल सुरू असते. राज्यसंस्थाही त्याला अपवाद नाही. कारण राज्यसंस्था ही मानवनिर्मित संस्था आहे. राज्याच्या विस्ताराबाबत तो 'द प्रिन्स' मध्ये राजेशाही शासन तर 'द डिस्कोर्सेस' मध्ये गणराज्य शासनाबद्दल आपले विचार मांडतो. राज्याने अधिराज्य कसे मिळवावे? ते कसे टिकवावे आणि वाढवावे हा 'द प्रिन्स' या ग्रंथाचा मुख्य विषय आहे.

त्याच्या मते, सदभाग्याने मिळालेल्या राज्यांपेक्षा स्वगुण, कर्तृत्वाच्या जोरावर मिळवलेली राज्य अधिक सुस्थिर आणि टिकाऊ असतात. राज्य प्राप्तीनंतर राजाच्या मनात आपली सत्ता निरंतर टिकवण्यासाठी आणि तिचा विस्तार करण्याची महत्वाकांक्षा निर्माण झाली पाहिजे. त्यासाठी राजाने स्वतःच्या वंशाच्या लोकांचे प्रदेश पादाक्रांत करावे. तसेच एकाच बोलीभाषा असलेले प्रदेश नियंत्रणाखाली ठेवणे सोपे जाते. नवीन जिंकलेल्या प्रदेशातील जुन्या राज्यकर्त्यांचा वंश विच्छेद करावा. परंतु राजकीय संस्था तशाच ठेवाव्यात. ज्या प्रदेशात भिन्न भिन्न भाषा बोलल्या जातात, तेथील राजकीय संस्थांचे स्वरूप भिन्न असते. तेथे नियंत्रण ठेवणे कठिण जाते. परंतु गणराज्य शासन असलेला प्रदेश राजाने जिंकला असता तेथील लोकांना आपल्या जुन्या आठवणी कायम प्रेरणा देत असतात, अशा वेळी राजाने संपूर्ण समाज उध्वस्त करून टाकावा. त्या ठिकाणी नवी राज्यव्यवस्था निर्माण करावी. ती व्यवस्था टिकविण्यासाठी राजाने अनुनयाच्या धोरणाचा अवलंब करावा. तो यशस्वी झाला नाही तर बळाचा वापर करावा. त्यासाठी सुसंबद्ध, संघटित, लढाऊ सैन्य असणे आवश्यक असते. ते सतत राजाने संग्रही ठेवावे. गणराज्य शासनसंस्थेच्या विस्ताराबाबत आवश्यक बाबी त्याने सांगितल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे

- नगरराज्याच्या लोकवस्तीत वाढ करणे
- प्रजाजनापेक्षा मित्र जोडण्यावर भर देणे
- जिंकलेल्या प्रदेशावर वस्ती वसविणे
- संपूर्ण लूट राज्याच्या तिजोरीत जमा करणे
- मोकळ्या जागेत युद्ध करणे
- व्यक्तीला दरिद्री बनवून राज्याला श्रीमंत बनविणे
- राज्याच्या सुरक्षितता जपणे, त्यासाठी प्रशिक्षित सैन्य तयार ठेवणे
- राजाने राष्ट्रीय सेनेची उभारणी करावी, कधीही भाडोत्री सैन्य पदरी बाळगू नये. कारण असे सैन्य कुचकामी व धोकादायक असते. त्यांच्या भरवशावर उभारलेले राज्य कधीही सुरक्षित राहू शकणार नाही. शांतीच्या काळात असे सैन्य राज्याला लुबाडतात.

द्रव्यबळ हे युद्धाचे मुख्य साधन असून, राज्याची ताकद पैशाने नव्हे तर चांगल्या सैन्यामुळे वाढत असते. तो असे म्हणतो की, पैशाने नेहमीच चांगले सैन्य खरेदी करता येत नाही. पण उत्तम सैनिकांच्या बळावर भरपूर पैसा ओढून आणता येतो. भौतिक संपत्तीबरोबरच राजाला

कावेबाजपणाही आवश्यक असतो. माणूस सामर्थ्य आणि कावेबाजपणाच्या जोरावर मोठा होतो.

### १.३.७. राजाला केलेला उपदेश :

राजाने अधिराज्य कसे निर्माण करावे आणि ते कसे टिकवावे? याविषयी मॅकियावेलीने ‘द प्रिन्स’ या ग्रंथात राजाला मार्गदर्शन केले आहे. यासंदर्भात त्याने राजाला काही उपदेश केला आहे तो खालीलप्रमाणे :

१) राजाने राज्य टिकवून ठेवण्यासाठी राज्यात प्रचलित असलेल्या जुन्या रूढी-परंपराचा आदर करावा.

२) राजाने नेहमी मोठे सैन्य पदरी बाळगावे, राष्ट्रीय सेना उभारावी.

३) आपल्या आणि प्रजेच्या संपत्तीबाबत राजाने काटकसरीने व्यवहार करावा. युद्धात मिळालेला पैसा उदारपणे लोकांना वाटून द्यावा. प्रजेला नेहमी प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करावा.

४) लोकांशी वागताना सौम्यपणा ऐवजी कडक वागावे.

५) शेजारील राज्यात पेचप्रसंग निर्माण झाला असता उघड हस्तक्षेप करावा आणि आपल्या गुणवत्तेचा प्रत्यय देत राहावा.

६) मानवी स्वभावात मानवी आणि पाशवी असे दोन अंश असतात. त्यामुळे दोन्ही प्रकारच्या प्रसंगांना तोंड देण्याचे कौशल्य राजाच्या अंगी असले पाहिजे.

७) राजाचे वर्तन हे पशुप्रमाणे असले पाहिजे. त्यासाठी त्याने कोल्हा आणि सिंह यांच्या गुणांचे अनुकरण करण्याचा सल्ला राजाला दिला आहे. राजा हा कोल्हयाप्रमाणे धूर्त आणि सिंहाप्रमाणे शूर असला पाहिजे. आपण खूप दयाळू, एकवचनी, धर्मप्रवण, पवित्र, प्रामाणिक असल्याचे त्याने नाटक करावे; पण त्याची मनोरचना अशी असावी की, प्रसंगानुरूप त्याने कौर्य, विश्वासघात, अधर्म-अनीती यांचा अवलंब केला पाहिजे.

८) राजाने बहुरूपीप्रमाणे आपले वर्तन केले पाहिजे. धर्माचा बाऊ न करता त्याने राज्यकारभार करावा. राजावर धर्माचारणाचे कोणतेही बंधन नाही. विरोधक आणि शत्रूंचा शिरछेद करून त्यावर राजाने सर्वप्रथम अश्रुपात करावा. असे करणे गैर नाही.

९) सिद्धांत आणि कृती यामध्ये अंतर असते हे राजाने केव्हाही विसरू नये. धर्मशास्त्र आणि नीतिशास्त्रचे आदर्श, वर्तनाचे नियम घालून देत असतात. पण ते राजाने जसेच्या तसे आचरणात आणले तर तो दु:खी झाल्याशिवाय राहणार नाही. वास्तव परिस्थितीकडे दुर्लक्ष करणारा राजा राज्याच्या विनाशाला कारणीभूत ठरतो. म्हणून राजाने परिस्थितीला अनुसरून व्यवहार करावा.

१०) राजाने दयाळूपणाबरोबरच क्रूर असल्याची भावना प्रजेच्या मनात बिंबवली पाहिजे.

११) राजाचे वर्तन असे असले पाहिजे की, लोकांच्या मनात राजाबद्दल प्रेम, भीती, आदर निर्माण झाला पाहिजे.

१२) कौर्याची कामे कशी केली म्हणजे लोकांना जाचक वाटणार नाही याबद्दल तो मार्गदर्शन करतो. राजाने अशी कार्ये ताबडतोब करून टाकावी. त्यासाठी काही सबळ कारणे पुढे करावी. लोकांना राजाने पटवून द्यावे की, या कार्याची पुनरावृत्ती होणार नाही. अकस्मात आणि पटणाऱ्या कारणासाठी होणारे आघात लोक खूप काळ आठवणीत ठेवत नाही. याउलट लोकांवर अनुग्रह करण्याच्या स्वरुपाची कामे राजाने सावकाश करून ती दीर्घकाळ सुरु ठेवावी. म्हणजे प्रजेच्या मनात असंतोष निर्माण होणार नाही.

१३) राजाने कधीही प्रजेची संपत्ती हिरावून घेऊ नये. तसेच राज्यातील स्त्रियांना शीलभ्रष्ट करू नये. राजा व्यभिचारी, चारित्र्यहीन आहे, अशी लोकांची भावना झाल्यास राजाचा सन्मान टिकू शकत नाही.

१४) ज्या कार्यातून राजाची थोरवी वाढेल किंवा त्याच्या गुणांचा अविष्कार घडेल अशी कामे त्याने स्वत: करावी. युद्धातील लुट त्याने सैनिक आणि प्रजाननांमध्ये वाटून द्यावी. वसुली करणे, दंड अथवा शिक्षा करणे अशी कामे अधिकारी वर्गाकडून करून घ्यावी. ज्या कार्यातून राजाची लोकप्रियता वाढेल अशी कार्ये उदा. किताब देणे, सन्मान करणे, आर्थिक मदत देणे इ. अशी कार्ये त्याने स्वत: करावी.

१५) राजा हा कलागुणांचा चाहता आणि भोक्ता असावा. त्याने योग्य, गुणी, कलावंत माणसांची निवड करून त्यांना राजाश्रय द्यावा. त्यांचा बहुमान करावा. तसेच नागरिकांनी त्यांची कार्ये योग्य पद्धतीने करावी यासाठी त्यांना प्रेरणा-प्रोत्साहन द्यावे. प्रजेच्या आर्थिक कल्याणासाठी मदत करावी.

१६) राजाने आपल्या मंत्रिमंडळाची निवड काळजीपूर्वक करावी. जी व्यक्ती राज्यापेक्षा स्वहिताचा अधिक विचार करते ती व्यक्ती कधीही चांगली मंत्री होऊ शकत नाही. राजानेदेखील मंत्र्यांचा कायम सन्मान करावा. त्यांच्यावर जबाबदारीची कार्ये सोपवून त्यांचा विश्वास संपादन करावा.

१७) राजाने खुशामतखोर लोकांपासून नेहमी सावध असले पाहिजे. अशा लोकांना दूर ठेवून निवडक विचारी लोकांचा संग्रह करावा. त्यांना सत्य, वास्तव सांगण्याचे स्वातंत्र्य द्यावे.

१८) राजाने महत्वाच्या प्रसंगी मंत्रिमंडळाचा सल्ला घ्यावा. त्याने स्वत: चौकस, सहिष्णू असावे. सत्याचा खुल्या मनाने स्वीकार करावा.

### १.३.८. शासनाचे प्रकार :

अरिस्टॉटलने केलेल्या शासनाचे वर्गीकरण प्रमाण मानून त्याने शासनाचे तीन शुद्ध आणि तीन विशुद्ध असे सहा प्रकार सांगितले आहे. ते म्हणजे राज्यसत्ता, अभिजन सत्ता आणि सनदशीर लोकशाही हे शुद्ध प्रकार आणि एकसत्ता, अल्पधनिक सत्ता आणि लोकशाही असे

तीन विशुद्ध प्रकार त्याने सांगितले आहे. परंतु त्याने दोघांचा समावेश असलेला संमिश्र शासन प्रकार सर्वोत्तम मानला आहे. कारण हाच शासन प्रकार सर्वाधिक टिकाऊ असतो.

त्याने 'प्रिन्स' मध्ये राजेशाहीचा, तर डिसकोर्सेस मध्ये गणराज्य शासन प्रकारचे समर्थन केले आहे. सर्वसाधारणपणे विचारवंत त्याला 'निरंकुश राजेशाहीचा समर्थक' मानतात परंतु ते योग्य नाही. वास्तविक पाहता राजेशाहीपेक्षा तो गणराज्य शासन पद्धती उत्तम आणि लाभदायक असल्याचे मानतो.

### १.३.९. समालोचन :

मॅकियावेलीच्या राजकीय विचारांचा प्रभाव आधुनिक विचारांवर बराच पडला आहे. हॉब्जचे राजनितीविषयक विचार मॅकियावेलीच्या राजकीय विचारा पुढचे पाऊल आहेत. अनेक राज्यकर्त्यांनी त्याच्या विचारांचा अवलंब केला आहे. प्रचलित राजकीय परिस्थितीला अनुरूप विचार मांडण्याचे धाडस राजकीय विचारांच्या क्षेत्रात त्यानेच प्रथम केले.

राज्यशास्त्राची धर्मातीत बैठक, व्यक्तिगत आणि सार्वजनिक नीतिदंडकातील सुस्पष्ट फरक, मानवी स्वभावाचे सूक्ष्म निरीक्षण आणि विवेचन, इतिहासापासून स्फूर्ती आणि योग्य धडा घेऊन वर्तमान आणि भविष्यात राजकीय धोरण आखण्याची तत्परता, व्यक्तीपेक्षा राज्यहिताला महत्व देण्याची त्याची नीतिमत्ता, राज्यकर्त्यांच्या कार्यक्षमतेवर दिलेला भर यामुळे त्याची गणना पहिल्या दर्ज्याच्या विचारवंतांमध्ये होते. याचमुळे त्याला 'आधुनिक राज्यशास्त्राचा जनक' असे म्हटले जाते. राज्यशास्त्राची धर्मनिरपेक्ष शास्त्राच्या स्वरुपात मांडणी करण्याचे श्रेय त्याला जाते. तसेच तो सत्तात्मक राजकारणाचा पहिला भाष्यकार आणि आधुनिक राष्ट्रवादाचा पूर्वसूचक संकल्पक होय. व्यक्तीला दुय्यम स्थान देऊन त्याने राज्यहिताला महत्वाचे स्थान दिले आहे. यामुळेच 'आधुनिक राज्यशास्त्राचे जनकत्व' त्याच्याकडे जाते.

असे असूनही त्याच्या राजकीय विचारावर अनेक टीका केल्या जातात. त्याचे मानवी स्वभाव विषयक विचार अत्यंत एकांगी स्वरूपाचे आहेत. त्याने माणसाच्या केवळ वाईट गुणांवर भर देऊन सद्गुणांकडे दुर्लक्ष केले आहेत. त्याने वापरलेली अध्ययन पद्धती ऐतिहासिक नव्हती. सर्व घटनांचे निरीक्षण, वर्गीकरण, अध्ययन करून त्या आधारे निष्कर्ष काढण्याऐवजी पूर्व निर्धारित निष्कर्ष साठी खऱ्या-खोट्या इतिहासाच्या आधारे उभे करणे ही त्याची पद्धत होती. त्याने आपली राजकीय विचारांमध्ये सत्ताप्राप्ती, सत्ता संचालन आणि सत्ता विस्ताराला अति महत्व दिले आहे. आपल्या विचारांमध्ये त्याने धर्म आणि नीतिशास्त्राची उपेक्षा केली आहे. तसेच त्याने राजकीय गुन्हेगारीकरणाचे उदात्तीकरण करून सार्वजनिक जीवन भ्रष्ट करणाऱ्या राजकीय तत्वज्ञानाला जन्म दिला आहे. असा आरोप त्याच्यावर केला जातो. त्याने राज्यकर्ता वर्गासाठी सुचवलेले क्रौर्याचे मार्ग रास्त नाही.

वरील टीका त्याच्या राजकीय विचारांवर केल्या जात असल्या तरी त्याला 'सर्वार्थाने युगाचा शिशु' 'काळाचा अपत्य' असे नामाभिधान प्राप्त झाले आहे.

## १.४ जॉन लॉक

जन्म २९ ऑगस्ट, १६३२, मृत्यू २८ ऑक्टोबर, १७०४

### १.४.१. प्रस्तावना :

ब्रिटिश राजकीय तत्वज्ञानाच्या क्षेत्रात थॉमस हॉब्जनंतर सर्वोच्च स्थान मिळविणारा विचारवंत म्हणजे जॉन लॉक होय. सामाजिक करार सिद्धांताचा तो दुसरा प्रमुख प्रवर्तक होय. हॉब्जचा अनियंत्रित सार्वभौमत्वच्या विचाराला प्रतिवाद म्हणून मर्यादित सार्वभौम सत्तेचा विचार त्याने मांडला. इंग्लंडचा राजा तिसरा विल्यम आणि इंग्लंड मधील विरोधी पक्ष नेता लॉर्ड अश्ली आणि इंग्लंडमध्ये झालेली रक्तविहिन क्रांती यांचा प्रभाव लॉकवर पडला. लॉकने सनदशीर क्रांतीचे समर्थन केले आहे. हॉब्जप्रमाणे लॉकनेही सामाजिक कराराचा विचार मांडताना निसर्गाव्यस्थेचा विचार गृहीत धरला आहे. त्याच्या मते, निसर्गावस्थेत मनुष्य शांततेने आणि सुखी जीवन जगत होता. निसर्गावस्थेत मानवाला जीवित, वित्त आणि संपत्ती असे तीन नैसर्गिक हक्क होते, त्यांच्या रक्षणासाठी परस्परांशी माणसाने करार करून राज्यनिर्मिती केली. शासनाला हे हक्क हिरावून घेण्याचा अधिकार नाही. त्यावर जनतेच्या संमतीने नियंत्रण ठेवता येते. 'जनसंमती हाच शासनाचा आधार आहे', असा आधुनिक विचार लॉकने सर्वप्रथम मांडला. लॉक हा व्यक्तिवादी विचारांचा असल्यामुळे त्याने जनतेच्या सार्वभौमत्वाचा विचार मांडून शासनसंस्थेवर अनेक मर्यादा घातल्या आहेत. त्याने कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्या सत्ता आणि अधिकारांची विभागणी केली आहे. राज्याला रक्षक बनवून व्यक्तीला त्याने सार्वभौम मानले. त्याचे विचार या घटकातून आपल्याला समजून घेता येईल.

### १.४.२ लॉकच्या राजकीय विचारांवरील प्रभाव :

१. हॉब्जचा प्रभाव

२.इंग्लंड मधील राजकीय नेत्यांशी सहवास

३. कौटुंबिक वातावरणाचा प्रभाव

४. प्रचलित राजकीय विचारांचा प्रभाव

### १.४.३. ग्रंथसंपदा :

१. Letter on Toleration

२. Two Treatises on Government

३. Essay Concerning Human Understanding

४. The Fundamental of Constitution of Caroline

### १.४.४. मानवी स्वभाव विषयक विचार :

हॉब्जप्रमाणे लॉकही मानवी स्वभावाचा विचार मांडतो. परंतु हॉब्ज आणि लॉकच्या मानवी स्वभावविषयक विचारांमध्ये मतभेद आहेत. लॉकने आपल्या 'सिविल गव्हर्मेंट' या पुस्तकात मनुष्यस्वभावविषयीचे विचार मांडले आहे. हॉब्झने मनुष्याला पशूतुल्य मानले आहे. मनुष्यातील पाशवी वृत्तीवर भर दिला आहे, तर लॉकने माणसाच्या चांगल्या गुणांवर भर दिला आहे. लॉकच्या मते, माणसे मुळातच चांगली, विवेकी, सद्सद्बुद्धी लाभलेली असतात. मनुष्य हा स्वभावतः सामाजिक प्राणी आहे, त्याला एकमेकांविषयी नेहमीच सहानुभूती आणि प्रेम वाटत असते. त्यामुळे ते एकमेकांना सहकार्य करतात. माणसे जन्मतः समान असतात जरी त्यांच्या शारीरिक- बौद्धिक क्षमता कमी- अधिक असल्या तरी त्यामुळे त्यांच्यातील नैतिक समतेला बाधा येत नाही. ज्या निसर्ग कायद्यानुसार माणसांचा हक्क आणि कर्तव्याची व्याख्या होते त्यांना मान्यता देण्याइतपत विवेक बुद्धीचा विकास झाला की माणसे नैतिकदृष्ट्या समान होतात आणि तेव्हा त्यांना खऱ्या अर्थाने व्यक्तित्व लाभते. जन्मतः माणसाला काहीही ज्ञान अवगत नसते. अनुभव हाच अनुभवात ज्ञानाचा एकमेव आधार असतो. जन्माच्या वेळी माणसाचे मन पूर्णपणे कोरे असते. त्यावर संवेदनांच्यामार्फत बाह्य परिस्थितीचे ठसे उमटतात. त्यातून मानवाच्या ज्ञानाची निष्पत्ती होते. मनुष्य हा स्वभावत: चांगला किंवा वाईट नसतो तर त्याच्यावर योग्य संस्कार झाले की तो चांगला बनतो. लॉकच्या मते, शिक्षणातूनच हे साध्य होऊ शकते. सुखाची इच्छा ही मानवी कार्याची प्रेरणा असते. एका सफलतेनंतर ती वाढत जाते. तिला अंत नसतो. सुखप्राप्ती आणि दुःखाचे परिहार हे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील प्रमुख उद्दिष्ट असते. माणूस हा केवळ निसर्गनिर्मित प्राणी नसतो, तर तो नैतिक कायद्यांनी नियंत्रित व्यवस्थेचा सभासदही असतो. स्वभावत: तो शांत, सतप्रवृत्त, समाजाचे हित पाहणारा असतो.

### १.४.५. निसर्गावस्था अथवा नैसर्गिक अवस्था :

लॉकच्या मते, राज्य अस्तित्वात येण्यापूर्वीची अवस्था म्हणजे निसर्ग अवस्था होय. तो असे म्हणतो की, निसर्गावस्थेत मानवी जीवन अत्यंत शांत आणि सुव्यवस्थित होते माणसे विवेकाने, शांततेने आणि गुण्यागोविंदाने एकत्र राहत असत. परस्परांना ते सहकार्य करत असत. सर्व माणसे स्वतंत्र आणि समान होती. प्रत्येकाला स्वतःच्या इच्छेनुसार जगण्याचे, श्रम आणि कृती करण्याचे आणि संपत्तीची विल्हेवाट लावण्याचे स्वातंत्र्य होते. निसर्गावस्थेत कोणतेही बंधन नसली, माणूस स्वतंत्र असला तरी तो स्वराचारी नव्हता. शांतता आणि सुरक्षा टिकवण्यासाठी बाह्य नियंत्रक नसला तरी नैसर्गिक कायद्याचा म्हणजेच विवेकाचा अंमल प्रत्येकावर होता. आपल्याप्रमाणे इतरांनाही जगण्याचा अधिकार आहे, हे निसर्ग अवस्थेत मनुष्याला पटलेले होते. त्यामुळे इतरांचे जीवित, वित्त आणि स्वातंत्र्य या नैसर्गिक हक्कांना कोणीही बाधा आणत नव्हते. लॉकने वर्णन केलेली निसर्गावस्था ही शांतता, सद्भाव, सहकार्य आणि संरक्षण या तत्त्वावर आधारित एक आदर्श नैतिक अवस्था होती. या निसर्गावस्थेत कोणालाही विशेष अधिकार नव्हते. सरकार नव्हते. माणसे विवेकाच्या आज्ञा पाळत असल्यामुळे पोलीस, न्याययंत्रणा यांची गरज नव्हती. त्यातही कोणी शांततेचा भंग, हिंसाचार केला किंवा इतरांच्या हक्क आणि स्वातंत्र्याला बाधा पोहोचवण्याचा प्रयत्न केला तर गुन्ह्यानुसार शिक्षा करण्याचा अधिकार सर्वांना होता. अशाप्रकारे लॉकने वर्णन केलेली निसर्गावस्था ही एक राजकीय समाज रचनाच होती; परंतु तिचे स्वरूप काही बाबतीत भिन्न

होते. लॉकने सांगितलेली निसर्ग अवस्था इतकी चांगली व्यवस्था होती तर मग माणसाला सामाजिक करार करून राज्यनिर्मिती का करावी लागली? याचे उत्तर लॉकने दिले आहे.

लॉकच्या मते, या निसर्ग अवस्थेत काही अडचणी होत्या त्या पुढीलप्रमाणे

१. नैसर्गिक कायदे अस्पष्ट होते. ते विवेकावर आधारित होते. प्रत्येकाच्या विवेकबुध्दीत फरक असल्यामुळे प्रत्येक जण कायद्याचा अर्थ स्वतःच्या मनाप्रमाणे लावत होता. सर्वांना मान्य असलेला स्थिर कायदा अस्तित्वात नव्हता.

२. निसर्ग नियमांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा अस्तित्वात नव्हती. नियम मोडणाऱ्या अपराध्यास दंड देणारी शक्तिशाली सत्ता नसल्यामुळे दंडाची अंमलबजावणी होऊ शकत नव्हती

३. निसर्ग नियमांचा अर्थ लावणारी अधिकृत सत्ता अस्तित्वात नव्हती. म्हणून स्पष्ट नियम निर्माण करणारी कायदेकारी सत्ता, त्यांचे पालन करून घेणारी कार्यकारी सत्ता आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा देणारी नि:पक्षपाती न्याययंत्रणा अस्तित्वात नव्हते आणि अशा शासनसंस्थेची लोकांना आवश्यकता वाटत असल्याने आणि आपल्या जीवित, वित्त आणि स्वातंत्र्य या तीन नैसर्गिक हक्कांच्या संरक्षणासाठी लोकांनी सामाजिक करार करून राज्यसंस्था निर्माण केली.

### १.४.६. सामाजिक करार :

लॉकच्या नैसर्गिक अवस्थेतील अडचणी दूर करण्यासाठी आणि मानवाच्या नैसर्गिक हक्कांच्या रक्षणासाठी लोकांनी सामाजिक करार करून राज्यनिर्मिती केली. परंतु त्याच्या सामाजिक करार सिद्धांताचे स्वरूप हॉब्जच्या करारापेक्षा वेगळे आहे. हॉब्जच्या मते, लोकांनी एकमेकांशी करार करून आपले सर्व हक्क सार्वभौमावर सोपवले, सार्वभौमाच्या आज्ञा निमूटपणे पाळण्याचे मान्य केले. सार्वभौमाशी लोकांनी कोणताही करार केला नाही. लॉकच्या मते, प्रत्येक व्यक्ती इतर प्रत्येक व्यक्तीशी समुदाय स्थापनेचा करार करते. जीवित, वित्त आणि संपत्तीच्या रक्षण आणि सुरक्षिततेसाठी लोकांनी हा करार केलेला असतो. हा करार सर्वसंमतीने केलेला असतो. करारानुसार प्रत्येकाने आपले नैसर्गिक हक्क सोडून देण्याची कबुली दिलेली असते. व्यक्तीने आपले हे हक्क कोणत्याही विशिष्ट व्यक्ती किंवा समूहाला दिले नसून संपूर्ण समुदायाला दिलेले असतात. म्हणजेच राजकीय अधिसत्ता ही समाजाच्या हातात असते. थोडक्यात, राजकीय समाजाची निर्मिती आणि सातत्य लोकांच्या संमतीवर आधारित असते.

लॉकच्या मते, दोन करार अस्तित्वात आले. पहिल्या करारानुसार राजकीय समाजाची निर्मिती झाल्यानंतर दुसऱ्या कराराने सरकारची स्थापना झाली. सरकारची निर्मिती करारातून नव्हे तर विश्वस्त नेमण्याच्या मार्गाने झाली. त्याच्या मते, सरकार हे विश्वस्त असते. ज्या गोष्टींसाठी सरकारची निर्मिती करण्यात आली (नैसर्गिक हक्कांचे रक्षण) ते कार्य सरकार व्यवस्थित पार पाडत नसेल तर लोक प्रचलित शासनव्यवस्था बरखास्त करून त्याजागी नव्या सरकारची स्थापना करू शकतात. सरकार समाजाशी करार करत नाही तर ते समाजाचा विश्वस्त म्हणून कार्य करते. सरकारमध्येही इतर अंगापेक्षा लॉकने कायदेमंडळाला सर्वोच्च स्थान दिले असून, कार्यकारी सत्तेला दुय्यम स्थान दिले आहे. कायदेमंडळ हेच खरे

विश्वस्त असून, खरी अंतिम सत्ता लोकांच्या हातात असते. लॉकच्या मते, व्यक्ती आपल्या नैसर्गिक हक्कांचा त्याग करून इतर अधिकार आपल्या जवळ ठेवते.

**लॉकच्या सामाजिक कराराची वैशिष्ट्ये :**

१. दोन कराराची कल्पना

२. नागरिकांच्या अधिकारांची हमी

३. सार्वभौम जनता

४. सामाजिक करार सर्वांना बंधनकारक

५. बहुसंख्याची सत्ता

६. व्यक्तीस्वातंत्र्याची हमी

७. कायदेविषयक सत्तेला महत्व

**कराराचे परीक्षण :**

लॉकच्या मते, मनुष्य हा निसर्गावस्थेत विवेकी व सद्‌गुणी होता. मग निसर्गावस्थेत त्याला अडचणी का निर्माण झाल्या, हा प्रश्न उदभवतो. त्याचे नैसर्गिक अवस्थेचे वर्णन काल्पनिक वाटते. लॉकचा करार अस्पष्ट आहे. दुसऱ्या कराराने शासनसंस्था निर्माण झाली असे तो म्हणतो; पण दुसरा करार केला की नाही हे स्पष्ट नाही. व्यक्तिगत संपत्तीच्या विचाराने लॉक भांडवलशाहीला प्रोत्साहन दिले आहे. मनुष्य स्वभावाची एकच बाजू लॉक मांडतो. लॉकने मनुष्याच्या चांगल्या बाबींवर भर दिला आहे. वाईट गुणांकडे दुर्लक्ष केले आहे. लॉकने व्यक्तीवादाचे अतिरेकी समर्थन केले आहे. त्यामुळे सार्वभौम सत्ता धोक्यात येऊ शकते. डॅनिंगच्या मते, लॉकच्या सामाजिक करारातील कोणताही विचार पूर्वीच्या पूर्वसूरींनी मांडलेल्या विचारांपेक्षा नवीन नाही; परंतु त्याने व्यक्तिवादी विचारसरणीस निश्चित रूप दिले हे महत्वाचे आहे.

### १.४.७. नैसर्गिक अधिकार :

लॉकने वर्णन केलेल्या निसर्गावस्था ही निसर्गनियमांच्या नियंत्रणात होती. त्याच्यामध्ये सर्वजण समान व स्वतंत्र असल्यामुळे कोणीही दुसऱ्याचे जीवन, स्वातंत्र्य व संपत्ती यांना धोका निर्माण करू नये. शांतता आणि संरक्षण देणाऱ्या निसर्ग नियमांचे पालन करावे यासाठी प्रत्येकाला नैसर्गिक नियमानुसार काही नैसर्गिक अधिकार मिळत असे हे तीन नैसर्गिक अधिकार म्हणजे जीविताचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार आणि संपत्तीचा अधिकार

**१. जीविताचा अधिकार :**

हा अधिकार माणसात उपजत असलेल्या आत्मरक्षणाच्या प्रवृत्तीशी संबंधित आहे, असे लॉक समजतो. निसर्ग नियमांच्या पालनातून त्याला हा अधिकार प्राप्त होतो. हॉब्ज आणि लॉक हे दोन्हीही विचारवंत आत्मसंरक्षणाच्या अधिकाराबाबत एकमेकांशी

सहमत आहे. लॉक असे म्हणतो की, माणसाच्या जीविताचा हक्क हिरावण्याचा अधिकार फक्त ईश्वराला असतो; माणसाला नव्हे. माणसांना ईश्वराची मर्जी असेपर्यंतच जगण्यासाठी निर्माण केलेले असल्यामुळे इतरांचे आणि स्वतःचेही आयुष्य संपविण्याचा हक्क कोणालाही नाही. कोणीही आपले आयुष्य कोणाकडेही गहाण टाकू शकत नाही किंवा कोणाच्याही मर्जीवर सोपवू शकत नाही. ते कोणी हिरावून घेण्याचा प्रयत्न केला तर बचावाची धडपड करण्याचा हक्क प्रत्येकाला असतो असे लॉक म्हणतो.

२. **संपत्तीचा अधिकार :** संपत्तीच्या अधिकाराला लॉकच्या राजकीय विचारविश्वात खूप महत्त्वाचे स्थान आहे. या अधिकाराला त्याने निसर्गाची विनामूल्य देणगी मानले आहे. लॉकच्या मते, ईश्वराने माणसाला संपूर्ण सृष्टी सामूहिक स्वरूपामध्ये दिली आहे. तसेच ईश्वराने आपल्या जीवनाला सुखी बनवण्यासाठी बुद्धीची देणगीही दिली आहे माणसाचे स्वमालकीचे आपले शरीर असते. मनुष्याच्या ठिकाणी कष्ट करण्याची प्रवृत्ती असते. त्याने केलेल्या कष्टातून ज्या वस्तू तो मिळवतो त्या त्याच्या मालकीच्या होतात कारण त्या वस्तूसाठी त्याचे कष्टही खर्च झालेले असतात. मनुष्य हा कष्टाळू असतो, कष्ट करून उत्पादन आणि त्याच्याबरोबर आपली संपत्ती वाढवण्याची त्याची इच्छा असते. भौतिक गोष्टींची पूर्तता करण्यासाठी संपत्ती मिळविणे, ती वाढविणे आणि सुरक्षित ठेवणे इत्यादी गुण मनुष्यामध्ये असतात. श्रमाने उत्पादन करून मिळवलेली संपत्ती त्या व्यक्तीच्या मालकीची होते. संपत्ती हा व्यक्तीचा अधिकार झाला संपत्तीचा सिद्धांत नंतर समाजवादी विचारवंतांनी विकसित केला. शासनसंस्थेत व्यक्तीचे नैसर्गिक अधिकार हिरावून घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. जनतेच्या संमतीनेच त्यावर नियंत्रण आणि मर्यादा घालता येतात.

३. **स्वातंत्र्याचा अधिकार :**

लॉकच्या मते, आपल्या इच्छेनुसार माणसाने केलेले वर्तन म्हणजे स्वातंत्र्य होय. व्यक्तीच्या विकासासाठी स्वातंत्र्याची नितांत आवश्यकता असते.

### १.४.८. जनसंमती हाच शासनाचा आधार :

जनसंमती हाच शासनाचा आधार आहे, हे लॉकने स्पष्ट केले. निसर्गावस्थेत राहणाऱ्या नागरिकांनी राज्य निर्माण करण्याचा निर्णय घेतला तो सुद्धा जनसंमतीच्या आधारावर. लोकप्रतिनिधी मंडळाला शासनकर्ते जबाबदार आहेत म्हणजेच जोपर्यंत सत्ता उपभोगण्यास नागरिकांची संमती आहे तोपर्यंतच ती त्यांना उपभोक्ता येते, असे लॉक म्हणतो. लॉकच्या मते, जनतेला ही संमती प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशा दोन मार्गाने व्यक्त करता येईल. समाजातील व्यक्तींनी आपण संमती देत आहोत, असे उघडपणे सांगून आपली संमती दर्शवण्याचा प्रत्यक्ष मार्ग आणि राज्याकडून सर्वांना मिळणाऱ्या संरक्षणाचे फायदे स्वीकारण्यात सुरुवात केली की अप्रत्यक्ष रीतीने संमती दिल्यासारखे आहे. लॉकच्या मते, पहिल्या पिढीने प्रत्यक्ष संमतीने निर्माण केलेले राज्य दुसऱ्या पिढीच्या अप्रत्यक्ष संमतीने अस्तित्वात राहील. म्हणजेच प्रत्येक नव्या पिढीला फेरसंमती देण्याचा अधिकार तो नाकारतो. तसेच विनाकारण राज्यकर्त्यांविरुद्ध बंड पुकारून राज्याचे अस्तित्व धोक्यात आणण्याची संधी तो नागरिकांना देत नाही. परंतु प्रजेला ते केवळ शासनकर्त्यांचे गुलाम आहेत

असा दर्जाही देत नाही. सामाजिक करारानंतर कायदेशीर सार्वभौमत्व हे जरी राज्याकडे असले तरी ते मर्यादित स्वरूपाचे आहे. आपल्या जीवित, वित्त आणि स्वातंत्र्याचे संरक्षण राज्याकडून व्हावे याच उद्दिष्टांसाठी नागरिकांनी ते राज्याकडे सोपवलेले आहेत आणि ही उद्दिष्ट पार पाडण्यास राज्य असमर्थ ठरत असेल तर राज्यसंस्थेचे आणि शासनकर्त्यांचे अस्तित्व संपुष्टात आणून सार्वभौम सत्ता पुन्हा आपल्याकडे घेण्यास लॉकची संमती आहे. म्हणजेच राजकीय सार्वभौमत्व हे नागरिकांकडेच आहे हा विचार लॉकने मांडलेला दिसतो. लॉक जेव्हा जनसंमती हा शब्द वापरतो तेव्हा एखाद्या गोष्टीविषयी सर्वांनी एकमताने घेतलेला निर्णय अशा अर्थाने तो वापरत नाही कारण कोणत्याही एखाद्या गोष्टीबद्दल सर्वांचे अगदी सारखेच मत असणे अशक्य आहे याची जाणीव लॉकला होती. त्यामुळे जनसंमती म्हणजे बहुमताने घेतला गेलेला निर्णय होय; परंतु एकदा बहुमताने निर्णय घेतला की तो अल्पमतवाल्यावर बंधनकारक आहे तसे झाले नाही तर राज्य निर्माण करणे आणि शासन संस्था चालवणे या दोन्ही गोष्टी व्यवहारात अशक्य होऊन बसतील. म्हणून जेथे जनसंमती नसेल तेथील समाजाला खरा राजकीय समाज म्हणण्यास लॉक तयार होत नाही

### १.४.९. प्रतिकाराचा आणि शासनविसर्जनाचा हक्क किंवा क्रांतिविषयक विचार :

सरकारकडे सत्ता सोपविताना लोकांनी आपले सर्व हक्क सोडले नाही तर काही हक्क राखून ठेवले, असे लॉकचे प्रतिपादन आहे. ते खालीलप्रमाणे :

१. ज्या कार्यासाठी सरकार स्थापन केले ते कार्य व्यवस्थित पार पडते आहे किंवा नाही हे ठरविण्याचा हक्क

२. अकार्यक्षम आणि विकृत सरकार विसर्जित करून त्या ऐवजी दुसरे सरकार बसवण्याचा हक्क

३. ज्या सदवर्तनाच्या अटीवर कायदेशीर सत्ता सरकारच्या हवाली केली त्या अटींचे पालन होत आहे की नाही हे पाहण्याचा हक्क

हे हक्क लोकांनी स्वतः कडे ठेवले होते. त्यामुळे जेव्हा राज्यकर्ते लहरी, जुलमी होऊन मनमानी करतात अशावेळी त्यांच्या विरुद्ध बंड पुकारण्याचा हक्क जनतेला असतो, असे तो म्हणतो. बाह्य शक्तीने पराभव केल्यामुळे किंवा अंतर्गत बंडाळीत कोणीतरी सत्ता बळकावल्यामुळे किंवा असमर्थतेमुळे जेव्हा सरकारला आपले कार्य पार पडता येत नाही अशावेळी लोकांनी दैवी अनुग्रहाची वाट न पाहता शस्त्र हातात घ्यावे.

जनसंमती हाच शासनाचा आधार आहे, या विधानाची दुसरी बाजू लॉकच्या मते लोकांना शासनाविरुद्ध क्रांती करण्याचा हक्क आहे. मनमानी राज्यकर्ता स्वतः कायद्याचा शत्रू असून, त्याला विरोध करण्यातून जनता कायद्याचे रक्षण करते, असे लॉक म्हणतो. अधिकार नसताना बलप्रयोग करणारा राज्यकर्ता हा त्याच्या मते युद्ध करणारा आक्रमक ठरतो. ज्याक्षणी तो शासन अटींचा भंग करतो त्याक्षणी त्याला विरोध करणे हा लोकांचा नैसर्गिक हक्क आहे.

लॉकने क्रांतीची काही कारणे सांगितली आहे.

१. मनमानी राज्यकारभार

२. विधिनिर्मितीच्या प्रक्रियेत भ्रष्ट्राचार

३. आपल्या माणसांचा शासनात भरणा करणे

४. परकीय सत्तेखातर स्वजनांचा द्रोह करणे.

पण त्याचबरोबर प्रतिकाराच्या सिद्धांताचे पर्यवसान निरंतर अंतर्गत संघर्ष आणि वारंवार सत्तांतरे घडण्यात होऊ नये यावरही त्याचा कटाक्ष आहे. त्यामुळे लोकांनी बंड पुकारण्याचा हक्क वापरताना काही अटी पाळल्या पाहिजे, असे तो म्हणतो.

**क्रांतीच्या अटी :**

१. लोकांना शस्त्र वापरण्याचा हक्क असला तरी त्यासाठी पर्याप्त कारण घडले आहे का याची खात्री लोकांनी करून घ्यावी

२. जुलमी आणि बेकायदेशीर सत्ताधारकांच्या विरोधात बंड पुकारावे

३. एका व्यक्तीने किंवा छोट्या गटाने कायदेभंगाचा मार्ग चोखाळू नये तर जुलमाने त्रस्त झालेल्या बहुसंख्य जनतेच्या पुढाकाराने तो अवलंबण्यात यावा. अशा काही अटी त्याने आहेत. लोकांनी किरकोळ कारणांनी बंड करू नये, असे तो म्हणतो

**१.४.१० सरकारचे वर्गीकरण :**

लॉकच्या राजकीय विचारांमध्ये कायदेकारी सत्तेला मध्यवर्ती स्थान दिलेले आहे ते पाहता सरकारांचे वर्गीकरण कायदेकारी सत्ता सरकारांमध्ये कोणावर सोपवली आहे या आधारावर तो करतो. कायदेकारी सत्ता एका व्यक्तीच्या हाती असो अगर अनेक व्यक्तींच्या किंवा समूहाच्या हाती असो ती सर्वश्रेष्ठ असते; परंतु ती अमर्याद नसते. यावर त्याचा कटाक्ष होता. जेथे लोक स्वतःच वेळोवेळी एकत्र जमतात आणि बहुमताच्या निर्णयानुसार कायदे करतात त्या कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासक अधिकारी नेमतात तेथे खऱ्या अर्थाने लोकशाही अस्तित्वात असते. जेथे काही निवडक व्यक्तींवर कायदे करण्याची जबाबदारी सुपूर्त केलेली असते तेथे अल्पजनसत्ता असते आणि जेथे एका व्यक्तीच्या हातात कायदे निर्मितीची सत्ता काही मर्यादित काळासाठी किंवा संपूर्ण काळासाठी सोपवलेली असते तेथे राजेशाही हा शासन प्रकार अस्तित्वात असतो. लॉकच्या मते या तीनही शासन प्रकारांपैकी लोकशाही हाच शासन प्रकार सर्वोत्तम ठरतो, कारण उत्तम राज्यकारभारासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना फक्त त्यातच पर्याप्त प्रमाणावर उपलब्ध असतात.

राजेशाहीचे विकृतीकरण स्वार्थासाठी सत्तेचा गैरवापर करणाऱ्या एकाधिकाशाहीत घडण्याची शक्यता असते, तर अल्पजनसत्तेत संपूर्ण समुदायाच्या हितापेक्षा मुठभर श्रेष्ठींच्या हितसंबंधांना प्राधान्य मिळण्याचा धोका असतो. पण लॉकला आजच्या अर्थाने लोकशाहीवादी विचारवंत म्हणता येऊ शकेल काय हा प्रश्न आहे जनसंमतीचा आधार असलेल्या राजेशाहीला त्याचा विरोध नव्हता. अनियंत्रित जुलूमशाही त्याला नापसंत होते

परंतु नागरिकत्वाचे अधिकार स्त्रिया आणि गरिबांना देणे त्याला नामंजूर होते. सार्वभौम सत्ता हा शब्द लॉकच्या लिखाणामध्ये कुठेही आढळत नाही कायदेकारी सत्तेला तो सर्वश्रेष्ठ सत्ता म्हणतो पण अंतिम सत्ता ही राजकीय समाजाचीच असते हे तो स्पष्ट करतो. शासनाच्या योजनेत निरंकुश सत्तेला किंवा मनमानी कारभाराला कुठेही वाव नाही. कायदेकारी सत्तेवर मर्यादा असतात; परंतु लोकांचे सर्वश्रेष्ठत्वही फक्त सरकार विसर्जित असतानाच क्रियानवीत होते. विश्वासाचा भंग केला तरच ते सरकार विसर्जित करण्याचा हक्क समुदायाला प्राप्त होतो, इतर वेळेला नाही.

### १.४.११.लॉकचे राज्य आणि धर्मसंस्थेसंबंधी विचार :

'लेटर ऑन टोलरेशन्स' या ग्रंथात लॉकने धर्म आणि राज्यसंस्थेविषयी अत्यंत महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. धर्म ही व्यक्तीची नैतिक बाब असते. शक्तीच्या आधारे त्यात बदल करणे अशक्य असते. लॉकच्या मते राज्यसंस्था व धर्मसंस्था स्वतंत्र असाव्यात. धर्मात सहिष्णुता निर्माण करण्याचा राज्याने प्रयत्न करावा चर्चने राज्याच्या कारभारात हस्तक्षेप करू नये. लॉकच्या मते, प्रजेची आत्मिक उन्नती करण्याच्या नावाखाली राजाने जनतेला अमुक एखाद्या पंथाचा किंवा धर्माचा स्वीकार करण्यास लावणे चूक आहे. ज्या पंथांवर लोकांची श्रद्धा असतील तो पंथ स्वीकारतील. सक्तीने धर्मपरिवर्तन करणे अन्यायकारक आहे. धार्मिक बाबतीत लोकांनी स्वतःच्या विवेकबुद्धीप्रमाणे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य ठेवणे आवश्यक आहे. व्यक्ती राज्याचे नियम योग्य प्रकारे पाळते की नाही हे पाहणे राज्याचे कार्य आहे. धार्मिक क्षेत्रात व्यक्ति कशी वागू शकते. राज्यात मात्र परस्परांविषयी द्वेषभाव पसरवण्याची तिला संपूर्ण बंदी असली पाहिजे. यासंदर्भात न्यायसंस्थेने उचित आणि कडक धोरण स्वीकारणे आवश्यक असून धर्माच्या आड जर राज्यविरोधी कारवाया होत असतील तर धर्मसंस्था नष्ट करावी. जोपर्यंत राज्यात धर्मामुळे अस्वस्थता निर्माण होत नाही तोपर्यंत राज्याने धर्माच्या आड येण्याचे कारण नाही. बलप्रयोगाने मनुष्याचे मन जिंकता येणार नाही आणि म्हणून राज्याने कधीही लोकांच्या धार्मिक श्रद्धांना विरोध करू नये. धर्म आणि राज्य यामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न करावा. सहिष्णुता आणि शास्त्रीयदृष्टी आधुनिक काळात विज्ञान प्रगतीला सहायक असते. लॉकचा धर्मनिरपेक्ष विचार आज मान्यता पावला आहे

### १.४.१२. समालोचन :

लॉकचे सर्वच राजकीय चिंतन त्याच्या काळातील राजकीय प्रश्नांच्या अनुषंगाने झाले आहे हे जरी वास्तव वसले तरी आजही त्याच्या राजकीय विचारांचा प्रभाव कमी झालेला नाही. लॉकपूर्वी कोणीही राजकीय समस्यांचा स्वतंत्रपणे विचार केलेला नव्हता. बहुदा सर्वच विचारवंतांनी चर्चच्या अनुषंगाने आपले विचार मांडले होते. लॉक निधर्मी नसला तरी त्याने त्यांची चिकित्सा धर्मापासून वेगळे ठेवून केली. माणसावर माणसाने केलेले राज्य जर शासितांच्या संमतीने चालत नसेल तर त्याला कोणत्याही प्रकारचे वैधानिक समर्थन नाही, हे लॉकच्या पूर्वी इतर कोणत्याही विचारवंताने ठामपणे सांगितलेले नव्हते. इंग्लंडमधील तत्कालीन राजकारणाच्या संदर्भात त्याने भाष्य केलेले असले तरी फ्रान्स आणि अमेरिका या देशातील राजकीय घटनांमधून लॉकच्या विचारांचे पडसाद उमटलेले होते. त्याचे 'Two Treatises on Government' हे पुस्तक अमेरिकन राज्यक्रांतीचे क्रमिक पुस्तक बनले

होते. रुसो आणि व्हॉल्टेयर यांच्याबरोबरच फ्रेंच राज्यक्रांतीला प्रेरणा देण्याचे कार्य लॉकने केलेले होते.

**लॉकच्या विचारांचे योगदान :**

जनता हीच सत्तेची मूलस्त्रोत असते. शास्ते शासितांना उत्तरदायी असतात. सत्ताही काटेकोरपणे कायद्याद्वारेच अमलात आली पाहिजे नागरिकांचे नैसर्गिक हक्क हिरावून घेण्याचा कोणालाही अधिकार नाही ही नैतिक राज्यकारभाराची सूत्रे लॉकने राजकीय विचारविश्वाला दिलेली आहेत. नैसर्गिक हक्कांच्या संकल्पनेबरोबरच मर्यादित सरकारची लॉकप्रणीत संकल्पना ही राजकीय विचारांमध्ये महत्त्वाची ठरली आहे. त्यामुळे राजकीय लोकशाहीचा लॉक हा पहिला प्रणेता मानला जातो. तसेच राज्यशास्त्राच्या क्षेत्रात सत्ताविभाजनाचा विचार सर्वप्रथम मांडण्याचे श्रेयही लॉकलाच द्यावे लागते. व्यक्तिवाद, जनसार्वभौमत्व आणि संविधानिक शासन यांचे सुसंगत तत्त्वज्ञान लॉकने मांडले आहे. संपत्तीच्या हक्काला त्याच्या राजकीय विचारांमध्ये महत्त्वाचे स्थान देणारा लॉक हा आज लोकप्रिय झालेल्या उदारमतवादी राज्यपद्धतीचा आद्य समर्थक मानला जातो.

असे असूनही त्याच्या राजकीय विचारांमध्ये काही उणीवा आहेत त्याच्या विचारांचे टीकात्मक परीक्षण खालीलप्रमाणे :

१. लॉकच्या मते, राज्यनिर्मिती पूर्वी निसर्ग अवस्था होती याबाबत कोणताही ऐतिहासिक पुरावा आढळत नाही निसर्ग अवस्था हा एक केवळ काल्पनिक विचार वाटतो.

२. लॉकने मनुष्य स्वभावाचे संपूर्ण एकांगी चित्र रेखाटले आहे. जर मनुष्य हा विवेकी असता तर निसर्ग अवस्थेमध्ये अडचणी निर्माण होण्याचा प्रश्नच येत नाही त्याचप्रमाणे मानवी स्वभाव हा चांगल्या आणि वाईट गुणांच्या मिश्रण असते ३. लॉकने आपल्या विचारांमध्ये निसर्ग नियमांची कल्पना मांडली आहे; परंतु निसर्ग नियम म्हणजे निश्चित काय, ते कसे निर्माण होतात इत्यादी बाबतीत त्याने खुलासा केलेला नाही परस्पर सदभाव ठेवणारा सद्गुणी मनुष्य निसर्ग नियमांचा वापर स्वस्वार्थासाठी करतो हे त्याच्या तत्त्वज्ञानाशी विसंगत वाटते

४. लॉकने राज्याची उभारणी जनसंमतीवर केली आहे परंतु जनसंमतीची कल्पना त्याने स्पष्ट केलेली नाही

५. लॉकच्या सामाजिक करार सिध्दांताबाबत अस्पष्टता जाणवते त्याने दोन सामाजिक करार केल्याचे नमूद केले आहे पहिला सामाजिक करार एक व्यक्ती आणि दुसरी व्यक्ती यांच्यात झाला तर दुसरा करार राजकीय करार समजला जातो. त्यामुळे शासन संस्थेची स्थापना करण्यात येते पण याबाबत लॉकचे विवेचन अस्पष्ट आहे

६. लॉकने आपल्या विचारांमध्ये व्यक्तीच्या संपत्तीच्या अधिकाराला अधिक महत्त्व दिले आहे यातून समाजामध्ये मालमत्ता धारण करणारा भांडवलदार वर्ग निर्माण होतो लॉकचा सिद्धांत कल्याणकारी राज्यात लागू होत नाही तर भांडवलशाही राज्यास लागू होतो. थोडक्यात, लॉकचे विचार हे भांडवलशाहीला पोषक असल्याचे विचारवंतांचे म्हणणे आहे.

७. लॉकचा मते, राज्याचा उदय हा सामाजिक करारातून झाला हे स्पष्ट करण्यापेक्षा मर्यादित राज्यसत्तेचे समर्थन करणे आणि अंतिम सत्ता लोकांच्या हाती देणे या हेतूच्या समर्थनासाठी लॉकने सामाजिक करार सिद्धांताचा आधार घेतला. परंतु हा सिद्धांत कृत्रिम वाटतो.

८. लॉकने लोकांना क्रांती करण्याचा अधिकार दिला आहे या अधिकाराने राज्य अस्थिर व दुबळे बनते क्रांतीच्या अधिकाराचा सतत वापर केल्याने क्रांतीचा उद्देश नाहीसा होतो आणि तिचे पावित्र्यही नष्ट होते.

९. लॉकने सत्ताविभाजनाच्या सिद्धांताचा पुरस्कार केला आहे. त्याबद्दल बोलताना कायदेकारी सत्ता व कार्यकारी सत्ता यांच्या विभक्तीपणावर तो जेवढा भर देतो तेवढा भर न्यायालयीन व्यवस्थेच्या स्वातंत्र्यावर देत नाही, अशी टीका विचारवंतांनी केल्या आहे.

असे असले तरी आपल्या राज्यव्यवस्थांना आधारभूत ठरलेल्या संकल्पनांचा लॉक हाच आद्य प्रवर्तक होता हे कोणीही अमान्य करत नाही. लॉकच्या संपत्तीच्या अधिकाराचा विचारांचा आज संपूर्ण जगावर प्रभाव पडला आहे लॉक हा अनुभववादी तत्त्वज्ञ होता. बार्करच्या मते, लॉकच्या राजकीय विचारांनी केवळ इंग्लंडमधील विचारवंत प्रभावित केले नाही, तर फ्रान्समध्येही प्रभावित झाले. फ्रेंच राज्यक्रांती व विशेषतः अमेरिकेतील स्वातंत्र्याची घोषणा, सत्ताविभाजनाला संविधानात मिळालेले स्थान हे लॉकच्या विचारांची देणगी आहे. युरोप आणि आशिया खंडातील राष्ट्रांच्या शासनव्यवस्थेवर आजही लॉकच्या विचारांची छाप दिसून येते. यातूनच त्याच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व विशद होते.

## १.५ विद्यापीठीय प्रश्न :

१) मॅकियावेलीचे राज्यनिर्मितीविषयीचे विचार थोडक्यात विशद करा.

२) राजाने अधिराज्य कसे मिळवावे, कसे टिकवावे आणि कसे वाढवावे? करण्यासंदर्भात मॅकियावेलीने राजाला कोणता उपदेश केला आहे?

३) जॉन लॉकच्या सामाजिक करार सिद्धांताची चर्चा करा.

४) 'जनसंमती हाच शासनाचा आधार आहे' या विधानासंदर्भात जॉन लॉकचे विचार विशद करा.

५) टिपा लिहा

१. मॅकियावेलीचे मानवी स्वभावाविषयीचे विचार

२. निसर्ग अवस्था

३. प्रतिकाराचा हक्क

## १.६ संदर्भग्रंथ :

१) पाश्चीमात्य राजकीय विचार – भास्कर लक्ष्मण भोळे, पिंपळपुरे प्रकाशन, नागपूर.

२) पाश्चीमात्य राजकीय विचारप्रवाह – दि. का. गद्रे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी राणे प्रकाशन, पुणे.

३) काही प्रमुख राज्यशास्त्रज्ञ – प.सि. काणे, विद्या प्रकाशन, नागपूर.

❄❄❄❄❄❄❄

# २

# स्वातंत्र्य आणि न्याय

**घटक रचना**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

२.४ स्वातंत्र्य म्हणजे काय?

२.५ 'स्वातंत्र्य'निवडक व्याख्या

२.६ स्वातंत्र्याचे प्रकार

२.६.१ नैसर्गिक स्वातंत्र्य :

२.६.२ नागरी स्वातंत्र्य :

२.६.३ राजकीय स्वातंत्र्य:

२.६.४ आर्थिक स्वातंत्र्य

२.६.५ राष्ट्रीय स्वातंत्र्य :

२.६.६ व्यक्तिगत स्वातंत्र्य

२.६.७ घटनात्मक स्वातंत्र्य

२.७ जॉन स्टुअर्ट मिल [१८०६-१८७८] : स्वातंत्र्याची कल्पना

१. स्वातंत्र्य का आवश्यक आहे?

२. जे.एस मिल: स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा तत्वज्ञानात्मक आधार

३. जे.एस.मिल :स्वातंत्र्याची वैशिष्ट्ये -

२.७.१ मिल यांच्या स्वातंत्र्याचे प्रकार

१. सत्य दडपण्याची भीती

२. सत्याला विविध पैलू असतात

३. समाजाच्या विकासासाठी

४. उच्च दर्जाच्या नैतिक चारित्र्याचा विकास

५. ऐतिहासिक आधार

२.७.२ मिलच्या स्वातंत्र्याच्या मर्यादा:

२.७.३ मिलच्या स्वातंत्र्याच्या सिद्धांतावरील टीका

२.८ जॉन रॉल्स [१९२१-२००२]

२.८.१ न्याय:

२.८.२ न्याय : व्याख्या व अर्थ

२.९ न्यायाचे पैलू :

१ ) सामाजिक न्याय

२ ) आर्थिक न्याय

३ ) राजकीय न्याय :

२.१० सामाजिक न्यायाची संकल्पना

२.११ जॉन रॉल्स: न्यायाचा सिद्धांत

१. उपयुक्ततावादावर टीका

२. मुळस्थिती

३. पडदा

अ. लोकसंख्याशास्त्रीय तथ्ये

ब. सामाजिक तथ्ये -

क. चांगल्या गोष्टींबद्दल निर्णय घेणाऱ्या वृत्तीबद्दलची तथ्ये

२.१२ अज्ञानाच्या पडद्याचे दोन मुख्य पैलू :

प्रथम:न्यायाचे पाहिले तत्व समान स्वातंत्र्य

द्वितीय:.न्यायाचे दुसरे तत्व संधीची न्याय्य समानता आणि भेदमुलक तत्व

२.१३ जॉन रॉल्स:वितरणात्मक न्याय

स्वतंत्र आणि न्याय

## २.१ उद्दिष्टे

१. स्वातंत्र्याची संकल्पना समजून घेणे.

२. स्वातंत्र्याचे प्रकार समजून घेणे.

३. स्वतंत्र संकल्पनेचा विविध घटकांशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करणे.

४. जे.एस.मिल.यांच्या स्वतंत्र संकल्पनेचा आढावा घेणे.

५. जे.एस.मिल. यांच्या स्वतंत्र विषयक संकल्पनेचे परीक्षण करणे.

६. न्याय संकल्पनेचा अभ्यास करणे.

७. न्याय संकल्पनेच्या विविध पैलूंचा अभ्यास करणे.

८. जॉन रॉल्स यांच्या न्याय कल्पनेचा अभ्यास करणे.

९. जॉन रॉल्स यांच्या भेदभावात्मक सामाजिक न्याय कल्पनेचा अभ्यास करणे.

१०. जॉन रॉल्स यांच्या सामाजिक न्यायाचे विश्लेषण करणे.

## २.२. प्रास्ताविक

आधुनिक लोकशाही राज्य व शासन व्यवस्थेत नागरिकांना स्वातंत्र्याची अधिक हमी मिळते. काही देशातील राज्यघटनांनी स्वातंत्र्याचा हक्क मूलभूत हक्क म्हणून नागरिकांना बहाल केला आहे. स्वातंत्र्य ही व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे आणि ते मिळविण्यासाठी प्रत्येक व्यक्ती आपल्या पद्धतीने प्रयत्न करीत असतो. रूसो म्हणतो की,

'व्यक्ती हा जन्मतः स्वतंत्र असतो; परंतु नंतर तो अनेक बंधनामध्ये अडकतो. 'समाजाद्वारे समाजहितासाठी आणि निसर्गाच्या हितासाठी व्यक्तीवर अनेक बंधने घातली जातात. परंतु ही बंधने स्वातंत्र्यासाठी हानिकारक असू नये. ही बंधने पाळून व्यक्तीला आपल्या स्वातंत्र्याचा उपभोग घेता यावा. काही देशात सामाजिक बंधनाप्रमाणेच कायद्यानेदेखील व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर बंधने घातली आहेत. १९ व्या आणि २० व्या शतकाच्या पूर्वार्धात आशिया आणि आफ्रिका खंडात अनेक देश पारतंत्र्यात होते. ब्रिटिशांचे साम्राज्य अनेक देशात होते. अशा पारतंत्र्यात असलेल्या देशांत लोकांमध्ये राज्याच्या विरोधात संघटनाची भावना तयार होऊन स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न झाले व्यक्तीला आपल्या सर्वांगीण विकासासाठी काही मूलभूत स्वातंत्र्याची आवश्यकता असते. ते स्वातंत्र्य किंवा हक्क व्यक्तीला प्राप्त झाले तरच तो आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करून घेऊ शकतो.

## २.३ विषय विवेचन

स्वातंत्र्य ही बहुआयामी संकल्पना असून व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि व्यक्ती म्हणून आपला उदरनिर्वाह करण्यासाठी स्वातंत्र्य ही आवश्यक बाब आहे. स्वातंत्र्य हे एका विशिष्ट व्यक्तीचे, समाजाचे किंवा राष्ट्राचे असू शकते. व्यक्तीच्या स्वातंत्र्यात व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्त्व विकासात त्याच्या इच्छेप्रमाणे वर्तन करण्याचा निर्णय घेण्याचा हक्क यांचा समावेश होतो. समूहाचे किंवा समाजाचे स्वातंत्र्य म्हणजे एखाद्या विशिष्ट समाजाचा आपल्या रूढी, परंपरा आणि प्रथा पाळण्याचे स्वातंत्र्य होय. कोणीही व्यत्यय आणणार नाही याची खात्री होय, या समाजाच्या सदस्याला आपले व्यवहार आपल्या इच्छेप्रमाणे करता येणे आणि सामाजिक बंधनातून स्वत:ला दूर ठेवता येईल अशी व्यवस्था असणे होय. राज्याचे किंवा राष्ट्राचे स्वातंत्र्य म्हणजे एखादा राजकीय समाज किंवा राष्ट्र इतर राष्ट्रापासून, त्यांच्या वर्चस्वापासून मुक्त असणे, त्यास आपल्या राज्याबाबत स्वनिर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार असणे होय.

## २.४ स्वातंत्र्य म्हणजे काय?

स्वातंत्र्य ही एक बहुआयामी संकल्पना असून स्वातंत्र्याची नेमकी व्याख्या करणे कठीण आहे. काळ आणि परिस्थितीनुसार स्वातंत्र्याचा विविध प्रकारचा अर्थ घेतला जातो. प्रत्यक्ष व्यवहारात ही संकल्पना आपापल्या सोईने वापरली जाते. इंग्रजीत Liberty हा शब्द Liber या लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे. लॅटिन भाषेतील Liber या शब्दाचा अर्थ बंधनाचा अभाव (Absence of Restraint) असा घेतला जातो. स्वातंत्र्यासंदर्भात Liberty, Independent, Freedom या शब्दांचा उदय Liber (libra) या मूळ शब्दापासून झाला आहे. तात्पर्य, एखाद्या वस्तूची तुला (मोजमाप) करणारा तराजू असा अर्थ घेतला जातो. Liberty या अर्थाने व्यक्तीचे आचरण व व्यवहाराचे मोजमाप करणारे साधन आहे. Liber शब्दाचा दुसरा पैलू Independent आहे. या शब्दाच्या विरुद्धार्थी dependence हा शब्द आहे. याचा अभिप्राय परावलंबित्व किंवा पारतंत्र्य असा होतो. म्हणजेच व्यक्ती स्वत: पूर्ण नसून तो इतरांच्या अधिपत्याखाली आहे असा होतो. स्वत्वाची जाणीव झाल्यावर हळूहळू Independent शब्दाला महत्त्व प्राप्त झाले. Liber शब्दाचा तिसरा पैलू Freedom असा आहे. Freedom म्हणजे मुक्त (free) असा अर्थ होतो. तात्पर्य ' स्वातंत्र्या'वर नियंत्रण असणे आहे. ' स्वातंत्र्यता' मध्ये मूळ शब्द 'तंत्र' आहे. यामध्ये 'स्व' उपसर्ग व 'ता' प्रत्यय लावला

आहे. याचा अर्थ असा होतो की, व्यक्तिस्वातंत्र्यावर घातलेल्या अनिष्ठ बंधनातून व्यक्तीला मुक्त करणे होय. स्वातंत्र्यता व्यक्तीचा सर्वांगीण व नैसर्गिक विकास होण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. परकीय साम्राज्यवादी जोखडातून सुटका करून घेण्यासाठी या शब्दाचा उपयोग करण्यात आला. या तिन्हीही पैलूंचा भिन्नभिन्न संदर्भ समजून घ्यावा लागतो. वर्तमानात आपण ज्या अर्थाने स्वातंत्र्याची संज्ञा वापरतो तो अर्थ ग्रीक नगरराज्यात अपेक्षित नव्हता. आज तो अधिक व्यापक झाला आहे .हे समजून घेतले पाहिजे.

## २.५. 'स्वातंत्र्य' निवडक व्याख्या

स्वातंत्र्य या संकल्पनेची निश्चित व्याख्या करता येत नसली तरी काही विचारवंतांनी या संकल्पनेच्या विविध अंगांनी व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

१) प्रो. लास्की यांच्या मते, ''स्वातंत्र्य म्हणजे मानवी समाजातील व्यक्तींना आपला संपूर्ण विकास होण्याकरिता संधी मिळण्यासारखी परिस्थिती निर्माण करणे होय.''

("By liberty, it is meant the eager maintainance of that atmosphere in which the men have the opportunity to be their best selves.")

२) मॅकेनी या विचारवंताच्या मते, "स्वातंत्र्य म्हणजे बंधनाचा अभाव नाही, तर अनुचित बंधनाऐवजी उचित बंधनांची व्यवस्था होय. ( "Freedom is not the absence of all restraints but rather the substitution of rational onces for the irrational.")

३) सीले यांच्या मते, "स्वातंत्र्य म्हणजे अतिशासनाचा विरोध होय.'

("Liberty is the opposition to excessive the governance.")

४) सामाजिकशास्त्र ज्ञानकोश - "व्यक्तीने वा समूहाने स्वतःच्या स्वत्त्वाचे दृढकथन करणे म्हणजे स्वातंत्र्य होय. 'त्यासाठी तीन घटकांची आवश्यकता असते -

१) व्यक्तिमत्त्वाचे सुसंवादी संतुलन,

२) बंधनांचा अभाव,

३) सतत पुढाकार घेता यावा अशा संघटनात्मक संधी.

५) रेम्से मूरच्या मते, " व्यक्तींना किंवा राष्ट्र, चर्च, कामगार संघटना यासारख्या नैसर्गिक व समयस्फूर्त समूहांना आपल्या विचारांचे चिंतन, आविष्कारण व त्यानुसार कृती करण्याचा, आपल्या अंतर्गत अंगाच्या गुणांचा आपल्या पद्धतीने कायद्याच्या संरक्षणाखाली उपयोग करून घेण्याचा सुरक्षित अधिकार स्वातंत्र्यापासून मिळतो. अट एकच की त्यांनी इतरांच्या अशाच अधिकारांना बाधा पोहोचवता कामा नये.

## २.६ स्वातंत्र्याचे प्रकार

१) **नैसर्गिक स्वातंत्र्य :** स्वातंत्र्याच्या या प्रकारात व्यक्ती हा जन्मतः स्वतंत्र आहे. त्यावर कोणतीही बंधने असू नये. त्याला आपल्या इच्छेनुसार वर्तन करण्याचे स्वातंत्र्य असावे. हॉब्ज या विचारवंताने निसर्ग अवस्थेत मानवाला पूर्ण स्वातंत्र्य होते. ज्याप्रमाणे जंगलात विविध प्राणी आपल्या मर्जीप्रमाणे वावरत होते. त्यांच्यावर कुठलेही बंधन राहत नव्हते. मानवाची जीवनपद्धतीदेखील तशीच असावी. त्याला जे वाटते ते करू द्या. त्याच्यावर कोणतीही बंधने असता कामा नये. हा नैसर्गिक स्वातंत्र्याचा प्रकार स्वैराचाराला निमंत्रण देईल, कारण मानवावर कोणतेही बंधन नसेल तर 'बळी तो कान पिळी' अशी अवस्था होईल व त्यामध्ये जो बलवान आहे तो दुर्बलांचे शोषण करील. त्यामुळे दुर्बलांचे स्वातंत्र्यहनन होईल. या प्रकारात काही बलवान लोकांनाच स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल. हे अल्प लोकांचे स्वातंत्र्य असेल व बहुसंख्याक शोषित बनतील मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे व तो समूह करून राहतो. समूहात समाजाची काही बंधने असतात. ती बंधने पाळणे आवश्यक असते. त्यामुळेच पुढे रूसो असे म्हणतो की, ‘मनुष्य जन्मतः स्वतंत्र आहे; परंतु नंतर तो विविध बंधनात बांधला जातो.’ सामाजिक करारात आपले विविध अधिकार त्यागावे लागतात. स्वातंत्र्याचा हा प्रकार राज्याच्या अगोदरच अस्तित्वात होता व सामाजिक कराराने विचारवंत काही लोकांच्या या अपमंद स्वातंत्र्याला कंटाळूनच सामाजिक करार झाला आणि राज्याची निर्मिती झाली.

२) **नागरी स्वातंत्र्य :** नागरी स्वातंत्र्य राज्याद्वारे आपल्या नागरिकांना प्रदान केले जात असते. त्या स्वातंत्र्यावर राज्याद्वारे काही बंधने घातलेली असतात. व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्वाचा सर्वागीण विकास करून घेण्यासाठी असे स्वातंत्र्य राज्याद्वारे प्रदान केले जाते. या स्वातंत्र्याचा उपयोग नागरिकांना घेता येईल. त्यात कोणताही व्यत्यय येणार नाही याची काळजी राज्याने घ्यावयाची असते. नव्हे ते राज्यासाठी आवश्यक असते. आधुनिक लोकशाही राज्यात हे स्वातंत्र्य लेखी स्वरूपात राज्याद्वारे प्रदान केले जाते व त्याच्या संरक्षणाची तरतूददेखील लेखी स्वरूपात केली जाते. १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेने ‘जागतिक मानवी हक्क जाहीरनामा’ प्रसिद्ध केला. त्यामध्ये त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्याचा उल्लेख केलेला दिसतो, जो अनेक देशांनी नागरी स्वातंत्र्यामध्ये समाविष्ट केला आहे. या स्वातंत्र्याचे रक्षण करणे, स्वातंत्र्यावर योग्य ती बंधने घालणे आणि त्यातून सर्वांचा समान विकास होईल अशी परिस्थिती निर्माण करणे हे शासनाचे कर्तव्य ठरते. राज्याची स्थापना ही व्यक्तीच्या कल्याणासाठी झाली असून नागरी स्वातंत्र्याच्या माध्यमातून व्यक्ती आपला विकास साधत असतो. राज्यात सर्व नागरिकांच्या विकासाचा विचार केला जातो. विशिष्ट संस्थेद्वारे या स्वातंत्र्यावर बंधने येणार नाही याची काळजी घेतली जाते.

३) **राजकीय स्वातंत्र्य :** व्यक्तीला राज्यसंस्थेत सहभागी होण्यासाठी आणि या संस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी राजकीय स्वातंत्र्याची आवश्यकता असते. त्यासाठी व्यक्तीला काही अधिकार मिळणे आवश्यक असते. मतदानाचा अधिकार, निवडणुकीला उभे राहण्याचा अधिकार, निवडून येण्याचा आणि राज्यसंस्थेत सहभागी होऊन त्यास नियंत्रित करण्याचे स्वातंत्र्य. त्याचबरोबर शासनावर व शासनाच्या धोरणावर टीका

करण्याचा अधिकार यामुळे व्यक्ती राजकीय स्वातंत्र्याचा उपभोग घेऊ शकतो. देशातील महत्वाच्या पदावर नियुक्त होण्याचा अधिकार व्यक्तीला मिळणे आवश्यक असते, ज्याद्वारे राज्यावर आणि राज्यातील महत्त्वाच्या संस्थांवर नियंत्रण ठेवले जाते. व्यक्तीला राजकीय स्वातंत्र्य मिळावे यासाठी अनेक देशात संघर्ष झाल्याचा इतिहास आहे. फ्रेंच राज्यक्रांती, अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध, भारताचे स्वातंत्र्य आंदोलन यामध्ये राजकीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न झाले आहे. राज्यसंस्था ही देशातील महत्त्वाची संस्था असते व तिच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी राजकीय स्वातंत्र्य हे महत्त्वाचे असते.

४) **आर्थिक स्वातंत्र्य :** आर्थिक बाब ही मानवी जीवनातील एक महत्त्वाची बाब आहे. आर्थिक स्वातंत्र्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य हे अर्थहीन आहे. व्यक्तीच्या मूलभूत गरजा पूर्ण झाल्याशिवाय त्याच्या इतर स्वातंत्र्याला किंमत नसते. प्रत्येकाला आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याचे स्वातंत्र्य असावे. त्यासाठी आवश्यक परिस्थिती राज्याने निर्माण करावी. सर्व नागरिकांना किमान उत्पन्नाची हमी देणे, बेकारी भत्ता, अपघातात मदत, आजारपणात त्यास विशिष्ट मदत करणे, आर्थिक संकटप्रसंगी त्यास अर्थसाहाय्य करणे, व्यक्तीला आर्थिक विवंचनेपासून मुक्त करणे आणि आर्थिक सुरक्षा देणे यावरच त्याचे आर्थिक स्वातंत्र्य अवलंबून आहे. आर्थिक स्वातंत्र्याचा अर्थ औद्योगिक लोकशाहीच्या अंगानेदेखील घेतला जातो. औद्योगिक कारखान्यात व्यवस्थापनाबरोबर कामगारांनादेखील समान प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. उत्पादित मालातून मिळणाऱ्या नफ्याचे लोकशाही पद्धतीने वितरण झाले पाहिजे. विविध विचारसरणीद्वारे आर्थिक स्वातंत्र्याचा वेगवेगळ्या पद्धतीने अर्थ काढला जातो. परंतु सारांशत: आर्थिक स्वातंत्र्यात आर्थिक विवंचनेपासून मुक्तता, मूलभूत गरजांची पूर्तता, सामाजिक सुरक्षेच्या माध्यमातून आर्थिक उपाययोजना करणे, गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी कमी करणे, प्रत्येकाला आपली उपजीविका निवडण्याचे स्वातंत्र्य, संपत्तीचे वितरण योग्य प्रमाणात करणे इत्यादी बाबींचा समावेश होतो.

५) **राष्ट्रीय स्वातंत्र्य :** ज्याप्रमाणे व्यक्तीच्या जीवनात स्वातंत्र्याचे महत्त्वाचे स्थान आहे त्याचप्रमाणे राष्ट्राचे स्वातंत्र्यदेखील महत्त्वाचे आहे. जो देश पारतंत्र्यात असेल तो आपल्या नागरिकांना स्वातंत्र्य देऊ शकत नाही. जनतादेखील दुय्यम नागरिक बनलेली असते. राष्ट्रीय स्वातंत्र्यावरच नागरिकांचे राजकीय, नागरी व आर्थिक स्वातंत्र्य अवलंबून राहत असल्यामुळे राष्ट्रीय स्वातंत्र्य ही मूलभूत बाब आहे. पारतंत्र्यात असणाऱ्या देशातील नागरिक स्वातंत्र्यासाठी प्रयत्नशील असतात. १९ व्या शतकात आणि २० व्या शतकाच्या पूर्वार्धात अनेक देश हे ब्रिटिश वसाहतीच्या अधिपत्याखाली होते. त्यापासून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी नागरिकांना मोठा लढा उभा केल्याचा इतिहास आहे. अमेरिकन लोकांना १७७६ साली तर भारतीयांना १९४७ साली स्वातंत्र्य प्राप्त झाले. या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या देशात राज्यघटना अस्तित्वात आली व या राज्यघटनेने नागरिकांना स्वातंत्र्याचे अधिकार प्रदान केले. राष्ट्रीय स्वातंत्र्य म्हणजे राष्ट्राबाहेरील कोणत्याही सत्तेचे किंवा संस्थेचे नियंत्रण राष्ट्रावर नसणे. बाहेरच्या सत्तेपासून स्वतंत्र किंवा मुक्त असे राष्ट्र होय. कोणताही बाह्यंगत दबाव राष्ट्रावर असू नये व राष्ट्राची सत्ता देशातील नागरिकांच्या हातात असावी. ती इतर बाह्य शक्तीकडे असू नये. थोडक्यात राष्ट्राचे बाह्य सर्वभौमत्व अबाधित असावे आणि ते राष्ट्र परकीय बंधनापासून मुक्त असावे. राष्ट्रीय स्वातंत्र्य

ही व्यक्तीच्या, त्या देशाच्या नागरिकांच्या जीवनातील एक महत्त्वाची बाब असून त्यासाठी व्यक्ती आपल्या प्राणाची आहुती देण्यास तयार असतो. राष्ट्रप्रेमातून राष्ट्रीय स्वातंत्र्याची प्राप्ती करून घेण्याची उमेद निर्माण होत असते. भारत, दक्षिण आफ्रिका आणि म्यानमारचे उदाहरण याबाबत देता येईल. भारतात महात्मा गांधी, दक्षिण आफ्रिकेत नेल्सन मंडेला आणि म्यानमारमध्ये ॲन सॅन सुची यांनी राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी लढा उभा केल्याचा इतिहास आहे. त्यासाठी त्यांनी तुरूंगवास भोगला. काहींना राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी बलिदान द्यावे लागले. त्यामुळे राष्ट्रीय स्वातंत्र्य ही बाब मानवी जीवनातील महत्त्वाची बाब आहे.

६) **व्यक्तिगत स्वातंत्र्य :** व्यक्तीला आपल्या सर्वांगीण विकासासाठी काही मूलभूत स्वातंत्र्याची आवश्यकता असते. त्याला आपल्यामधील क्षमतांचा विकास करून घेण्यासाठी ज्या स्वातंत्र्याची आवश्यकता असते त्या स्वातंत्र्याला व्यक्तिगत स्वातंत्र्य असे म्हणतात. ब्लॅकस्टोन यांच्या मते, 'व्यक्तिगत स्वातंत्र्य हे तीन दिशेने असते - १) आरोग्य आणि जीवनाचे स्वातंत्र्याबरोबर प्रतिष्ठेची सुरक्षितता, २) व्यक्तिगत स्वातंत्र्यात मुक्त भ्रमण करण्याचे स्वातंत्र्य अपेक्षित आहे. ३) व्यक्तिगत संपत्ती जमा करणे, ती बाळगणे व तिचा उपभोग घेणे या बाबींचा समावेश व्यक्तिगत स्वातंत्र्यात होतो. सर अनेस्ट बार्करच्या मते, व्यक्तिगत स्वातंत्र्यात जीवन आरोग्यात येणाऱ्या संकटांपासून मुक्तता मिळविण्यासाठी भौतिक स्वातंत्र्य आणि शारीरिक संचालनात व्यक्तीस पूर्ण स्वातंत्र्य, विचार आणि विश्वासाच्या अभिव्यक्तीचे पूर्ण स्वातंत्र्य, आपल्या इच्छेनुसार काम करण्याचे स्वातंत्र्य या प्रमुख बाबींचा समावेश व्यक्तिगत स्वातंत्र्यात होतो. जॉन स्टुअर्ट मिल या विचारवंताने आपल्या 'ऑन लिबर्टी' या ग्रंथात व्यक्तिगत स्वातंत्र्याचा पाठपुरावा केला आहे. मिलच्या मते, व्यक्तिगत स्वातंत्र्य म्हणजे असे स्वातंत्र्य की ज्या व्यक्ती इतरांच्या स्वातंत्र्य उपभोगण्याच्या मार्गात अडथळा न आणता उपभोगत असते. तो व्यक्तिगत स्वातंत्र्याची संकल्पना मांडताना मिलने त्याची दोन प्रकारात विभागणी केली आहे. स्वत: संबंधी स्वातंत्र्य व इतरांसंबंधी स्वातंत्र्य मिल म्हणतो की, स्वत:संबंधी स्वातंत्र्यात राज्याने कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये. व्यक्तीला आपल्या जीवनात वेगवेगळे निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्याचे एखादे कार्य स्वत: संबंधी असेल तर त्यात राज्याने हस्तक्षेप करू नये. परंतु जेव्हा त्या कार्याचा परिणाम इतरांवर होत असेल तर त्यावेळेस राज्याने हस्तक्षेप करावा. इतरांसंबंधी स्वातंत्र्यात राज्याने कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी हस्तक्षेप करावा. आपल्या क्षमतांचा सर्वांगीण विकास करून घेण्यासाठी व्यक्तीला व्यक्तिगत स्वातंत्र्य हे आवश्यक असते.

७) **घटनात्मक स्वातंत्र्य :** आधुनिक राष्ट्र - राज्यात घटनात्मक स्वातंत्र्याची संकल्पना अधिक महत्त्वाची बनत चालली आहे. या राज्यात लिखित राज्यघटना स्वीकारल्या जाऊ लागल्या असून या राज्यघटनांत नागरिकांना लिखित स्वरूपात काही मूलभूत अधिकार प्रदान केले आहेत तो स्वातंत्र्याचा अधिकारदेखील समाविष्ट करण्यात येतो. ज्या देशातील नागरिकांना राज्यघटनेद्वारे काही स्वातंत्र्य प्रदान केली जातात त्याला घटनात्मक स्वातंत्र्य असे म्हणतात. भारतीय राज्यघटनेने नागरिकांना स्वातंत्र्य प्रदान केले आहे. राज्यघटनेच्या भाग ३, कलम १९ नुसार नागरिकांना स्वातंत्र्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. दुसराही एक अर्थ स्वातंत्र्याचा घेतला जातो

तो म्हणजे, ज्या राज्यात जनतेचे शासन असते. शासनाची निवड जनता स्वत: करते आणि हे शासन जनतेला जबाबदार असते. त्या राज्यात नागरिकांना घटनात्मक स्वातंत्र्य आहे असे मानले जाते. आधुनिक जगातील बहुतेक लोकशाही राज्यांनी नागरिकांना असे स्वातंत्र्य बहाल केले आहे.

## २.७ जॉन स्टुअर्ट मिल [१८०६-१८७८] : स्वातंत्र्याची कल्पना

जॉन स्टुअर्ट मिल यांनी स्वातंत्र्य विषयी विचार 'ऑन लिबर्टी' (१८५९) या पुस्तकात मांडले आहेत. हे पुस्तक म्हणजे त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानातील मैलाचा दगड ठरला आहे. मॅक्सीच्या शब्दात सांगायचे तर, विचार आणि वादविवाद स्वातंत्र्यावरील मिलचा निबंध हा राजकीय साहित्यातील एक अतिशय उच्च श्रेणीचा अध्याय आहे. या प्रकरणात मिलची गणना मिल्टन, स्पिनोझा, व्होल्टेअर, रूसो, पेन, जेफरसन आदी विद्वाना प्रमाणे करण्यात आली आहे.

### १. स्वातंत्र्य का आवश्यक आहे ?

जे.एस.मिलच्या काळात राजकीय आणि आर्थिक परिस्थितीमध्ये मोठे बदल झाले होते. राज्याचे कार्यक्षेत्र, शक्ती आणि व्याप्ती सातत्याने वाढत होती. बेन्थमच्या विचारांनी प्रभावित झालेल्या राज्यांनी जीवनाच्या विविध क्षेत्रात अधिकाधिक कायदे तयार करण्यास सुरुवात केली. जनहिताच्या नावाखाली शासनाने जीवनाच्या विविध क्षेत्रांचे नियमन करण्यासाठी कायदे करण्यास आरंभ केला. ब्रिटीश संसदेने बालमजुरीशी संबंधित कायदे केले होते, ज्यामुळे मुलांचे उपजीविका मिळविण्याचे स्वातंत्र्य आणि पालकांचे त्यांना कामावर पाठविण्याचे स्वातंत्र्य मर्यादित होते. बेंथमच्या विचाराचा परिणाम म्हणून, राज्याच्या कामाची व्याप्ती वाढली, शासकीय सेवांच्या विस्तारामुळे शासनाचा आकार वाढला आणि कायद्यांच्या वाढत्या संख्येमुळे व्यक्तींच्या स्वातंत्र्यावर अनेक बंधने आली.

इंग्लंडमध्ये व्यक्ती की राज्य असा वाद चालू होता. तेव्हा कायदा बनविण्याच्या क्षेत्रात संसद सर्वोच्च होती, बहुमताच्या इच्छेची बेरीजेवर प्रतिनिधित्व करणारे त्यांचे कार्य जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात हस्तक्षेप करू शकत होते. मिलला भीती वाटत होती की स्वातंत्र्याला सर्वात मोठा धोका शासनाकडून नाही, तर बहुसंख्यांकडून येतो .जो नवीन कल्पनांबद्दल असहिष्णु आहे, जो विरोधी अल्पसंख्याकांकडे संशयाने पाहतो बहुसंख्यांकाच्या आधारावर त्यांना दाबून टाकु इच्छितो एक अशी शक्यता होती की या संदर्भात. जुन्या पिढीतील उदारमतवाद्यांनी कधीही विचार केला नसेल.

त्यांची मुख्य समस्या ही राहिली आहे की, सत्तारूढ अल्पसंख्याक वर्गाच्या हातातून राज्यकारभाराची सूत्रे काढून घेतल्यास सर्व प्रश्न सुटतील. जेम्स मिल यांचा विचार होता की प्रतिनिधित्वाच्या सुधारणांद्वारे, मताधिकाराचा विस्तार आणि थोडया- बहुत सार्वजनिक शिक्षणाच्या माध्यमातून राजकीय स्वातंत्र्याच्या सर्व गंभीर समस्यांचे निराकरण केले जाईल. १८५९ पर्यंत, हे स्पष्ट झाले होते की या सर्व सुधारणांनंतरही अपेक्षित परिणाम दिसला नाही. राजकीय संघटनेच्या चक्रव्यूहात, स्वातंत्र्याच्या

अभिमन्यूचे रक्षण करणे ही एक मोठी समस्या होती. जुन्या उदारमतवाद्यांना हे समजू शकले नाही, परंतु उदारमतवादी शासनाच्या मागे उदारमतवादी समाजही असावा हे जे.एस.मिलला पूर्णपणे उमजले होते.

### २. जे.एस मिल: स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा तत्वज्ञानात्मक आधार

मिल ने दोन प्रकारच्या तात्विक आधारांवर स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे समर्थन केले आहे - १) व्यक्तीच्या दृष्टिकोनातून २) समाजाच्या दृष्टिकोनातून.

मिलच्या मते, व्यक्तीचे मूळ उद्दिष्ट हे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे आहे आणि हा विकास केवळ स्वातंत्र्याच्या मुक्त वातावरणातच अविरतपणे चालते.मिलने समाजाच्या विकासाच्या दृष्टिकोनातूनही स्वातंत्र्याचे वातावरण अपरिहार्य मानले आहे. त्यांच्या मते समाजाचा विकास विशिष्ट प्रकारच्या व्यक्तींमधून होतो. हे लोक कला, विज्ञान, साहित्य आणि इतर क्षेत्रात नवनवीन शोध आणण्याचा प्रयत्न करतात, परंतु समाजाची रचना रूढिवादी आहे आणि बहुसंख्य बुद्धीहीन लोक परंपरावाद्यांच्या आधार घेतात आणि सामाजिक बदल किंवा सुधारणा घडवून आणणाऱ्या महान लोकांच्या मार्गात अडथळा निर्माण करतात . त्यामुळे समाजाच्या सर्वांगीण विकास व प्रगतीकरिता सर्व घटकांना स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे. मिलच्या मते व्यक्ती आणि समाज या दोघांच्याही विकासासाठी स्वातंत्र्य अपरिहार्य आहे.

### ३. जे.एस.मिल :स्वातंत्र्याची वैशिष्ट्ये -

मिलने स्वातंत्र्याची दोन वैशिष्ट्ये दिली आहेत -

१) व्यक्ती स्वतःचा मालक आहे, म्हणजेच व्यक्तीचा स्वतःवर सर्वोच्च अधिकार आहे. मिलच्या मते, मनुष्य हा त्याच्या शरीराचा आणि मनाचा मालक आहे आणि म्हणून त्याला स्वतःशी संबंधित प्रत्येक गोष्टीत पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. या क्षेत्रातील व्यक्तीच्या वर्तनावर समाजाने कोणतेही बंधन घालू नयेत. जोपर्यंत तो इतरांना त्रास देत नाही तोपर्यंत त्याला 'स्व'शी संबंधित सर्व काम करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असावे.

२) ''एखाद्याला हवे तसे करण्याचे स्वातंत्र्य'' आणि असे स्वातंत्र्य नियंत्रित केले जाऊ शकते. जर भीती असेल तर एखाद्या व्यक्तीला अशा पुलावरून जाण्यापासून रोखता येते, कारण एखाद्या व्यक्तीला नदीत पडण्याची इच्छा असू शकत नाही. त्याची इच्छा पूल ओलांडण्याची आहे, परंतु त्यावर नियंत्रण ठेवणे योग्य आहे कारण यापेक्षा जगण्याची इच्छा मोठी आहे म्हणून त्यास संरक्षण मिळते.

### २.७.१ मिल यांच्या स्वातंत्र्याचे प्रकार

जे एस मिल यांनी स्वातंत्र्याचे दोन प्रकार सांगितले आहेत त्याची चर्चा पुढील प्रमाणे

**प्रथम : विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य.**

मिल यांचा असा विश्वास आहे की बौद्धिक किंवा वैचारिक स्वातंत्र्य केवळ ते स्वीकारणाऱ्या समाजासाठीच नव्हे तर ते उपभोगणाऱ्या व्यक्तीलाही लाभदायक आहे. व्यक्तीच्या वैचारिक स्वातंत्र्यावर बंधने घालण्याचा असा अधिकार समाज आणि राज्याला नाही. मिलच्या मते, जर संपूर्ण समाज एका बाजूला असेल आणि एकटा माणूस दुसऱ्या बाजूला असेल, तर त्या व्यक्तीला त्याचे मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. मिलच्या शब्दात सांगायचे तर, "जर एक माणूस सोडून संपूर्ण मानवजात एकाच मताची असेल, तर त्या एका माणसाला जबरदस्तीने गप्प करण्याचा अधिकार नाही. जसे की जर त्या व्यक्तीकडे शक्ती असेल, तर त्याला मानवजातीला. गप्प ठेवण्याचा अधिकार. असतं नाही. मिलने ज्या युक्तिवादांच्या आधारे विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे समर्थन केले आहे:त्याची चर्चा थोडक्यात करता येईल.

१. **सत्य दडपण्याची भीती -** मिलच्या मते, विचारांवर बंधने लादणे म्हणजे सत्यावर बंधने लादणे आणि सत्यावर बंधने लादणे म्हणजे उपयोगिता. समाज. तो दडपून टाकायचा आहे. खरं तर प्रत्येक विचार किंवा श्रद्धेला सत्याचा एक भाग असतो.

२. **सत्याला विविध पैलू असतात-** सत्याचे विशाल व विविधतापूर्ण असते. व्यक्तीची अवस्था सत्याच्या शोधात आंधळ्यासारखी असते. परंतु आपल्या अनुभवाच्या आधारे ते केवळ अर्धवट सत्य पूर्णपणे समजून घेण्याचा प्रयत्न केला जातो.सत्याचे पूर्ण आणि वास्तविक रूप समजून घेण्यासाठी ते विविध दृष्टिकोनातून समजून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले पाहिजे. . चर्चा, युक्तिवाद आणि वादविवादाने विविध कल्पना स्पष्ट केल्या जातात. व यामाध्यमातून सत्याचा शोध घेता येतो.

३. **समाजाच्या विकासासाठी -** मिलच्या मते, समाज सामान्यतः रूढिवादी आणि परंपरावादी आहे. त्याला नवे विचार ऐकायला आवडत नाहीत, तर समाजसुधारकांना समाजात प्रचलित असलेला रूढीवादी विचार, , परंपरा बदलण्यासाठी प्रयत्नशील असतात. हा बदल विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यातूनच येऊ शकतो.हा व्यक्ती व समाजाच्या हिताचा मार्ग आहे .

४. **उच्च दर्जाच्या नैतिक चारित्र्याचा विकास -** विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यामुळे उच्च पातळीच्या नैतिक चारित्र्याचा जन्म आणि विकास होतो. सार्वजनिक प्रश्नांवर मुक्त चर्चा करून आणि राजकीय निर्णयांमध्ये जनतेचा सहभाग यामुळे लोकांमध्ये नैतिक विश्वासाची भावना निर्माण होते.

५. **ऐतिहासिक आधार -** मिलचे समर्थक असे म्हणतात की इतिहास देखील स्वातंत्र्याच्या बाजूने पाठिंबा देतो. सॉक्रेटिस, येशू ख्रिस्त आणि मार्टिन ल्यूथर यांची उदाहरणे देऊन मिलने आपल्या मुद्द्याला पुष्टी दिली. मिलच्या शब्दांत, "मानवजातीला कधीतरी हे पुन्हा पुन्हा सांगण्याची गरज नाही. ज्यामध्ये ग्रीसमध्ये सॉक्रेटिस नावाची व्यक्ती होती, त्याचे विचार समाजातील बहुतेक लोकांच्या विचारांपेक्षा भिन्न होते आणि समाजाच्या ठेकेदारांनी सॉक्रेटिसला त्याच्या भिन्न

विचारांमुळे दारू पिण्याची शिक्षा दिली, तर सत्य हे आहे की त्याचे विचार ते लोक चुकीचे होते आणि सॉक्रेटिस बरोबर होते. मिल यांनी तोच युक्तिवाद अस्खलित भाषेत पुढे चालू ठेवत म्हटले की, "येशू ख्रिस्ताला समाजाने जेरुसलेममध्ये वधस्तंभावर खिळले होते, याची आठवण मानवजातीला पुन्हा-पुन्हा करून देण्याची गरज नाही, कारण तो समाजाने स्वीकारलेल्या विचारांच्या विरोधात होता. विचार मांडले गेले, पण इतिहास साक्षी आहे की. ज्यांनी त्याला वधस्तंभावर खिळले त्यांच्यापेक्षा त्या माणसाचे (येशूचे) विचार चांगले होते. म्हणूनच मिलने आग्रह केला: "विचारांच्या अभिव्यक्तीवर अंकुश ठेवण्याचा एक विचित्र दोष म्हणजे असे करणे म्हणजे मानवजातीच्या भविष्यातील आणि वर्तमान पिढ्यांना लुटणे होय. "कधीकधी समाज काही नवीन आणि अनोख्या कल्पना असलेल्या लोकांना निंदक किंवा विक्षिप्त समजतो, त्यांच्या कल्पनांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा तिरस्कार करतो आणि अपमान करतो. सत्य हे आहे की प्रत्येक मूळ विचारवंत, समाजसुधारक समाज जे नवीन सांगतो ते प्रथम ऐकतो. धक्कादायक आहे.प्रत्येक विचारवंत आणि समाजसुधारक प्रथमतः विलक्षण आणि विक्षिप्त मानला जातो, परंतु सत्य हे आहे की या लहरी आणि कल्पनांचा मानव जातीवर प्रभाव पडला आहे.

व्यक्तीच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे म्हणूनच मिल म्हणतात की या तथाकथित विक्षिप्त लोकांनाही त्यांचे मत व्यक्त करू द्या. मिलच्या शब्दात सांगायचे तर, 'कोणताही समाज जो विक्षिप्तपणा, टिंगल आणि तिरस्काराच्या अधीन नाही तो परिपूर्ण समाज असूच शकत नाही.' विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर कोणत्याही प्रकारच्या निर्बंधाच्या बाजूने मिल नाही. विचारांना बहर येऊ द्या, त्यांना व्यक्त होऊ द्या, त्यांना साखळी करू नका, असा त्याचा स्पष्ट विश्वास आहे. मानवी समाजाच्या विकासासाठी आणि उत्थानासाठी कल्पना हे आवश्यक प्रेरणास्रोत आहेत. थोडक्यात, मिलने समाजाची प्रयोगशाळा म्हणून कल्पना करून सर्व प्रकारच्या कल्पना आणि दृष्टीकोनांच्या अभिव्यक्तीचा जोरदार पुरस्कार केला. हे बौद्धिक उत्कर्षाला चालना देते आणि नैतिक व्यक्तिवादाला बळकटी देते.

**द्वितीय : कार्याचे स्वातंत्र्य :**

मिलच्या मते, स्वातंत्र्याची दुसरी बाजू म्हणजे ' कार्याचे स्वातंत्र्य'. मिलच्या शब्दात सांगायचे तर, " संबंधित विचारांची अंमलबजावणी करण्याचे स्वातंत्र्य नसेल तर विचारांचे स्वातंत्र्य अपूर्ण आहे." मुक्त कार्य नसताना, मुक्त विचार हा पक्ष्यासारखा असतो ज्याला उडायचे असते पण पंख नसतात. , जसे विचारस्वातंत्र्यावर कोणतेही बंधन नसावे, तसेच कार्य स्वातंत्र्यावर कोणतेही बंधन नसावे का? व्यक्ती आणि समाजाच्या कृतींवर कोणतेही बंधन नसावे का? दोन प्रकारांचा स्वातंत्र्याच्या उल्लेख केला आहे. -प्रथम, ज्या क्रिया व्यक्ती 'स्व' शी संबंधित असतात, त्यांना 'स्व-संबंधित क्रिया' म्हणतात आणि दुसरे, ज्या क्रियांचा इतर लोकांवर परिणाम होतो, त्यांना इतर संबंधित क्रिया म्हटले जाते. मिलच्या मते, 'स्व-संबंधित क्रिया एखाद्या व्यक्तीच्या अशा क्रिया आहेत, ज्याचा इतर लोकांवर परिणाम होत नाही. या क्रिया थेट व्यक्तीच्या वैयक्तिक कृतींशी संबंधित असतात, जसे उदा. सिगारेट. पिणे, कपडे घालणे, मद्यपान करणे, जुगार खेळणे इ. तो सिगारेट पितो की पान खातो, शाकाहारी असो की मांसाहारी, बटाटा खातो की कांदा, याने समाजाला काही फरक पडत नाही. व्यक्तीला त्याच्या

इच्छेनुसार स्वतःशी संबंधित असे अत्यंत खाजगी काम करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे, ज्यामध्ये राज्याने कोणतेही बंधन घालू नये. असे मानले जाते की जोपर्यंत एखादी व्यक्ती असे कार्य करते. ज्याचा प्रभाव फक्त त्याच्यावर पडतो इतरांवर नाही, तोपर्यंत राज्याने हस्तक्षेप करू नये. केवळ असे केल्याने एखादी व्यक्ती त्याच्या नैसर्गिक क्षमतेचा सर्वोच्च विकास करू शकते, त्याचे आनंद आणि कल्याण वाढवू शकते.

मिलच्या मते, ' इतरासंबंधि कार्य' या व्यक्तीच्या त्या क्रिया आहेत ज्यांचा समाज आणि इतर व्यक्तींवर परिणाम होतो आणि अशा कृतींमध्ये राज्य हस्तक्षेप करू शकते. उदाहरणार्थ, शांतता भंग करणे, चोरी करणे, सार्वजनिक ठिकाणे घाण करणे इत्यादी आपल्या कृती आहेत ज्याचा परिणाम समाजातील इतर लोकांवर होतो. म्हणून, इतरांना प्रभावित करणार्या कृतींच्या संबंधात व्यक्तीला स्वातंत्र्य दिले जाऊ शकत नाही. व्यक्तिस्वातंत्र्य नक्कीच आवश्यक आहे, पण इतरांच्या स्वातंत्र्याचा बळी देऊन नाही. माणूस स्वतःच्या घरात दारू पिण्यास मोकळा आहे, पण दारू पिऊन रस्त्यावर गोंधळ उडवून शेजाऱ्यांची झोप उडवली तर त्याला या कामासाठी मोकळा हात दिला जाऊ शकत नाही.

### २.७.२ मिलच्या स्वातंत्र्याच्या मर्यादा:

व्यक्तिस्वातंत्र्यामध्ये हस्तक्षेपाची परिस्थिती मिल हे व्यक्तिस्वातंत्र्याचे सर्वात मोठे पुजारी होते, परंतु काही परिस्थितींमध्ये त्यांनी स्वातंत्र्यावर बंधने लादण्यास मागेपुढे पाहिले नाही. त्यांनी नमूद केलेल्या परिस्थिती पुढीलप्रमाणे आहेत:

१. एखाद्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा गैरवापर केल्यास इतर व्यक्तींचे स्वातंत्र्य धोक्यात येण्याची शक्यता असते. या संदर्भात मिलने ड्रायव्हिंग लायसन्सचे उदाहरण दिले आहे. अज्ञानी चालकाचे स्वातंत्र्य यामुळे रस्त्याने चालणाऱ्या व्यक्तीचे स्वातंत्र्य धोक्यात येऊ शकते. त्याचप्रमाणे चोर आणि दरोडेखोरांनाही स्वातंत्र्यापासून वंचित ठेवले पाहिजे, कारण त्यांच्या कृत्यांमुळे समाजातील इतर नागरिकांच्या स्वातंत्र्याला बाधा निर्माण होते .

२. मिलच्या मते, जेव्हा समाजाची किंवा राज्याची सुरक्षा धोक्यात येते तेव्हा व्यक्तीचे स्वातंत्र्य मर्यादित असू शकते. उदाहरणार्थ, राज्यावरील बाह्य हल्ल्यादरम्यान सर्व नागरिकांकडून अनिवार्य लष्करी सेवा अपेक्षित असू शकते.

३. जेव्हा एखाद्या व्यक्तीकडून त्याच्या स्वातंत्र्याचा असा गैरवापर होतो ज्यामुळे त्याचे सामाजिक कर्तव्य पार पाडण्यात अडथळा निर्माण होतो. उदाहरणार्थ, मिल मद्यपान करणे ही स्वतःशी संबंधित कृती मानततो, परंतु कर्तव्यावर असताना पोलीस हवालदाराला दारू पिण्याचे स्वातंत्र्य देत नाही कारण त्याला भीती वाटते की मद्यपी सैनिक शांतता प्रस्थापित करण्याऐवजी शांतता भंग करण्याचे काम करेल.

४. ज्या वैयक्तिक कृत्यांमुळे एखादी व्यक्ती स्वत:चे संपूर्ण नुकसान करते, अशा कृत्यांना राज्य प्रतिबंधित करू शकते जसे की आत्महत्या. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीला पुलावरून नदी ओलांडायची असेल जी कोसळण्याच्या अवस्थेत आहे, तर त्याला पूल ओलांडण्यापासून रोखले जाऊ शकते कारण त्या व्यक्तीला नदी ओलांडायची आहे. पण नदीत पडायचे नाही. त्यामुळे त्याची दुसरी इच्छा (नदीत पडू नये) त्याच्या

पहिल्या इच्छेपेक्षा (नदी ओलांडण्याची) अधिक प्रबळ असते. त्यामुळे त्या मोठ्या इच्छेच्या पूर्ततेसाठी सकारात्मक हस्तक्षेप करता येतो.

### २.७.३ मिलच्या स्वातंत्र्याच्या सिद्धांतावरील टीका

मिलचा स्वातंत्र्याच्या सिद्धांतांताचे अमूल्य योगदान असूनही, अनेक बाबतीत सदोष आणि विसंगत मानला जातो. तार्किकदृष्ट्या विश्लेषण केले असता अनेक टीका केल्या जातात.

१. **पोकळ आणि नकारात्मक स्वातंत्र्य -** "प्रा. बार्कर यांच्या मते, " मिल हा पोकळ स्वातंत्र्य आणि काल्पनिक व्यक्तीचा संदेश देणारा संदेष्टा होता. त्याला कोणतेही अधिकार नव्हते. संबंधात कोणतेही तत्वज्ञान नव्हते, हे अधिकार स्वातंत्र्याच्या कल्पनेला ठोस अर्थ देतात.

२ **समानतेकडे दुर्लक्ष -** मिल स्वातंत्र्यावर भर देतात, पण समानतेकडे दुर्लक्षाने पाहतात. तो स्वत:मध्ये स्वातंत्र्य पूर्ण मानतो, परंतु स्वातंत्र्याच्या अर्थासाठी समानता देखील आवश्यक आहे. समानतेपेक्षा स्वातंत्र्य अधिक उपयुक्त असू शकते, परंतु समानतेच्या अनुपस्थितीत, स्वातंत्र्य फार काळ टिकू शकत नाही.

३. **विक्षिप्त आणि विक्षिप्त लोकांना स्वातंत्र्य देणे -** विक्षिप्त आणि विक्षिप्त लोकांना देखील अभिव्यक्ती स्वातंत्र्य देते. त्यानां असे वाटते की या विक्षिप्तपणातून सॉक्रेटिसचा उदय झाला पाहिजे, जो समाजात क्रांती घडवून आणू शकेलआणि बदलाचा मार्ग मोकळा करू शकेल, परंतु डेव्हिडसन म्हणतो की विक्षिप्तपणा हे त्याच्या उत्कृष्टतेचे नव्हे तर चारित्र्याच्या कमकुवततेचे लक्षण आहे. त्याला प्रोत्साहन देण्याऐवजी परावृत्त करणे आवश्यक आहे.

४. **कामाच्या स्वातंत्र्याची भ्रामक विभागणी -** कामाच्या स्वातंत्र्याला दोन वर्गांमध्ये विभागणे चुकीचे आहे - स्व-संबंधित आणि अति-संबंधित. किंबहुना व्यक्तीच्या कृतीत असा भेद करता येत नाही. मिलच्या मते, दारू पिणे ही स्वतःशी संबंधित कृती आहे, जेव्हा एखादी व्यक्ती दारूच्या नशेत रस्त्यावर गोंधळ घालते तेव्हाच ते सामाजिक (परंतु सापेक्ष) स्वरूप धारण करते, -साहित्य सरज पण स्वतःच्या घरात दारू पिणे हे निव्वळ स्वसंबंधित कृत्य नसून त्याचा पत्नी आणि मुलांवर खोलवर परिणाम होतो. मद्यपीची मुले त्याला पाहून त्या व्यसनात अडकतात आणि त्यामुळे समाजाचे नुकसान होते. वास्तविक, व्यक्तीचे असे कोणतेही कृत्य नाही ज्याचा समाजावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम होत नाही. आत्महत्या ही वैयक्तिक कृती म्हणूनही विचार करता येणार नाही. -

५. **व्यक्ती आणि समाज यांच्यातील नातेसंबंधांचे चुकीचे चित्रण -** लिंडसेयांच्या मते, मिलच्या स्वातंत्र्याच्या कल्पनांमधून दोन तथ्ये समोर येतात - एक म्हणजे राज्य हे व्यक्तीच्या हिताचे आहे या त्याच्या गृहितकापासून मिल कधीही मुक्त होऊ शकत नाही. एक मदतनीस पण एक अडथळा आणि त्याचा हस्तक्षेप कमी इच्छित आणि अधिक अनावश्यक आहे. दुसरे म्हणजे समाज हा व्यक्तींच्या नैसर्गिक आणि ऐच्छिक विकासाचा परिणाम आहे हे मानसशास्त्रीय सत्याचा अभाव तो स्वीकारू शकला नाही; जेव्हा लोक एकमेकांशी संघर्ष करण्यासाठीच नव्हे तर एकमेकांवर अधिक अवलंबून

असतात. मिलचे राज्य हे असे कृत्रिम राज्य आहे. लिंडसेच्या शब्दात सांगायचे तर, लोक एकमेकांपासून पूर्णपणे वेगळे राहून एकटेपणाचे जीवन जगत आहेत आणि पहिल्यांदाच राज्यात एकत्र आले आहेत.

६. **अविकसित देशांतील नागरिकांना स्वातंत्र्य नाकारणे -** मिल केवळ अशा लोकांसाठी स्वातंत्र्य योग्य मानते जे विकसित आहेत. त्यात मागासलेल्या आणि अविकसित देशांतील नागरिकांसाठी स्वातंत्र्याची तरतूद नाही. त्यांच्यासाठी तो निरंकुश शासनच योग्य मानतो. किंबहुना, मिलच्या स्वातंत्र्याच्या कल्पना जातीय गृहीतकांनी भरलेल्या आहेत. जगात काही वंश श्रेष्ठ आहेत, तर काही कनिष्ठ आहेत या खोट्या समजुतीचा तो बळी होता. मागासलेल्या आणि असंस्कृत जातींना स्वातंत्र्य देता येणार नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

७. **अल्पसंख्याकांना प्राधान्य -** बहुसंख्यांच्या मनमानीपणाला मिल हे घाबरले होते आणि त्यामुळे त्यांच्या तुलनेत अल्पसंख्याकांना अधिक महत्त्व दिले. किंबहुना, बहुसंख्य निरंकुश असण्याबाबत मिलचे गृहीतक चुकीच्या गृहितकांवर आधारित आहे. प्रथमतः असे गृहीत धरता येणार नाही की बहुसंख्य नेहमीच निरंकुश असते आणि दुसरे म्हणजे ते देखील निरंकुश असेल तर आधुनिक लोकशाही व्यवस्थेला शासनाचा दुसरा चांगला पर्याय नाही. त्यांच्या विचारात अल्पसंख्याक नेहमीच संघर्षाचा पवित्रा घेऊन बहुसंख्याकांच्या विरोधात उभे राहिलेले दिसतात.

## २.८ जॉन रॉल्स [१९२१-२००२]

### २.८.१. न्याय :

न्याय ही बहुआयामी संकल्पना आहे. बदलत्या परिस्थितीनुसार न्यायाचे स्वरूप हे बदलत राहिली आहे. प्रत्येक काळात न्यायाची संकल्पना वेगवेगळ्या अर्थाने वापरली गेली. पूर्वी एखादी बाब न्यायाच्या विरोधात असेल तर आज न्यायाच्या बाजूने असू शकते. लोकशाही शासनव्यवस्थेत न्यायाची संकल्पना महत्त्वाची मानली जाते. विविध विचारवंतांनी, अभ्यासकांनी या संकल्पनेचा वेगवेगळ्या पद्धतीने अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. प्राचीन ग्रीक नगरराज्यापासून न्याय या संकल्पनेची चर्चा होत आली आहे. ग्रीक विचारवंत प्लेटोच्या मते, न्याय ही एक नैतिक मूल्य असलेली संकल्पना आहे. सिफॉल्सच्या मते, न्याय म्हणजे प्रत्येकाने आपला शब्द किंवा वचन पाळणे होय. थ्रेसिमेक्सच्या मते, न्याय म्हणजे सबलांनी दुर्बलांवर आपली इच्छा लादणे. ग्लाउकनच्या मते, न्याय म्हणजे दुर्बलांचे रक्षण होय तर पॉलीमार्कर्सच्या मते, आपल्या मित्राला मदत करणे तर शत्रूला नुकसान पोहोचविणे म्हणजे न्याय होय.

विविध विचारवंतांनी न्यायाच्या संकल्पनेचा वेगवेगळ्या पद्धतीने अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. विचारवंतांप्रमाणेच प्रत्येक विचारसरणीची न्यायाची आपली स्वतंत्र संकल्पना आहे. समाजवादी, मार्क्सवादी, उदारमतवादी या विचारसरणी न्यायाची वेगवेगळी व्याख्या करताना दिसतात. साधारणतः न्यायाबाबत दोन सिद्धांत महत्त्वाचे आहेत. पहिला म्हणजे शासनाचे कार्य हे न्याय्य असावे आणि दुसरा म्हणजे प्रशासकीय संस्था आणि न्यायालयाद्वारे न्यायाचे संरक्षण करणे. क्लॉब या विचारवंताच्या मते, प्रत्येक व्यक्तीला जे मिळायला हवे ते त्याला देणे

आणि मोबदला किंवा शिक्षेच्या माध्यमातून चुकांची दुरुस्ती करणे, न्याय ही संकल्पना साधारणत: दोन प्रकारे वापरली जाते. कार्यपद्धतीविषयक न्याय. या न्यायप्रकारात कायदेविषयक प्रक्रिया मोडतात तर सामाजिक न्यायात योग्य - अयोग्य बाबींचा विचार होतो. कार्यपद्धतीविषयक न्यायात कायद्याची व्यवस्था, न्यायालयीन रचना व त्याद्वारे समाजातील सर्व घटकांना न्याय आणि समान परिस्थितीत समान न्याय इत्यादी बाबीचा समावेश होतो. सामाजिक न्यायात कायद्यासमोर सर्व समान आणि सर्व नागरिकांना समान दर्जा व संधी यासंबंधी समानता यावी म्हणून वितरणात्मक न्याय या तत्त्वाचा स्वीकार केला जातो. जात, धर्म, वंश आणि लिंग या आधारावर व्यक्तीमध्ये भेदभाव न करता प्रत्येकाच्या प्राथमिक गरजा पूर्ण होतील यासाठी वस्तुचे न्याय्य वाटप करण्यावर भर दिला जातो.

### २.८.२. न्याय : व्याख्या व अर्थ :

न्यायाची संकल्पना ही गतिशील आणि बहुआयामी संकल्पना असल्यामुळे तिला निश्चित अशा एका व्याख्येत बसविणे अवघड कार्य आहे . तरीही काही विचारवंतांनी न्यायाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

१) **डब्ल्यू. ए. डनिंग :** ' व्यक्तीतील वेगवेगळ्या भावनांना , सामाजिक वर्गातील व्यक्तींना व समाजातील वेगवेगळ्या वर्गांना मर्यादित ठेवणारे , परस्परांच्या मार्गात अडथळा येऊ न देणारे तत्त्व म्हणजे न्याय होय . '

२) **डेव्हिड ह्यूम :** ' सार्वजनिक उपयुक्तता हा न्यायाचा स्रोत आहे . प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्तव्याचे आणि नियमांचे पालन करणे म्हणजे न्याय होय . '

३) **ॲरिस्टॉटल :** ' प्रत्येक व्यक्तीला त्याच्या प्रतिष्ठेप्रमाणे दिला जाणारा दर्जा म्हणजे न्याय होय . '

४) **बार्कर :** ' न्याय म्हणजे स्वातंत्र्य , समता , बंधुता या तीन श्रेष्ठ राजकीय मूल्यांचे एकत्रीकरण होय . '

लॅटिन भाषेतील ' Jus ' या शब्दापासून ' Justice ' हा शब्द निर्माण झाला आहे . त्याचा शाब्दिक अर्थ समाजातील माणसांना एकत्र जोडणे , योग्य जागी बसविणे किंवा त्यांच्यात समन्वय साधणे असा होतो . समाजात विविध विचारांचे लोक राहतात . प्रत्येकाची वैचारिक क्षमता आणि संस्कृती ही वेगळ्या प्रकारची असते . त्यात मतभिन्नता दिसून येते . या विसंगत विचारात एक प्रकारची सुसंगती निर्माण करून समन्वय निर्माण करणे म्हणजे न्याय होय . परस्परविरोधी हितसंबंधाचे संतुलन साधणे , त्यांच्यात समन्वय आणणे आणि व्यवस्थेला स्थिरता आणणे ही न्यायाची प्रमुख उद्दिष्टे म्हणता येईल . परस्परविरोधी विचारांना एकत्र करून त्यांचा समन्वय घडवून आणून सुसंगती निर्माण केली जाते . न्यायाचा अर्थ मानवामध्ये परस्पर बंध निर्माण करणे किंवा व्यक्तीला कल्याणाच्या हेतूने जोडणे असा आहे .

## २.९ न्यायाचे पैलू :

सर्वसामान्यपणे न्याय संकल्पनेचा वापर न्यायालयीन प्रक्रिया आणि न्याय निवाड्यावर केला जातो. कायद्यासमोर सर्व नागरिक समान आहेत; परंतु एखाद्या व्यक्तीस असे वाटत असेल

की माझ्यावर अमुक एका बाबतीत अन्याय झाला आहे तर त्याविषयी संबंधित व्यक्तीला न्यायालयात न्याय मागण्याचा अधिकार आहे यास न्याय असे संबोधले जाते. परंतु न्यायाची ही संकल्पना संकुचित असून ही संकल्पना अधिक व्यापक स्वरूपात उपयोगात आणली जाते. आधुनिक राज्यांनी लोकशाही शासनव्यवस्थेचा स्वीकार केला आहे आणि लोकशाहीने सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातदेखील प्रवेश केला आहे. त्यामुळे न्यायाची संकल्पना अधिक व्यापक बनली आहे. व्यक्तिहिताबरोबरच समाजहितदेखील महत्त्वाचे आहे. व्यक्तीहित आणि समाजाचे कल्याण यात योग्य समन्वय साधून न्यायाची स्थापना केली जाते. न्यायाची संकल्पना समजून घेताना ती पुढीलप्रमाणे समजून घेणे आवश्यक आहे.

१) **सामाजिक न्याय :** सामाजिक न्यायात समाजातील विषमता आणि भेदभाव नष्ट करून सर्वांना जीवन जगण्याची आणि विकासाची समान संधी देणे हा मुख्य घटक आहे. याचा संबंध व्यक्तीचे अधिकार आणि सामाजिक नियंत्रण यामध्ये योग्य समन्वय साधून व्यक्तीच्या अधिकाराचे संरक्षण करताना सामाजिक हित साधणे या बाबींशी आहे. समाजात विविध आधारावर वर्गाची निर्मिती होत असते धर्म, वंश, जात, लिंग इ. आधारावर व्यक्ती - व्यक्तीमध्ये भेदाभेद न करता सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे. सामाजिक न्यायाची संकल्पना ही अत्यंत व्यापक संकल्पना असून यामध्ये अल्पसंख्याकांच्या हितापासून गरीब आणि निरक्षर, मागास गट या प्रत्येक घटकांचा उल्लेख केला जातो. याचा संबंध गरिबी, आरोग्य, बेरोजगारी आणि अन्नसुरक्षा या बाबींशी येतो. राज्याने दलित, मागास आणि वंचित घटकांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करणे अपेक्षित आहे. समाजातील मागास घटकांना न्याय मिळाला पाहिजे व त्यांना समाजातील मुख्य प्रवाहात आणता आले पाहिजे. यावर सामाजिक न्यायात विशेष भर दिला जातो. समाजाने निर्माण केलेले जे भेदभाव आहेत ते संपुष्टात येऊन प्रत्येकाला आपल्या विकासाची समान संधी मिळाली पाहिजे. असे करताना कधी कधी समाजातील दुर्बल घटकांना विशेष सवलती द्याव्या लागतात. त्या देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे. यातून काही प्रमाणात समतेच्या तत्त्वाचे उल्लंघन होते परंतु तरीही सामाजिक न्यायाच्या स्थापनेसाठी या बाबी आवश्यक असेल तर राज्यांनी ते करणे आवश्यक मानले जाते. भारतीय राज्यघटनेने समाजातील दुर्बल, वंचित आणि मागास घटकांसाठी राखीव जागांची तरतूद केली असून सामाजिक न्यायाच्या स्थापनेचा हा एक प्रयत्न आहे असे म्हणता येईल. भारतीय समाजात जात, धर्म, वंश आणि लिंग या आधारावर व्यक्ती - व्यक्तीमध्ये जो भेदभाव निर्माण झालेला होता तो संपुष्टात आणण्यासाठी राज्यघटनेत अशा अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत.

२) **आर्थिक न्याय :** सामाजिक न्याय आणि आर्थिक न्याय या एकमेकांशी संबंधित संकल्पना आहेत. जेव्हा एकाची चर्चा सुरू होते तेव्हा दुसऱ्याचा विषय नक्कीच येतो. साधारणत : आर्थिक न्याय या संकल्पनेचा अर्थ असा आहे की, आर्थिक मूल्याच्या आधारावर व्यक्ती - व्यक्तीमध्ये भेदभाव असू नये. मार्क्सवादी विचारवंतांनी आर्थिक न्यायाची संकल्पना महत्त्वाची मानली आहे. त्यांच्या मते, आर्थिक विषमतेमुळेच सामाजिक विषमता आणि राजकीय अन्याय होतो. प्राथमिक गरजांची पूर्तता, आर्थिक शोषण, गुलामगिरी, वेठबिगारी नष्ट करणे, प्रत्येक व्यक्तीच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य इ. मूलभूत गरजा पूर्ण झाल्या पाहिजे समाजामध्ये आर्थिक

विषमतेच्या आधारावर दोन वर्ग निर्माण होत आहेत. श्रीमत हे अतिश्रीमंत होत आहेत तर गरीब हे आणखी गरीब होत आहेत. ही जी आर्थिक विषमता आहे ती संपुष्टात आणून संपत्तीचे किमान समान वितरण व्हावे आणि प्रत्येकाच्या मूलभूत गरजा पूर्ण व्हाव्यात अशी अपेक्षा आर्थिक न्यायात अभिप्रेत असत. आर्थिक न्यायाची संकल्पना समाजवादी व्यवस्था निर्माण करण्यावर भर देते, ज्यामध्ये उत्पादन आणि वितरणाची साधने यांचे केंद्रीकरण विशिष्ट वर्गात न होता समाजातील बहुसंख्याक वर्गाचे हित यामध्ये जोपासले जाईल. समाजातील कोणताही घटक अन्नाशिवाय, कपड्याशिवाय राहणार नाही. प्रत्येकाच्या आर्थिक गरजा पूर्ण होतील. गरीब - श्रीमंतीची दरी कमी होईल. यासाठी राज्याने विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. विकसनशील आणि अविकसित देशात आर्थिक न्यायाची संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता आहे. कारण या देशात मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता, भूकबळी, आर्थिक शोषण यांचे प्रमाण दिसून येते.

३) **राजकीय न्याय :** राजकीय न्याय ही एक महत्त्वाची संकल्पना असून राज्यातील प्रत्येक व्यक्तीला मतदान करणे, निवडणुकीस उभे राहणे, निवडून येणे, राज्यातील विविध पदांवर काम करणे, शासनातील विविध पदांवर भरती होण्याचा अधिकार अपेक्षित आहे. कोणत्याही मानवनिर्मित भेदभावाशिवाय व्यक्ती शासनाच्या विविध कार्यात सहभागी होईल. जात, धर्म, वंश, लिंग इत्यादी आधारावर व्यक्ती व्यक्तीमध्ये या बाबतीत भेदभाव केला जाणार नाही. सार्वत्रिक आणि प्रौढ मताधिकार, मूलभूत अधिकारांना संरक्षण, राज्यातील कोणत्याही सत्तापदावर जाण्याचा आणि पद धारण करण्याचा अधिकार नागरिकांना असावा. तसेच राज्याविरुद्ध तक्रार करणे किंवा न्यायालयात राज्याविरुद्ध खटला दाखल करण्याचा अधिकारही नागरिकांना असावा. या सर्व अधिकारांचे संरक्षण राज्यांनी, संविधानिक यंत्रणांनी केले पाहिजे. नागरिकांच्या या सर्व अधिकारांचे संरक्षण झाले तर व्यक्ती खऱ्या अर्थाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करू शकतो व राष्ट्रनिर्मितीत आपले योगदान देईल. थोडक्यात, राजकीय न्यायामध्ये व्यक्तीचा शासनातील समान सहभाग आणि प्रसंगी शासनाच्या धोरणाचा विरोध करण्याचा अधिकार या बाबींचा समावेश होतो.

## २.१० सामाजिक न्यायाची संकल्पना

सामाजिक न्याय म्हणजे एक अशी सामाजिक व्यवस्था आहे ज्यामध्ये कोणताही भेदभाव न करता (जात, धर्म, लिंग, प्रदेश इ.) प्रत्येक व्यक्तीला समान संधी व सुख सुविधा उपलब्ध व्हावी. व्यक्तीचे कोणत्याही स्वरूपात शोषण होणार नाही. सामाजिक न्याय व्यवस्थेत योग्य आणि सुसंस्कृत जीवनासाठी आवश्यक परिस्थितीची भावना अंतर्भूत असते. सामाजिक व राजकीय सत्तेकडून अपेक्षा केली जाते की, आपल्या कायदेशीर व कार्यकारी कार्यक्रमाद्वारे क्षमतायुक्त समाजाची निर्मिती करणे सामाजिक न्याय आहे. सामाजिक न्यायाची मागणी आहे की, समाजातील मागास, सुविधाहीन सामाजिक गटांना आपल्या आपल्या सामाजिक व आर्थिक दुर्बलतेवर नियंत्रण आणि जीवनाचा स्तर सुधारण्यासाठी सक्षम बनवले जावे. समाजातील दारिद्र्य रेषेच्या खालील सर्वाधिक सुविधा वंचित समूह, गरीब, बालके, महिला, अशक्त व्यक्ती, अपंग जनतेची मदत करावी. अशाप्रकारे शोषणविरहित समाजाची स्थापना केली जावी. समाजातील उपेक्षित, वंचित समाजघटकांना सन्मानाने व प्रतिष्ठेने जगता यावे

म्हणून त्यांच्यातील आत्मसत्तेची कदर करण्यात यावी. स्त्रिया, आदिवासी, दलित, अनुसूचित जाती, जमाती इ. अल्पसंख्याकांवर होणारे अत्याचार थांबवून त्यांच्या विकासावर भर द्यावा. यातून सामाजिक न्याय स्थापन होऊ शकेल. आधुनिक राज्यशास्त्रात न्यायाची संकल्पना बदलली आहे. आधुनिक राजकीय लोकशाही व्यवस्थेत न्याय हा संस्थात्मक झाला आहे व कायदेशीर प्रक्रियेशी जोडला आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य, समानता, समान संधी व समाजातील दुर्बल व मागास वर्गाला मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी याचे वितरण शासनसंस्था करीत असते. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या मूलभूत अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, पाणी, वीज इ. सार्वजनिक सेवा जनतेला उपलब्ध करून देणे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी व्यक्तीच्या समतेच्या आधारावर संधी उपलब्ध करून देणे, सर्वांना प्रगतीची समान पद्धतीने प्राप्ती व्हावी आणि सर्व जनतेने मिळून मिसळून साहित्य, कला, संस्कृती आणि तंत्रज्ञानाच्या साधनाचा उपभोग आणि उपयोग करणे सामाजिक न्याय आहे.

सामाजिक न्याय हि एक व्यापक संकल्पना आहे. सामाजिक हिताच्या दृष्टीने सर्व महत्त्वाच्या बाबींचा समावेश होतो. अल्पसंख्याकांच्या हिताच्या रक्षणापासून निर्धन, निरक्षरतेचे निर्मूलन इ . सर्व पैलूंचा विचार करतो. हा केवळ कायद्याच्या समोर समानता, न्यायपालिकेचे स्वातंत्र्य, न्यायिक सक्रियता, जनहित, राजकीय एवढाच विचार अंतर्भूत नसतो. याचबरोबर सामाजिक दुष्ट रूढी - परंपरा (उदा. अस्पृश्यता पाळणे) दारिद्र्य, रोगराई, आरोग्य, बेकारी, अपंग (दिव्यांग), शेतकरी आत्महत्या असे गंभीर प्रश्न सोडविणे हे सामाजिक न्यायाचे उद्देश आहेत.

## २.११ जॉन रॉल्स: न्यायाचा सिद्धांत

जॉन रॉल्स विलक्षण प्रतिभेचा धनी होता रॉल्स जन्म २१ फेब्रुवारी १९२१ रोजी अमेरिकेत झाला. लहानपणापासूनच सामाजिक समस्या समजून घेण्यात रस होता. प्रौढ वयात, रॉल्सने सामाजिक विषमता समजून घेऊन, वृत्तपत्रे आणि मासिकांमध्ये आपले विचार मांडले. रॉल्सने न्यायाचा विचार १९५७ मध्ये प्रथम मांडला. हा विचार पुढे त्यांच्या न्याय सिद्धांताचा आधार म्हणून ओळखला जातो. हार्वर्ड विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक असताना, रॉल्स यांनी त्यांच्या न्याय संकल्पनेला व्यापक आधार देऊन, १९७१ मध्ये 'अ थिअरी ऑफ जस्टिस' हे पहिले पुस्तक १९७१ मध्ये प्रकाशित केले. या पुस्तकात त्यांनी न्यायावर आधारित आदर्श समाजाची तर्कशुद्ध मांडणी केली आहे. हे पुस्तक ९ भागांमध्ये विभागलेले आहे, या पुस्तकामुळे रॉल्स यांना राजकीय विचारांच्या पुनरुज्जीवनाचे जनक. त्यानंतर रॉल्सचे दुसरे पुस्तक १९९३ मध्ये 'पोलिटिकल लिबरलिझम' या नावाने प्रकाशित झाले. यामध्ये रॉल्सने न्याय सिद्धांत सुधारित स्वरूपात मांडला आहे. त्यानंतर, १९९९ मध्ये 'कलेक्टेड पेपर्स आणि द लॉ ऑफ पीपल्स ' हे पुस्तक प्रकाशित झाले. 'कलेक्टेड पेपर्स' हे १९५० ते १९९५ या काळात प्रकाशित झालेल्या रॉल्सच्या सर्व लेखांचे संकलन होते. 'द लॉ ऑफ पीपल्स' या आपल्या दुसऱ्या पुस्तकात रॉल्सने आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या क्षेत्रात न्यायाचा सिद्धांत लागू करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर रॉल्सचे 'लेक्चर्स ऑन द हिस्ट्री ऑफ मॉरल फिलॉसॉफी' हे पुस्तक २००० मध्ये प्रकाशित झाले. रॉल्सचे शेवटचे पुस्तक जस्टिस ऐज फेअरनेस अ रिस्टेटमेंट,' २००१ मध्ये प्रकाशित झाले. या दोन्ही पुस्तकांमध्ये रॉल्सच्या महत्त्वाच्या व्याख्यानांचे आणि लेखनाचे संकलन आहे. त्यामुळे शेवटच्या क्षणापर्यंत रॉल्स न्यायाच्या तत्त्वावरच लिहीत राहिले. पण दुर्दैवाने २४ नोव्हेंबर २००२ त्यांचे निधन झाले.

न्यायाच्या संकल्पनेला प्राचीन इतिहास आहे. मानव हा विचार करणारा प्राणी असल्याने, राजकीय समाजाच्या सुरुवातीपासूनच स्वतःला न्याय मिळावा अशी मागणी करत आला आहे. समाजातील विविध घटक, व्यक्ती आणि गट यांच्यामध्ये विविध वस्तू, सेवा, संधी, फायदे इत्यादींचे वाटप करण्याचा नैतिक आणि न्याय्य आधार कोणता हे ठरवण्याची समस्या ही प्रामुख्याने न्यायाची समस्या आहे. या कारणास्तव अनेक विचारवंतांनी स्वातंत्र्य आणि समानतेच्या परस्परविरोधी दाव्यांचे निराकरण करण्यासाठी त्यांचे सिद्धांत मांडले आहेत. त्यापैकी एक म्हणजे रॉल्स होत. आपल्या ए थिअरी ऑफ जस्टिसमध्ये न्यायाचा सिद्धांत मांडताना उपयुक्ततावाद्यांच्या मतांचे खंडन केले आहे. समकालीन उदारमतवादी विचारवंत असूनही हायक यांनी प्रगती विरुद्ध न्याय या वादात न्यायाकडे दुर्लक्ष करून प्रगतीची बाजू घेतली आहे, या हायकच्या मताचेही त्यांनी खंडन केले आहे. रॉल्सने आपल्या न्यायशास्त्राच्या सुरुवातीलाच न्यायाबद्दल असा युक्तिवाद केला आहे की चांगल्या समाजात अनेक सद्गुण आवश्यक असतात आणि त्यात न्यायालाही महत्त्वाचे स्थान असते. न्याय ही चांगल्या समाजाची आवश्यक अट आहे, परंतु ती त्यासाठी पुरेशी नाही, कारण कोणत्याही समाजात न्यायाव्यतिरिक्त इतर नैतिक गुणही प्रबळ असू शकतात. पण अन्याय करणाऱ्या समाजाची स्तुती कधीच करू नये. सामाजिक प्रगतीसाठी, न्यायाच्या कल्पनेला आडकाठी आणून प्रगती आणि चांगल्या समाजाची स्थापना या दोन्ही गोष्टी अशक्य आहेत, अशी मागणी करणारे विचारवंत होत.

न्याय म्हणजे काय? रॉल्स या समस्येचे निराकरण करण्याचा प्रयत्न करतात की न्यायाची समस्या ही प्राथमिक वस्तू आणि सेवांच्या न्याय्य आणि न्याय्य वितरणाची समस्या आहे. या प्राथमिक गोष्टी आहेत - हक्क आणि स्वातंत्र्य, शक्ती आणि संधी, उत्पन्न आणि संपत्ती आणि स्वाभिमानाची साधने. रॉल्सने त्यांना शुद्ध प्रक्रियात्मक न्याय असे संबोधले आहे. रॉल्स म्हणतात की, जोपर्यंत वस्तू आणि सेवांसारख्या प्राथमिक वस्तूंचे समान वितरण होत नाही, तोपर्यंत सामाजिक न्यायाची कल्पना करण्यात अर्थ नाही.

१. **उपयुक्ततावादावर टीका -** रॉल्स म्हणतात की उपयोगितावादाचे तत्व सर्वात मोठ्या संख्येच्या सर्वात मोठ्या आनंदानुसार प्राथमिक वस्तूंच्या समान वितरणास अडथळा ठरतो. अधिकाधिक लोकांना अधिकाधिक आनंद मिळवून देण्याच्या नादात तो एखाद्या विशिष्ट व्यक्तीचे किती नुकसान होत आहे हे पाहणे विसरतो. रॉल्स म्हणतात की – “आनंदी लोकांचे सुख कितीही वाढले तरी ते दुःखी लोकांच्या दुःखाची बरोबरी करू शकत नाही.” कारण उपयुक्ततावादाचा सिद्धांत संपूर्ण लोकांच्या आनंदापेक्षा बहुसंख्यांच्या आनंदाला पूरक आहे. हे तत्त्व सामाजिक न्यायाच्या विरोधात जाते कारण अल्पसंख्याकांचा दावा बहुसंख्यांकडून चिरडला जातो. उपयुक्ततावादी सिद्धांत न्यायाच्या सामान्य तत्त्वाच्या विरोधात जातो, कारण तो समाजातील प्रत्येक सदस्याची भूमिका नाकारतो. रॉल्सने म्हटले आहे की आम्ही लोककल्याणासाठी दुसऱ्याचा दावा रद्द करू शकत नाही आणि बहुसंख्यांचे जास्तीत जास्त समाधान मिळविण्याच्या प्रयत्नात दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण करू शकत नाही.

उपयुक्ततावादी विचारवंताने नेहमीच सामाजिक धोरणकर्त्यांचे प्राधान्य सामाजिक उपयोगिता वाढविण्यावर भर दिला आहे. पण काही बौद्धिक कार्ये ही सामाजिक उपयुक्तता वाढवणारी असतात. परंतु काही व्यवहारवादी लोक उपयुक्ततावादाची

स्तुतीही करतात की त्यामुळे सामाजिक उपयुक्तता वाढते, परंतु विवेकवादी असेही मानतात की एखाद्याला दडपून आणि निरपराधांना शिक्षा करून सामाजिक उपयोगिता वाढवणे अन्यायकारक आहे. त्यामुळे उपयुक्ततावादी आणि व्यवहारवादी यांच्यात तणाव निर्माण होतो. सामाजिक न्यायाच्या संकल्पना समजुन घेण्यासाठी विवेकवादी व तर्कवादी यांच्यातील तणाव बुद्धिमत्तेने काही प्रमाणात कमी केला पाहिजे. त्यासाठी प्राधान्यानेच नियम पाळले पाहिजेत. तडजोडीच्या विचारांवर त्याचे न्यायशास्त्र आधारित आहे. या कारणास्तव, त्याच्या न्यायाच्या या तत्त्वाला तडजोड न्यायाचे तत्त्व असेही म्हणतात.

## २. मुळस्थिती

रॉल्स म्हणतात माझा सामाजिक करार एका विशिष्ट प्रकारचा आहे. समाजाच्या मुख्य संरचनेच्या निर्मितीसाठी तर्कशुद्ध व्यक्ती त्यांच्या हितसंबंधांना प्रोत्साहन देण्यासाठी सुरुवातीच्या टप्प्यात स्वीकारतात. ही तत्त्वे त्यानंतरच्या सर्व करारांचे नियमन करून सामाजिक सहकार्यासाठी नियम बनवतात आणि न्याय्य सरकारे स्थापन करतात. रॉल्स म्हणतात की पारंपारिक सिद्धांताचा सर्वोत्तम पर्याय म्हणजे सामाजिक कराराचे तत्त्व आहे. हा करार स्वतंत्र आणि स्वतंत्र व्यक्तींमधील करारावर आधारित आहे. हा करार केवळ समानतेच्या मुळस्थितीतच शक्य आहे. मुळस्थितीचा अर्थ आपण त्या अटी आणि हे असे राज्य आहे ज्याद्वारे पुरुष आणि स्त्रिया एकत्र येऊन एक सामाजिक करार तयार करतात. जरी ही मुळस्थिती केवळ हॉब्स लॉक आणि रुसोच्या नैसर्गिक स्थितीच्या अर्थाने वापरली जाऊ शकते, परंतु नैसर्गिक स्थितीतील व्यक्ती उग्र किंवा रानटी होत्या, तर मूळ स्थिती समाजातील लोक तर्कशुद्ध असतात आणि समतेच्या तत्त्वावर जीवन जगतात.अशा स्थितीत प्रत्येक व्यक्तीला समाजातील त्याचे स्थान, त्याचे वर्गीय स्थान, सामाजिक स्थिती कळत नाही.या अवस्थेत स्वार्थपूर्तीऐवजी लोकांच्या प्राथमिक सामाजिक वस्तूंचा आग्रह - मालमत्ता, शक्ती, स्वाभिमान आणि स्वातंत्र्य.आदींचा अंतर्भाव होतो.

## ३. अज्ञानाचा पडदा

सर्वांना न्याय मिळवून देण्यासाठी, समाजावर परिणाम करणारे नियम किंवा निर्णय घेताना वैयक्तिक हितसंबंध बाजूला ठेवून तर्कशुद्ध असणे महत्त्वाचे आहे. तर्कशुद्ध मानसिकतेपर्यंत पोहोचण्यासाठी, रॉल्सने असा युक्तिवाद केला की एखाद्याने स्वतःला "अज्ञानाच्या पडद्यामागे" म्हणून कल्पना केली पाहिजे. अज्ञानाचा हा पडदा निर्णय घेणारी व्यक्ती आणि ती व्यक्ती ज्या समाजात राहते त्यामधील एक सैद्धांतिक यंत्र किंवा काल्पनिक पृथक्करण आहे. हे त्याला स्वतःबद्दल किंवा ज्या लोकांसाठी राज्य करत आहे त्यांच्याबद्दल कोणतीही भौतिक तथ्ये जाणून घेण्यापासून प्रतिबंधित करते. हे घटक असू शकतात -

अ. **लोकसंख्याशास्त्रीय तथ्ये -** ज्याची उदाहरणे वय, लिंग, वांशिकता, उत्पन्नाची पातळी, रंग, रोजगार, वैयक्तिक सामर्थ्य आणि कमकुवतता इत्यादी असू शकतात.

ब. **सामाजिक तथ्ये -** ज्याची उदाहरणे सरकार, सामाजिक संस्था, संस्कृती आणि परंपरा इत्यादी प्रकार असू शकतात.

क. **चांगल्या गोष्टींबद्दल निर्णय घेणाऱ्या वृत्तीबद्दलची तथ्ये -** ही निर्णय घेणाऱ्याची मूल्ये आणि एखाद्याचे जीवन कसे असावे यासाठी प्राधान्ये आहेत. त्यात विशिष्ट नैतिकता आणि राजकीय विश्वास देखील समाविष्ट आहेत.

## २.१२ अज्ञानाच्या पडद्याचे दोन मुख्य पैलू

आत्म-अज्ञान आणि सार्वजनिक अज्ञान. प्रथम, ते निर्णय घेणाऱ्याला स्वतःबद्दल काहीही जाणून घेण्यापासून प्रतिबंधित करते. त्याला समाजातील आपले स्थान माहित नसते, कारण ज्ञान त्याला वैयक्तिक हितसंबंध लक्षात घेऊन त्याच्या भविष्याच्या बाजूने निर्णय घेण्यास प्रवृत्त करू शकते. उदाहरणार्थ, एखाद्या विशिष्ट प्रदेशातील कंपनीमध्ये शेअर्स धारण करणारा आमदार त्या क्षेत्राच्या भविष्यातील वाढीसाठी कायदा करण्याचा प्रयत्न करू शकतो, जेणेकरून त्याला त्याचा अप्रत्यक्ष फायदा होऊ शकेल. दुसरे, ते निर्णय घेणाऱ्याला तो ज्या घटकांसाठी निर्णय घेत आहे त्याबद्दल काहीही जाणून घेण्यापासून प्रतिबंधित करते. निर्णय घेणाऱ्याचा वैयक्तिक पक्षपातीपणा टाळण्यासाठी असे अज्ञान महत्त्वाचे आहे. हा विशेषाधिकारधारकांना दुर्बल किंवा वंचितांवर दबाव टाकण्यापासून प्रतिबंधित करतो, कारण मूळपरिस्थितीत प्रत्येकजण समान असतो. अज्ञानाचा पडदा हे सुनिश्चित करतो की धोरणे केवळ बहुसंख्य लोकांसाठीच नव्हे तर संपूर्ण समाजाच्या हितासाठी बनवली जातात.

अशाप्रकारे रॉल्सने मूळस्थितीची कल्पना करून न्याय न्याय्य म्हणून स्वीकारला आहे. या मूलभूत स्थितीत, अज्ञानाच्या पडद्यामुळे सर्वच मतमतांतराच्या पातळीपर्यंत पोहोचू शकतात जे न्यायाची तत्त्वे मानतात. निष्पक्षतेच्या रूपात, न्यायाचा संबंध नैतिकतेशी जोडला जातो आणि न्याय सद्गुणाचे रूप धारण करतो. हा सद्गुण सामाजिक संस्थांच्या वर्तनाचा प्राधान्यक्रम असला पाहिजे जेणेकरून सामाजिक न्याय मिळू शकेल. रॉल्सने, मूळ स्थितीची कल्पना करून, या टप्प्यातील लोकांना तर्कशुद्ध प्राणी मानले. म्हणूनच निष्पक्षतेच्या स्वरूपात न्याय मूळ स्थितीतच शक्य आहे. रॉल्सचा असा विश्वास आहे की मूळ स्थितीत ते गृहितक आणि निकष आहेत जे न्यायाचा योग्य सिद्धांत तयार करू शकतात. मूळ स्थितीच्या वातावरणातच शुभ संकल्पना आणि प्राधान्य तत्त्वांचा समावेश आहे. मूळ स्थिती न्यायाच्या तत्त्वांना तार्किक आधार प्रदान करते. मूलभूत स्थिती व्यक्तींमधील समानता दर्शवते. यामध्ये, अज्ञानाच्या पडद्याआड राहून, व्यक्ती न्यायाची ती तत्त्वे प्रस्थापित करतो ज्यामुळे त्याचे हित वाढते. मूळ स्थितीशिवाय न्यायाच्या कोणत्याही तत्त्वाची कल्पना करणे निरुपयोगी आहे.

रॉल्सने म्हटले आहे की मूळस्थितीच्या वातावरणात प्रत्येक व्यक्ती स्वत:ला निकृष्ट स्थितीपासून वाचवण्यासाठी जास्तीत जास्त लाभाची व्यवस्था शोधेल. यामुळे सामाजिक न्यायाचे तत्त्व प्रस्थापित करताना दोन नियम लागू होतील. प्रत्येकाला सर्वात मूळ स्वातंत्र्याचा समान अधिकार असायला हवा आणि इतरांनाही. सामाजिक आणि आर्थिक असमानता अशा प्रकारे मांडल्या पाहिजेत की

१) कमीत कमी विशेषाधिकार असलेल्या व्यक्तींना जास्तीत जास्त लाभ मिळेल

२) या असमानता अशा प्रकारे मांडल्या पाहिजेत की संधीच्या योग्य समानतेनुसार सर्वांसाठी पदे आणि परिस्थिती खुल्या असतील. रॉल्स म्हणतात की पहिला कायदा स्वातंत्र्याच्या तत्त्वाकडे नेतो आणि दुसरा कायदा दोन तत्त्वांचा अवलंब करतो, १) प्रत्येकासाठी लाभ आणि २) सर्वांसाठी खुला संधी किंवा लाभाची न्याय्य समानता.

**प्रथम : न्यायाचे पाहिले तत्व समान स्वातंत्र्य -** न्यायाचे पहिले तत्व नागरिकांचे मूलभूत स्वातंत्र्य, मतदानाचे स्वातंत्र्य, सार्वजनिक पद धारण करण्याची क्षमता, भाषण स्वातंत्र्य, मालमत्तेचे स्वातंत्र्य, कायद्यासमोर समानता इत्यादींशी संबंधित आहे. रॉल्स म्हणतात की सर्व स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीला समान रीतीने दिले पाहिजे. न्यायाच्या तत्त्वांची व्यवस्था अशी असावी की प्रथम तत्त्व शीर्षस्थानी ठेवले पाहिजे. त्यासाठी संविधान बनवणाऱ्या संस्थांनी किंवा कायदेमंडळांनी पहिल्या तत्त्वालाच प्राधान्य देऊन स्वातंत्र्याची व्यवस्था करावी. रॉल्सनी समान स्वातंत्र्याच्या तत्त्वाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. विशिष्ट स्वातंत्र्यांवर भर देण्याऐवजी, प्रशासकांनी किंवा संविधान निर्मात्यांनी स्वातंत्र्यांच्या संपूर्ण व्यवस्थेकडे लक्ष्य दयायला हवे, जेणेकरून स्वातंत्र्यांमध्ये समतोल राखता येईल. समान स्वातंत्र्याच्या तत्त्वाखाली येणारे मूळ स्वातंत्र्य केवळ स्वातंत्र्यापुरतेच मर्यादित असू शकते, म्हणजेच समान स्वातंत्र्य किंवा दुसरे मूळ स्वातंत्र्य योग्यरित्या संरक्षित केले जाईल हे निश्चित असेल तेव्हाच ते मर्यादित केले जाऊ शकेल तेंव्हाच समान स्वातंत्र्य शक्य होईल.

थोडक्यात रॉल्सने समानता आणि स्वातंत्र्याच्या सहअस्तित्वाद्वारे स्वातंत्र्याच्या तत्त्वाला प्राधान्य दिले आहे. स्वातंत्र्याचे तत्त्व हे न्यायाचे तत्त्व मानून, रॉल्सने त्याला सर्वोच्च प्राधान्याचे तत्त्व मानले आहे. हा प्राधान्यक्रम साध्य केल्याशिवाय समाजाची प्रगती होऊ शकत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. सामाजिक न्यायासाठी समान स्वातंत्र्य व्यापक केले पाहिजे आणि समान स्वातंत्र्याचा असमतोल दूर केला पाहिजे जेणेकरून कमी स्वातंत्र्य असलेल्या वंचित लोकांनाही स्वातंत्र्याचा योग्य लाभ घेता येईल. जेव्हा सभ्यतेचे गुण वाढवणे आवश्यक असते तेव्हाच सर्व व्यक्तींना समान स्वातंत्र्य उपभोगता येईल. भौतिक संसाधनांचा अतिरेक आणि पदाच्या लाभासाठी समान स्वातंत्र्य कमी करणे समर्थनीय नाही. म्हणून प्रत्येक व्यक्तीला समान मूलभूत स्वातंत्र्यांची जास्तीत जास्त प्राप्ती करण्याचा समान अधिकार असला पाहिजे. समान स्वातंत्र्याच्या अधारावरच निकोप आणि खुला समाज निर्माण करता येईल.

**द्वितीय : न्यायाचे दुसरे तत्व संधीची न्याय्य समानता आणि भेदमुलक तत्व**

न्यायाचे दुसरे तत्व संधीची न्याय्य समानता आणि उत्पन्नाच्या पुनर्वितरणाशी संबंधित आहे. रॉल्सने या सिद्धांतात दोन तत्त्वे जोडली आहेत, भेदभावाचे तत्त्व आणि संधीच्या न्याय्य समानतेचे तत्त्व. रॉल्स म्हणतात की संपत्ती आणि उत्पन्नाचे वितरण समान असले पाहिजे असे नाही, परंतु हे असमान वितरण असे असले पाहिजे की कमी विशेषाधिकार असलेल्यांनाही जास्तीत जास्त लाभ मिळेल. त्याचप्रमाणे संधीच्या समानतेबद्दल रॉल्स यांनी म्हटले आहे की, कार्यालय आणि सत्ता सर्वांसाठी खुली असावी जेणेकरून सर्वसामान्यांनाही त्यात प्रवेश मिळू शकेल.

भेदमूलक सिद्धांत अशी मागणी करतो की प्राथमिक वस्तूंच्या न्याय्य वितरणात कोणत्याही प्रकारची सवलत तेव्हाच वैध ठरू शकते जेव्हा हे सिद्ध झाले की ते सर्वात निम्न स्थितीत असलेल्यांना जास्तीत जास्त लाभ देईल. विलक्षण क्षमतेचा आणि परिश्रमाचा लाभ एखाद्या व्यक्तीला तेव्हाच न्याय्य ठरेल जेव्हा त्याचा फायदा समाजातील गरीब लोकांना अधिक होईल. त्यामुळे प्राथमिक वस्तूंचे समान वितरण व्हावे यासाठी अशी व्यवस्था निर्माण करावी. परंतु या प्राथमिक वस्तूंची देवाणघेवाण किंवा आदान प्रदान टाळले पाहिजे.

त्याचप्रमाणे, प्राथमिक वस्तूंचे असमान वितरण अशा परिस्थितीतच ओळखले पाहिजे, ज्याचा फायदा दुर्बल घटकांना होतो, भेदभावाचे तत्त्व समजावून सांगितल्यानंतर, रॉल्स संधीच्या समानतेचे तत्त्व स्पष्ट करतात. रॉल्स म्हणतात की संधीची न्याय्य समानता सामाजिक आणि आर्थिक असमानता अशा प्रकारे मांडली जावी की कमीत कमी लाभ झालेल्या व्यक्तीला जास्तीत जास्त लाभ मिळावा आणि सर्व व्यक्तींना विविध पदांवर समान प्रवेश मिळावा. योग्यता आणि क्षमाशीलता यांची पातळी समान असते आणि ज्यांना पदासाठी समान इच्छा आहे त्यांना त्यांचा जन्म जात किंवा आर्थिक वर्गाचा विचार न करता यशाची समान शक्यता असली पाहिजे.

रॉल्स आग्रही आहेत की आपण हुशार व्यक्तींना संधीच्या योग्य समानतेमध्ये स्थान मिळवून देण्याच्या कल्पनेने गोंधळात टाकू नये. संधीची समानता ही दुर्बल घटकाला भाग्यवान बनविण्याशी संबंधित असावी जेणेकरून समाजातील वंचित घटकालाही असुरक्षित वाटू नये. रॉल्स म्हणतात की पदे खुली ठेवल्याने कमी लाभ असलेल्या व्यक्तींना विशेष अधिकारांच्या प्रणालीमध्ये नाकारलेले फायदे देखील मिळू शकतात. जेने करून. तळागळातील समाज समाजाच्या मुख्य प्रवाहात येईल.

## २.१३ जॉन रॉल्स : वितरणात्मक न्याय

हा प्रक्रियात्मक न्यायाशी संबंधित आहे. म्हणजे सामाजिक धोरणांद्वारे न्याय मिळवून देणारी अशी सामाजिक व्यवस्था निर्माण झाली पाहिजे की, या प्रक्रियात्मक न्यायासाठी, प्रक्रियेची निष्पक्षता प्रस्थापित झाली पाहिजे. त्यासाठी केवळ संस्थाच नव्हे. न्यायिक व्यवस्था स्थापन करणे आवश्यक आहे, परंतु ती अंमलात आणण्यासाठी ती न्याय्य पद्धतीचाअवलंब व्हावा. न्यायिक पायाभूत सुविधा हा न्यायिक प्रक्रियेचा आधार आहे आणि ही रचना न्याय्य राजकीय घटना, आर्थिक आणि सामाजिक संस्थांच्या न्याय्य व्यवस्थेने बनलेली आहे. न्याय मिळवून न देता वितरणात्मक न्यायाची चर्चा करणे अप्रामाणिक आहे. त्यासाठी मूलभूत रचनेचा विचार करणे आवश्यक आहे. रॉल्सचे मत आहे की न्यायाच्या तत्त्वाच्या अभिव्यक्तीसाठी आवश्यक अटी असाव्यात या पार्श्वभूमीशिवाय न्यायाच्या कोणत्याही सिद्धांताची कल्पना करणे निरुपयोगी आहे. रॉल्सच्या मते या अटी म्हणजे संविधानचे पालन व मार्ग, राजकीय प्रक्रियेचे योग्य आचरण, संधींच्या समानतेची आणि किमान सामाजिक गरजांची हमी देते. रॉल्स यांनी म्हटले आहे की, सर्व नागरिकांना समान स्वातंत्र्य असले पाहिजे, योग्य राजकीय प्रक्रियेद्वारे शासन निवडले जावे.सर्वांना समान शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय सुविधा मिळाव्यात. लोकांना समान किमान सामाजिक गरजांची हमी दिली गेली पाहिजे म्हणजे कुटुंब भत्ता, बेरोजगारी भत्ता असावा. योग्य व्यवस्था इ. या प्रणाली राखण्यासाठी वाटप, स्थिरीकरण,

हस्तांतरण आणि वितरण संस्था विकसित केल्या जाऊ शकतात. सारांशत: रॉल्सने न्यायाच्या सिद्धांतामध्ये काही महत्त्वाच्या समस्यांचा विचार केला आहे, ज्यामध्ये प्राथमिक वस्तू, सेवा आणि लाभांची समस्या मुख्य आहे. रॉल्सच्या न्यायामध्ये पूर्णपणे प्रक्रियात्मक आणि वितरणात्मक न्यायाची व्यवस्था आहे.

## सारांश

स्वातंत्र्या शिवाय व्यक्ति जीवनाला अर्थ उरत नाही आणि लोकशाही शासन व्यवस्था ह्या स्वातंत्र्यावर टिकून आहेत व्यक्तीचे हित म्हणजेच पर्यायाने समाजाचे हित होय ही सृंखला येथूनच आरंभ होते.तिचा मुख्य उदेश न्याय प्रस्थापित करणे आहे. वा न्याय देखील आज महत्वाची बहुचर्चित संकल्पंना बनली आहे. प्रक्रियात्मक आणि वितरणात्मक न्यायाद्वारे सामाजिक न्यायाचे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे. यात सामाजिक न्याय मिळवण्यासाठी न्यायप्रक्रियेला बळकटी देण्यावर भर देण्यात आला असून न्यायाची प्रक्रिया निर्धारित करताना सामाजिक न्यायाच्या ध्येयाला प्राधान्य दिले आहे. रॉल्सने प्रक्रियात्मक न्याय हे सामाजिक न्यायाचे साधन बनवण्याचा प्रयत्न केला आहे, म्हणूनच रॉल्सने म्हटले आहे की, "समाजाची दुवा मजबूत करण्यासाठी, रॉल्सने त्याचा सर्वात कमकुवत दुवा शोधून पुन्हा पुन्हा मजबूत करण्याच्या प्रक्रियेचा अवलंब करण्यावर अधिक भर दिला आहे.

## आपली प्रगती तपासा

१. स्वातंत्र्य म्हणजे काय?

२. स्वातंत्र्याचे पैलू सांगा.

३. स्वातंत्र्याचे प्रकार स्पष्ट करा.

४. जे.एस मिल यांची स्वातंत्र्याची संकल्पना स्पष्ट करा.

५. जे.एस मिल यांच्या स्वातंत्र्याचे प्रकार सांगा.

६. जे.एस मिल यांची स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे परीक्षण करा.

७. न्याय म्हणजे काय?

८. न्यायचे पैलू कोणते आहेत?

९. न्यायाचे प्रकार सांगा.

१०. जॉन रॉल्स यांचा सामाजिक न्याय सांगा.

११. अज्ञानाचा पडदा काय आहे.

१२. मूळ स्थिती म्हणजे काय?

**अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :**


१. A. C. Kapur, Principles of Political Science, S. Chand Publication, New Delhi, 2014.

२. Andrew Heywood, Political Theory, An Introductin', Plagrave Macmillan, New York, 2004.

३. George H. Sebaine, Thomas L Thorson,A History of Political Theory, Oxford.1973.

४. Johari, J. C, 'Principle of Modern Political Science', Sterling Publications Pvt. Ltd., New Delhi, 2009.

५. माथूर प्रदीप,राजनीतिशास्त्र के सिद्धांत, इशिका पब्लिशिंग हाऊस, जयपूर, 2010.

६. शेंगार शैलेन्द्र,राजनीती विज्ञान के सिद्धांत, अटलांटिक पब्लिकेशन दिल्ली, 2008.

७. Johari, J. C, 'Political Science', Sterling Publications Pvt. Ltd., New Delhi, 2017.

८. दाधिच नरेश, समकालीन राजनीतिक सिद्धांत, रावत पब्लिकेशन, जयपूर, 2015.

९. अग्रवाल, आर सी, राजनीतिशास्त्र के मूल सिद्धांत, एस. चांद पब्लिकेशन, दिल्ली, 2005.

१०. वनारसे राजू,कांबळे सत्यपाल,राजकीय सिद्धांत आणि संकल्पना, विद्या बुक्स, औरंगाबाद, 2022.


❄❄❄❄❄❄❄

# ३

# क्रांती आणि धुरिणत्व
# (Revolution and Hegemony)

**घटक रचना**

३.१ उद्दिष्ट्ये

३.२ प्रस्तावना

३.३ क्रांती म्हणजे काय?

३.४ कार्ल मार्क्सप्रणित क्रांतीची संकल्पना

३.४.१ द्वंद्वात्मक भौतिकवाद

३.४.२ ऐतिहासिक भौतिकवाद

३.४.३ क्रांतीचा सिद्धांत

३.५ धुरिणत्व म्हणजे काय?

३.६ समारोप

३.७ सरावासाठी प्रश्न

३.८ संदर्भ

## ३.१ उद्दिष्ट्ये

- क्रांती म्हणजे काय हे समजून घेत कार्ल मार्क्सच्या क्रांतीविषयक सिद्धांताचे अध्ययन करणे
- धुरिणत्व ही संकल्पना अभ्यासणे

## ३.२ प्रस्तावना

क्रांती या संकल्पनेविषयी विविध लेखकांनी महत्वाची मते मांडली आहेत. मात्र जर्मन विचारवंत कार्ल मार्क्स याने केलेली क्रांतीविषयक चर्चा ही काहीशी व्यापक आणि टीकात्मक आहे. मार्क्सने ऐतिहासिक घटनांचा मागोवा घेत असतांना शास्त्रशुद्ध विश्लेषण केले असल्याने ही चर्चा समर्पक वाटते. प्रस्तुत प्रकरणात कार्ल मार्क्सच्या 'क्रांतीविषयक सिद्धांता'ची तसेच या सिद्धांताशी पुरक असलेल्या अंतोनियो ग्रामसीने मांडलेल्या 'धुरिणत्वाच्या सिद्धांता'ची चर्चा केली आहे.

## ३.३ क्रांती म्हणजे काय?

क्रांती म्हणजे 'प्रस्थापित व्यवस्थेचे उच्चाटन करीत सत्तेचे एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाकडे होणारे हस्तांतर होय'. क्रांतीतून होणाऱ्या या हस्तांतरात सामाजिक तसेच आर्थिक संबंधांत मुलगामी बदल होणे स्वाभाविक असते.

सॅम्युएल हंटींग्टन यांनी आपल्या Political Orders in Changing Societies या ग्रंथात नमूद केल्याप्रमाणे, 'राजकारणात नव्या घटाकांचे अत्याधिक वेगाने एकत्रीकरण होऊ लागत असतांन जेव्हा अशा एकत्रीकरणास वर्तमान संस्था पेलू शकत नाहीत तेव्हा क्रांती घडून येते.' हंटींग्टन यांनी मांडलेली क्रांतीची ही व्याख्या तिसऱ्या जगातील विकसनशील देशांना आधारभूत ठेवून मांडण्यात आली आहे. पश्चिमेकडील प्रस्थापित लोकशाही व्यवस्थेत जनसहभाग व्यापकतेने हाताळण्याची तसेच विरोधी- अभिजनांना सामावण्याची क्षमता असल्याने अशा व्यवस्थेत क्रांती होणे काहीसे कठीण असते असे हंटींग्टन यांना वाटते.

ए. एस. कोहान यांनी या Theories of Revolution: An Introduction ग्रंथात मांडलेल्या व्याख्येप्रमाणे, 'क्रांती ही विशिष्ट समाजात मर्यादीत कालावधीत वेगाने बदल घडवून आणणारी प्रक्रिया आहे. या बदलांमध्ये, १) अभिजनवर्गाच्या संरचनेतील बदल २) आधीच्या राजकिय संस्थांना नष्ट करीत नवीन/ इतर संस्थांची पायभरणी किंवा आहे त्या संस्थांच्या कार्यपद्धतीत बदल घडवून आणणे; ३) सामाजिक संरचनेत बदल घडवून आणत संसाधने तसेच उत्पन्नाचे फेरवितरण यांसारख्या घटकांचा समावेश असतो'.

## ३.४ कार्ल मार्क्सप्रणित क्रांतीची संकल्पना

आधुनिक जगाच्या इतिहासात कार्ल मार्क्सचे क्रांतीविषयक विचार महत्वाचे आहेत. कार्ल मार्क्सच्या मते, क्रांती ही इतिहासाचे वाहन असून त्याच्या विचारांवर फ्रेंच राज्यक्रांतीचा प्रभाव ठळक जाणवतो. त्याच्या मते, फ्रेंच राज्यक्रांतीतून पारंपारिक उमरावशाहीला शह प्राप्त होत नव्या सामाजिक संरचनेवर आधारित औद्योगिक व्यवस्था उदयास आली. सामाजिक प्रगतीसाठी दोन सामाजिक वर्गांत हिंसक मार्गाचा अवलंब अनिवार्य ठरतो हा विचार फ्रेंच क्रांतीद्वारे प्राप्त झाला.

मार्क्सच्या Critique of Political Economy (1859) या ग्रंथात नमूद केल्याप्रमाणे, सरंजामशाही, भांडवलशाही, समाजवाद यांसारखी उत्पादनाची नविन साधने ही वर्तमान व्यवस्थेतच दडलेली असतात. सामाजिक शक्ती आणि उत्पादनाचे सामाजिक संबंध यांच्यातअसलेला गतीरोध हा उत्पादनसाधनांत परिवर्तन घडवून आणतो. या परिवर्तनाचा परिणाम म्हणजेच क्रांती होय. कार्ल मार्क्सने प्रतिपादीत केलेली क्रांतीची संकल्पना ही वर्गसंघर्ष आणि नव्या युगाचे द्योतक आहे. समाजात अस्तित्वात असलेला प्रत्येक क्रांती-अनुकूल वर्गात आर्थिक आणि सामाजिक संघर्षामुळे नविन चेतना निर्माण होते. यामुळे क्रांती घडून येते आणि नव्या उत्पादनसंबंधावर आधारित नविन समाजरचना निर्माण होते. कार्ल मार्क्सची क्रांतीविषयक संकल्पना द्वंद्वात्मक भौतिकवाद आणि ऐतिहासिक भौतिकवाद या दोन घटकांवर आधारलेली आहे.

### ३.४.१ द्वंद्वात्मक भौतिकवाद (Dialectical Materialism)

कार्ल मार्क्सच्या क्रांतीविषयक विचाराची मुहूर्तमेढ त्याने मांडलेल्या द्वंद्वात्मक भौतिकवादावर झाली आहे. कार्ल मार्क्सच्या आधी जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल याने अमुर्त स्वरुपातील 'विचार' आणि 'चेतना' हे विश्वाचे सार असून सर्व ऐतिहासिक विकासांमागील शक्ती आहेत हा विचार मांडला होता. हेगेलने मांडलेला विचार हा आदर्शवादी असून विचार आणि चेतना हे नवनिर्मितीसाठी कारणीभूत असतात असे त्याला वाटे. कार्ल मार्क्सने हा विचार फेटाळला असून मुर्त आणि दृश्य अशा 'द्रव्यास' विश्वाचे सार मानत द्रव्य हेच विश्वातील बदलांचे कारक घटक आहेत हा युक्तिवाद मांडला. कार्ल मार्क्सचा विचार हा भौतिकवादी असून त्याने हेगेलच्या आदर्शवादी विचारांना आव्हान दिले.

सर्व प्रकारच्या नवनिर्मिती आणि बदलांमागे 'द्वंद्वाची प्रक्रिया' महत्वाची असून ही प्रक्रिया 'वाद X प्रतिवाद = सुसंवाद' (Thesis X Antithesis = Synthesis) या सुत्राच्या आधारे चालते. कोणत्याही पारंपारिक विचारांना (वाद) नविन विचार (प्रतिवाद) आव्हान देतात. या विचारांतूल द्वंद्वातून एक नविन विचार (सुसंवाद) जन्माला येतो. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास वर्तमान विचारांना नविन विचारांचे आव्हान प्राप्त झाले कि या संघर्षातून नविन विचार जन्माला येतो. ही प्रक्रिया अविरतपणे चालणारी असून यातून वैश्विक सत्य आणि सामाजिक बदल साधले जातात. कार्ल मार्क्सने 'सामाजिक संस्था' या जीवनातील 'भौतिक परिस्थितीं'च्या आधारे आकार घेत असून समाजातील 'उत्पादनाची साधने' (Modes of Production) ही भौतिक स्थिती ठरवतात असे म्हटले. सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी या सामाजिक संस्था महत्वाची भुमिका बजावतात.

### ३.४.२ ऐतिहासिक भौतिकवाद (Historical Materialism)

कार्ल मार्क्सने मांडलेला द्वंद्वात्मक भौतिकवाद हा मार्क्सवादाची 'वैचारिक' तर ऐतिहासिक भौतिकवाद 'अनुभवजन्य' चिकित्सा करतो. ऐतिहासिक भौतिकवाद हा सामाजिक आणि ऐतिहासिक बदलाची चर्चा करतो.

इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यात समाजातील 'आर्थिक संबंध' (Economic relations) हे समाजाच्या प्रगतीस त्याचप्रमाणे सामाजिक, राजकिय आणि वैचारिक संबंधाना आकार देतांना दिसतात. समाजाची उत्पत्ती ही 'आर्थिक उत्पादन' वाढवण्यासाठी झाली असून चांगला समाज हा आपल्या सदस्यांच्या गरजा पुर्ण करण्यावर भर देतो. मात्र, इतिहासात डोकावतांना आपणास असे दिसते कि, या गरजा पुर्ण करण्यास मर्यादा येऊ लागल्याने अंतर्गत तणाव निर्माण होऊ लागले. अशावेळी सामाजिक उत्पादनप्रक्रियेतील आपल्या गरजा भागवण्यासाठी व्यक्ती एकमेकांशी निश्चित संबंधांनी (जसे कि 'करार') जोडले गेलेले दिसतात.

'उत्पादन संबंध' (Relations of Production) हे 'भौतिक उत्पादक शक्ती' (Material Productive Forces) दर्शवणाऱ्या विकासाच्या टप्प्याशी मिळतेजुळते असतात. 'उत्पादन संबंधात' प्रामुख्याने 'उत्पादन साधनांची मालकी कोणाकडे आहे? (जसे कि; भांडवलदार)' याचे उत्तर सापडते. तर 'भौतिक उत्पादक शक्ती' म्हणजे उत्पादनाचे मार्ग (अवजारे, यंत्रे) आणि श्रमशक्ती (कौशल्य, ज्ञान इ.) यांचा अंतर्भाव होय. या सर्व 'उत्पादनसंबंधां'ची

गोळाबेरीज म्हणजे 'आर्थिक संरचना' (Economic Structure) होय. कार्ल मार्क्सने 'आर्थिक संरचने'स राजकिय, धार्मिक, वैधानिक अशा सर्व संरचनांचा 'पाया' (Base) मानले आहे. समाजातील 'उत्पादन साधने' (Modes of Production) ही अशा आर्थिक संरचनेचा अविभाज्य घटक असल्याने एक नविन 'व्यापक संरचना' (Superstructure) निर्माण होते ज्यात राजकारण, कायदा, धर्म आणि साहित्य ही उपांगे ठरतात. अशावेळी 'पाया'मध्ये झालेला बदल हा 'व्यापक संरचने'त बदल घडवून आणण्यास कारणीभूत ठरतो. कार्ल मार्क्सच्या 'क्रांतीविषयक विचारांची मांडणी या बदलाशी जोडलेली आहे' हे येथे लक्षात घेऊयात.

या पार्श्वभुमीवर 'उत्पादन साधनांत' बदल का घडून येतात? हे आधी समजून घेऊयात. विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर 'भौतिक उत्पादन शक्ती' आणि 'उत्पादन संबंध' यांचा परस्परांशी संघर्ष होऊ लागतो. इतिहासात पाहता 'उत्पादन संबंध' हे समाजातील वर्चस्ववादी गटाकडे राहिली असून श्रमशक्ती असलेला बहुसंख्य वर्ग हा या घटकावर अवलंबून राहिल्याचे दिसते. उत्पादनात वाढ करण्याच्या मानवी हव्यासामुळे उत्पादन शक्तीत बदल होत आहेत. औद्योगिकरण आणि वैज्ञानिक प्रगती यामुळे उत्पादनाच्या साधनांत सुधारणा होत असून मानवी श्रमांची आवश्यकता कमी होत आहे. परिणामी, 'भौतिक उत्पादन शक्ती' आणि 'उत्पादन संबंध' यांचा परस्परसंघर्ष प्रबळ होऊ लागतो. यातून नव्या व्यवस्थेची/ नव्या युगाची सुरवात होते (जसे कि, उत्पादन संबंध आणि उत्पादन शक्ती यांत बदल झाल्याने मध्ययुगीन युरोपातील 'सामंतशाही' नष्ट होऊन भांडवलशाहीचा उगम झाला).

ऐतिहासिक बदलाची हि प्रक्रिया द्वंद्वात्मक भौतिकवादावर बेतलेली असून आतापर्यंत आदिम समाज (उत्पादनाची साधने समुदायाच्या मालकीची), प्राचीन गुलामगिरीवर आधारित व्यवस्था (उत्पादनाची साधने मालकाकडे आणि श्रमिक वर्ग गुलाम), मध्ययुगीन सामंतशाही व्यवस्था (उत्पादनाची साधने सामंतांकडे व श्रमिक वर्ग कुळे) आणि आधुनिक भांडवलशाही व्यवस्था (उत्पादनाची साधने बुर्झ्वावर्गाकडे तर श्रमिक कामगार वर्ग) अशा चार टप्प्यांत ऐतिहासिक बदल झाला आहे. या उदाहरणांच्या माध्यमातून कार्ल मार्क्सने समाज हा दोन प्रमुख वर्गांत विभागलेला असून वर्गसंघर्ष अटळ आहे असा विचार मांडला.

### ३.४.३ क्रांतीचा सिद्धांत (Theory of Revolution)

कार्ल मार्क्सप्रणित क्रांतीची संकल्पना ही द्वंद्वात्मक भौतिकवादाचे विस्तारित रुप आहे. आधी नमूद केल्याप्रमाणे सामाजिक बदलासाठी 'वाद X प्रतिवाद = सुसंवाद' ही प्रक्रिया घडणे गरजेचे आहे. कोणत्याही समाजातील अंगभूत उत्पादन शक्ती अशा प्रक्रियेतून बदलाकडे वळतात. हा बदल वेगाने होत असल्याने त्याला क्रांतीचे स्वरुप प्राप्त होते. या क्रांतीतून समाजाची 'व्यापक संरचना' (Superstructure) बदलते आणि हा बदल पुढील काळात अशाच क्रांतीतून व्यापक संरचना हटवली जात नाही तोवर टिकून राहतो.

वर्तमान सामाजिक संबंध टिकवणारी काही नैतिक मुल्ये, विचार किंवा अभिवृत्ती सामाजिक विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर असतात. ही मुल्ये, विचार किंवा अभिवृत्ती राजकिय व्यवस्थेला अधिमान्यता (Legitimacy) देऊन स्थिरता प्रदान करीत असतात. त्यांना विशिष्ट विचारप्रणालीचा पाठिंबा असतो. विशेष म्हणजे समाजातील प्रभुत्वशाली वर्ग ही व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्नरत असतो. मात्र ही व्यवस्था नव्या उत्पादक शक्तीच्या

गरजा पुर्ण करु शकत नसल्याने अशा व्यवस्थेस विरोध होऊ लागतो. अशावेळी ही व्यवस्था आणि प्रभुत्वशाली वर्ग टिकून राहण्याचा प्रयत्न करतात. समाजातील दुसरा वर्ग अशावेळी क्रांतीच्या माध्यमातून आर्थिक पाया नष्ट करुन नविन व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न करीत असतो. ही अवस्था वर्गसंघर्षाची असून या अवस्थेतून सत्तेचे हस्तांतर होत असते.

आजवरच्या इतिहासात अनेकदा वर्गसंघर्ष होऊन सत्तेचे हस्तांतर झाले आहे. मात्र वर्तमानकाळातील बुर्झ्वा (भांडवलदार) आणि श्रमिक (कामगार) संघर्ष हा अद्वितीय असून यात अंतिम विजय श्रमिकांचाच होणार आहे असे कार्ल मार्क्सला वाटते. आजवर झालेल्या अन्य क्रांती या समाजातील संख्येने अल्प असलेल्या एका विशिष्ट वर्गाने सत्ता बळकावण्यासाठी केल्या आहेत. मात्र, श्रमिकांची क्रांती ही तुलनेने वेगळी असून तीत समाजातील बहुसंख्य वर्गाचा समावेश आहे. या क्रांतीचा उद्देश 'सत्ता बळकावणे' हा नसून 'शोषण संपवणे' आहे. यामुळे खाजगी संपत्ती ही संकल्पना संपुष्टात येणार असून उत्पादनाच्या साधनांचे समाजवादाच्या माध्यमातून सार्वजनिकरण होणार आहे. या क्रांतीतून तात्पुरत्या काळासाठी 'श्रमिकांची हुकूमशाही' (Dictatorship of Proletariat) निर्माण होणार असून त्यानंतर 'वर्गविहीन' तसेच 'राज्यविहीन' समाजाची निर्मीती केली जाईल असे मार्क्स म्हणतो.

रशियन नेता लेनिन याने आपल्या State and Revolution या ग्रंथात कार्ल मार्क्सच्या क्रांतीविषयक विचारात बदल केला असून त्याच्या मते, 'क्रांतीनंतर निर्माण होणारी समाजवादी व्यवस्था (Socialist System) ही अपुर्ण असून तिच्यात बुर्झ्वा यंत्रणेचे काही दोष राहतात'. अशावेळी समाजवादी व्यवस्थेत अनुकूल बदल घडवून आणणारी साम्यवादी व्यवस्था (Communist system) आणणे गरजेचे आहे.

लेनिनप्रमाणे चिनी नेता माओ झेडाँग याने मार्क्सच्या क्रांतीविषयक काही बदल सुचवले असून त्याच्या मते, 'वर्गसंघर्ष ही कधीही न संपणारी प्रक्रिया असल्याने साम्यवादाची स्थापना झाली म्हणजे वर्गसंघर्ष संपणार नाही'. यावर उपाय म्हणुन माओने 'चिरंतन क्रांती' (Permanent Revolution) हि संकल्पना मांडली आहे.

## ३.५ धुरिणत्व म्हणजे काय?

कार्ल मार्क्स याने द्वंद्वात्मक भौतिकवाद आणि ऐतिहासिक भौतिकवादाच्या विश्लेषणातून वर्गसंघर्षाचे चित्र उभे केले. कायदा, राजकारण, संस्कृती, कला आणि साहित्य आणि धर्म यांसारख्या घटकांपासून बनलेल्या 'व्यापक संरचने'वर (Superstructure) आर्थिक घटकांनी बनलेला 'पाया' (Base) प्रभाव पाडतो असे मार्क्सचे मत होते. त्यामुळे श्रमिकांनी 'पाया' बदलण्याचा प्रयत्न करीत क्रांती करावी जेणेकरुन व्यापक संरचनेत आपोआप बदल होईल असे मार्क्सला वाटते.

कार्ल मार्क्सच्या या विचारांना इटालियन अभ्यासक अंतोनियो ग्रामसी याने आव्हान दिले. ग्रामसी याने 'राज्यव्यवस्था ही व्यापक संरचनेचा भाग असून केवळ वर्गसंघर्षाच्या आधारे राज्यव्यवस्थेचे वर्णन करता येणे शक्य नाही' असे मत मांडत मार्क्सवादाची पुनर्मांडणी करण्याचा प्रयत्न केला. 'व्यापक संरचना' हि कमकुवत आहे किंवा ती सर्वस्वी 'पाया'वर अवलंबून आहे हा युक्तीवाद ग्रामसीने खोडून काढला. भांडवलशाहीत 'व्यापक संरचना' इतकी भक्कम असते कि, ती गरज पडल्यास 'पाया'लाही भक्कम करु शकते. व्यापक संरचना ही

पुर्णपणे पायावर अवलंबून नसून ती काही प्रमाणात स्वायत्त (Autonomus) असते. अशावेळी ग्रामसीने भांडवलशाहीचे विश्लेषण करण्यासाठी स्वतंत्र मार्क्सवादी प्रारुप विकसीत केले.

भांडवलशाही ही शिस्तबद्ध स्वरुपातील दमनकारी संरचनेच्या आधारे काम करीत असून ही दमनकारी संरचना (Structure of Domination) दोन घटकांपासून बनलेली आहे. यातील पहिला घटक म्हणजे अधिमान्यतेची संरचना (Structure of Legitimacy) तर दुसरा घटक म्हणजे धाकाची संरचना (Structure of Coercion) होय.

अधिमान्यतेच्या संरचनेतील महत्वाचा भाग म्हणजे नागरी समुदाय (ज्यात कुटूंब, शाळा, चर्च, शेजारी इ. घटकांचा समावेश होतो) होय. नागरी समुदाय हा पायाच्या सर्वात जवळचा घटक असून तो नागरिकांना सार्वजनिक जीवनाचे नियम आखून देतो तसेच नागरिकांनी शासक वर्गाप्रती आदर दर्शवण्याचे प्रशिक्षण देतो. यामुळे अधिमान्यतेची संरचना भांडवलशाही शासनास अधिमान्यता मिळवून देण्यात यशस्वी होते. परिणामी समाजघटकांवर होणाऱ्या कोणत्याही अन्यायाला न्यायाची झालर चढविण्यात भांडवलशाही यशस्वी होते. या प्रक्रियेतून भांडवलदार इतर घटकांवर आपले 'धुरिणत्व' (Hegemony) प्रस्थापित करतात.

'धुरिणत्व' ही संकल्पना ग्रिक भाषेतील Hegemonia या शब्दापासून निर्माण झाली असून त्याचा अर्थ 'नेतृत्व' असा होतो. एखाद्या व्यवस्थेचे इतर समाजघटकांवरील दमनकारी नियंत्रण म्हणजे 'धुरिणत्व' होय. सर्वसामान्य जनतेचा विश्वास संपादन करीत त्यांच्यावर नियंत्रण करण्यासाठी दमनकारी मार्गाला पर्याय म्हणुन निवडण्यात आलेली प्रभुत्वशाली वर्गाची क्षमता म्हणजे 'धुरिणत्व' होय. धुरिणत्व साधण्यासाठी बुझ्र्वा मुल्ये आणि विचारांचा प्रसार करण्यात येतो.

अधिमान्यतेच्या संरचनेप्रमाणे 'धाकाची संरचना' (Structure of Coercion) हा ग्राम्सकीच्या दमनकारी संरचनेचा दुसरा महत्वाचा भाग आहे. भांडवलदारवर्ग आपल्या स्थैर्यासाठी अधिमान्यता प्रदान करणाऱ्या वेगवेगळ्या घटकांवर अवलंबून असतो. जेव्हा नागरी समुदाय समाजातील असंतोष दुर करण्यात अपयशी ठरतो तेव्हा राजकिय यंत्रणा ही पोलिस, न्यायालये, तुरुंग यांसारख्या घटकांनी बनलेल्या 'धाकाच्या संरचने'चा आधार घेते.

## ३.६ समारोप

प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून आपण क्रांती ही संकल्पना अभ्यासली असून क्रांतीबाबत कार्ल मार्क्सने मांडलेली क्रांतिकारी भुमिका अभ्यासली. मार्क्सवादी सिद्धांताची पायाभरणी हेगेलच्या विचारांवर झाली असली तरीही कार्ल मार्क्सने भौतिकवादी विवेचन केंद्रस्थानी मानले. यातूनच द्वंद्वात्मक भौतिकवाद आणि ऐतिहासिक भौतिकवाद हे दोन सिद्धांत पुढे येतात. मार्क्सची क्रांती ही संकल्पना द्वंद्वात्मक भौतिकवाद, आणि ऐतिहासिक भौतिकवादाच्या अभ्यासाशिवाय समजून घेता येत नाही.

कार्ल मार्क्सच्या विचाराची प्रासंगिकता तपासत असतांना लेनिन आणि माओ यांच्याप्रमाणे अंतोनियो ग्रामसी याने महत्वाचे विश्लेषन केले. ग्रामसी याने मार्क्सवादी विचारातील पाया व व्यापक संरचना यांच्यातील द्वंद्व संपवून टाकत धुरिणत्व ही महत्वाची संकल्पना मांडली आहे.

## ३.७ सरावासाठी प्रश्न

- विविध व्याख्यांच्या आधारे क्रांती ही संकल्पना स्पष्ट करा
- कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाचे विवेचन करा
- कार्ल मार्क्सने मांडलेल्या क्रांतीच्या सिद्धांताची चर्चा करा

## ३.८ संदर्भ

१. Politics: Andrew Heywood, Palgrave Publication

२. Contemporary Political Theory: J. C. Johari Sterling Publication

❄❄❄❄❄❄❄

# स्त्रीवाद (Simon de Beauvoir) आणि बहुसंस्कृतिवाद (Will Kymlicka)

**घटक रचना**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन : स्त्रीवाद

४.४ सिमोन दि बोव्हूआर (१९०८-१९८६)

४.५ सेकण्ड सेक्स : परत्व

४.६ स्त्री जन्मात नाही, स्त्री घडवली जाते

४.७ टीका / मूल्यमापन

४.८ विषय विवेचन : बहुसंस्कृतिवाद

४.९ वील किमलिका

४.१० बहुसंस्कृतीवाद आणि गटांचे भिन्न हक्क

४.११ बहुसंस्कृतिवाद आणि पाश्चिमात्य राष्ट्रे

४.१२ बहुसंस्कृतीवादाची पीछेहाट ?

४.१३ बहुसंस्कृतिवाद नागरीकीकरण

४.१४ समालोचन

## ४.१ उद्दिष्टे :

(१) राजकीय विचार परंपरा या विषयातील स्त्रीवाद आणि बहुसंस्कृतीवाद या प्रामुख्याने विसाव्या शतकात प्रबळ बनलेल्या विचारसरणीच्या वाटचालीचा आढावा विद्यार्थ्यांना अभ्यासायला मिळतो.

(२) स्त्रीवाद विचारसरणीची दुसरी लाट आणि सिमोन द बोव्हूआरची मांडणी याच्यातील परस्परसंबंध समजून घेणे.

(३) स्त्रीवादी चळवळ आणि विचारसरणी यावरील सिमोन द बोव्हूआरचा प्रभाव व योगदान विद्यार्थ्यांना माहित करुण देणे.

(४) सिमोन द बोव्हूआरच्या स्त्रीवादी विचारांचा समकालीन स्त्रीवादी चळवळ आणि विचारविश्वावर पडलेला प्रभावाचे मूल्यमापन करणे.

(५) बहुसंस्कृतीवाद धोरणे आणि विचारसरणीचा उगम व विकास कसा झाला ते विद्यार्थ्यांना समजून देणे.

(६) बहुसंस्कृतीवादाच्या चर्चाविश्वात वील किमलिका यांचे योगदान विद्यार्थ्यांना माहित करुन देणे.

(७) वील किमलिका यांनी सांगितलेले बहुसंस्कृतीवाद धोरणाचे आणि विचारप्रवाहाचे टप्पे संदर्भासह विद्यार्थ्यांना समजून देणे.

(८) बहुसंस्कृतीवादासमोरील २१ व्या शतकातील आव्हानांचा आढावा व मूल्यमापन करणे.

## ४.२ प्रास्ताविक :

महायुद्धे, १९३० नंतर ओढावलेले जागतिक आर्थिक संकट, आशियाई व आफ्रिकी देशांच्या स्वातंत्र्यप्राप्तीचा काळ एकूणच १९६० पर्यंत स्त्रीवादी चळवळ काहीशी शांत होती. विसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळी वाढत्या औद्योगिकीकरणाशी संबंधित होत्या. समान कामासाठी समान वेतन, कामाच्या ठिकाणी समान वागणूक, बाळंतपणाची रजा इत्यादी बाबी या चळवळी हाताळत होत्या.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पर्यावरणवाद, स्त्रीवाद, बहुसंस्कृतीवाद अशा विचारसरणी जागतिक पटलावर समोर आल्या. या विचारसरणी आणि चळवळीनी ज्या प्रश्नांवर काम केले त्यांचे स्वरूप स्थानिक आणि जागतिक असे दोन्ही स्वरूपाचे होते. १९९० च्या दशकानंतर जागतिक पातळीवर स्थलांतराचा मुद्दा महत्वाचा बनला आहे. हा विविधतेचा प्रश्न सोडवण्यासाठी बहुसंस्कृतीवाद धोरण आणि विचारप्रवाह म्हणून महत्वाचा आहे हे वील किमलिका सातत्याने अधोरेखित करत आहेत. स्त्रीवादाच्या दुसऱ्या लाटेत सिमोन द बोव्हुआर यांच्या "द सेकंड सेक्स" या ग्रंथाचे योगदान महत्वाचे होते. त्याचा प्रभाव एकविसाव्या शतकातही अबाधित आहे.

## ४.३ विषय विवेचन : स्त्रीवाद

प्रथमदर्शनी स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांसंबंधीचा अभ्यास असे प्रवर्तित होते. स्त्रियांसंबंधीत सर्व बाबींचा समावेश सर्व समस्या व स्त्रियांच्या समग्र जीवनावर भाष्य स्त्रीवादात अपेक्षित धरले जाते. स्त्री-पुरुष यांच्यात जन्मतः भेद करणारी सामाजिक संस्था अस्तित्वात आहे; ही पितृसत्ताक समाज व्यवस्था लिंग भेदाची दरी आणखीनच खोल करत असते. याचा परिणाम होऊन स्त्रियांना दुय्यम व कनिष्ठ वागणूक दिली जाते, याउलट पितृसत्ताक व्यवस्था पुरुषांचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचा व टिकवण्याचा प्रयत्न करत असते. स्त्रीवाद पुरुषांना दोष देत नाही, तर विषमतेवर आधारित असणाऱ्या पुरुषसत्ताक व्यवस्थेला दोष देतो. पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळे पुरुष हा स्त्रीपेक्षा श्रेष्ठ आहे, स्त्री ही खालच्या स्तरावर आहे, आणि स्त्री हे पुरुषाच्या भोगाचे स्थान आहे, अशी शिकवण पुरुषांच्या मनात बिंबवली जाते. स्त्रियांना दुय्यमत्व देण्यामागे जी पितृसत्ताक व्यवस्था आहे, जे पुरुषी राजकारण आहे, त्याचा बीमोड करणे व स्त्री - पुरुष समानतेवर पर्यायाने लिंगभाव अधिष्ठित समनातेवर आधारित समाजरचना करणे ही स्त्रीवादाची मूळ उद्दिष्ट्ये आहेत.

पितृसत्ताक समाजव्यवस्था स्त्रियांना दुय्यम वागणूक देते. ही दुय्यम वागणूक अन्यायकारक असून ती केवळ जीवशास्त्रीय लिंगभेदावर आधारित आहे. प्राचीन काळापासूनच समाज

व्यवस्थेत लिंगभेद केला जातो. याच लिंगभेदावर आधारित श्रमाचे विभागणी देखील केली जाते. लिंगभेदानुसार स्त्रियांना व पुरुषांना विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या वाटून देण्यात आले आहेत. उदाहरणार्थ व्यवसाय, शेती, व्यापार इत्यादी कामे पुरुषांची; तर घरकाम, धार्मिक रुढींचे पालन, स्वयंपाक, अपत्य संगोपन इत्यादी कामे स्त्रियांची अशी विभागणी पितृसत्ताक समाज व्यवस्था करते.

स्त्रीवाद या शब्दाची व्युत्पत्ती लॅटिन भाषेतील 'फेमिना' (Femina) या शब्दापासून झालेली आहे. या शब्दाचा अर्थ स्त्री असा असून त्यापासून फेमिनिझम (Feminism) हा इंग्रजी शब्द बनला आहे. हा शब्द सर्वात प्रथम वापरल्याचा संदर्भ १ ८९५ मधील एलिस रॉसी यांच्या लिखाणात आढळतो.

**व्याख्या :**

"स्त्रीवर केवळ ती एक स्त्री आहे म्हणून लादलेल्या बंधनांपासून स्त्रियांची मुक्ती करणे म्हणजे स्त्रीवाद होय" अशी व्याख्या विद्या बाळ या स्त्रीवादी विदुषीने केली आहे. स्त्रीवाद स्त्रीवाद स्त्रियांना व पुरुषांना स्त्रियांवर त्या केवळ स्त्री असल्याचे कारण सांगून अन्याय होत असल्याची जाणीव करून देतो. तसेच त्या अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याची चौकट उभी करून देतो. थोडक्यात लिंगभावाधिष्ठीत भेदांना मूठमाती देऊन सर्वांना समान हक्क व समान संधी असतील अशा प्रकारची समाजरचना निर्माण करण्याचे उदात्त ध्येय स्त्रीवाद बाळगून आहे.

स्त्रीवादाची पहिली लाट एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू होऊन विसाव्या शतकाच्या सुरुवातीला संपते. या कालखंडात स्त्रीवादी चळवळीने स्त्रियांना मतदानाचे अधिकार मिळावेत, त्याचबरोबर घटस्फोट घेण्याचा कायदेशीर अधिकार मिळावा व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडू न शकणाऱ्या नवऱ्याला सोडून देण्याचा अधिकार यासंदर्भात काम केले. त्यात त्यांना यथोचित यश देखील प्राप्त झाले. या चळवळी प्रामुख्याने अमेरिका व इंग्लंड सारख्या प्रगत राष्ट्रात झाल्या.

स्त्रीवादाच्या दुसऱ्या लाटेत सिमोन द बोव्हुआरच्या "द सेकंड सेक्स" या ग्रंथाणे मोलाची भूमिका बजावली. सबंध स्त्रीवादी चळवळीत हा ग्रंथ मैलाचा दगड ठरला. स्त्रीवादाच्या जहालवादी दृष्टिकोनाचे सिद्धांकन या ग्रंथापासून सुरू होत असल्याचे मत शारवेट या स्त्रीवादी विदुषीने मांडले आहे. सिमोन द बोव्हुआरच्या एकूण स्त्रीवादी विचारव्यूहात या ग्रंथाचे अनन्यसाधारण स्थान आहे. सिमोन द बोव्हुआर ज्या कालावधीत विचार मांडत होती त्याकाळी अस्तित्वात असणाऱ्या स्त्रीवादी चळवळी स्त्रियांचे राजकीय हक्क, आर्थिक हक्क, मानसिक घालमेल यांवर काम करत होत्या. परंतु या सर्व प्रश्नांची उत्तरे स्त्रियांच्या दुय्यम सामजिक स्थानात आहेत हे कुणाच्या मांडणीत आले नव्हते.

## ४.४ सिमोन द बोव्हूआर (१९०८-१९८६) :

सिमोन द बोव्हूआरचा जन्म ९ जानेवारी १ ९०८ रोजी पॅरिस फ्रान्स येथे झाला. सिमोन फ्रेंच तत्त्वज्ञ व स्त्रीवादी चळवळीत अग्रेसर होत्या. त्यांची वाढ कॅथलिक कर्मठ कुटुंबात झाली. त्यांचे प्राथमिक शिक्षण कॉन्व्हेंट शाळेत झाले. वयाच्या चौदाव्या वर्षीपासून जगात घडणाऱ्या

विविध गोष्टींची त्यांनी आढावा घ्यायला सुरुवात केली. तेव्हापासून पुढे त्यांनी स्वतःला नास्तिक म्हणून घ्यायला सुरुवात केली. राजकीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासक असणाऱ्या सिमोन यांनी अस्तित्ववादाच्या तत्वज्ञानात मोलाची भर टाकली. त्यांच्यावर अस्तित्व वादाच्या तत्वज्ञानाचा खूप मोठा प्रभाव होता. १ ९४३ साली त्यांनी पहिली कादंबरी लिहिली. त्यानंतर अनेक कादंबऱ्या, प्रवासवर्णने, वैचारिक ग्रंथ आत्मचरित्रपर पुस्तके व लघु कथासंग्रह इत्यादी त्यांच्या नावावर आहेत. सोबतच नियतकालिकात त्या नियमित लेखन करीत असत. त्यांचे द सेकंड सेक्स पुस्तक हे एका नियतकालिकातीलच होते. हे पुस्तक दोन खंडात प्रकाशित झाले. पैकी पहिला खंड वास्तव आणि मिथके व दुसरा खंड आजचे स्त्री जीवन या नावांनी प्रकाशित झाला. या दोन्ही खंडांचे मिळून द सेकंड सेक्स नावाचा ग्रंथ निर्माण झाला. विवाह संस्थेवर अजिबात विश्वास नसणाऱ्या सिमोन समविचारी जॉ पॉल सार्त्र सोबत आयुष्यभर राहिल्या. ते दोघेही अविवाहित परंतु एकत्र राहिले. सार्त्र सोबत त्यांची बौद्धिके नेहमीचीच असत. माझे आयुष्य ही एक कथा आहे व ती मी मला हवी तशीच लिहीन असं सिमोन म्हणत असे.

सार्त्रच्या नियतकालिकात सिमोननं स्त्रियांविषयी लेखमाला सुरू केली. तिला प्रचंड प्रतिसाद मिळू लागला. पुढं जाऊन १ ९४९ साली त्याचं 'द सेकंड सेक्स' हे जागतिक विचारविश्वाला कलाटणी देणारं पुस्तक झालं. त्याचं १ ९५३ साली इंग्रजी भाषांतर झालं. सिमोनच्या अफाट बुद्धिमत्तेची, प्रचंड व्यासंगाची प्रचिती या पुस्तकातून येते. "पुरुषांच्या जगात चंचू प्रवेश करून स्वतःचे स्थान निर्माण करायचे असेल तर आतापर्यंत पुरुषाने स्त्रीला बहाल केलेल्या सर्व सवलतींवर पाणी सोडायला हवे. गेली अनेक शतके पुरुष स्त्रीला स्वतःच्या छत्राखाली ठेवून तिच्या उदरनिर्वाहाची काळजी वाहत आहे. तिचे संरक्षण करत आहे. त्यामुळे तिला कधी स्वतःच्या भौतिक गरजांची विवंचना करावी लागली नाही. पण स्वतंत्र स्वावलंबी व्हायचे तर स्वतःच्या गरजा एकटीच हिमतीवर भागवण्याची जबाबदारी शिरावर येऊन पडते." अशा परखड शब्दात स्त्रियांच्या मुक्तीचा मार्ग दाखवणाऱ्या सिमोन चा मृत्यू १ ४ एप्रिल १ ९८६ रोजी झाला.

**सिमोन द बोव्हूआर चे स्त्रीवादी विचार :**

सिमोन द बोव्हुआरची स्त्रीवादाची मांडणी तिच्यावरील अस्तित्ववादाच्या प्रभावातून आलेली आहे असे जाणवते. मानवाच्या जाणीवा या त्याच्या अस्तित्वाशी जोडलेल्या असतात. अस्तित्वजन्य मानवी जीवन आणि त्याच्या भोवतीची समाजव्यवस्था यांच्यामध्ये परस्परसंबंध असतात. द सेकण्ड सेक्स या ग्रंथात अस्तित्ववादाचाच विचार मांडलेला आहे. स्त्रियांच्या संदर्भात ही अस्तित्वावादाची मांडणी केली आहे. अस्तित्ववादाच्या आधारे तिने स्त्री – पुरुष सामाजिक भेद स्पष्ट केला आहे.

## ४.५ परत्व (Otherness) :

स्त्रियांमध्ये निर्माण केली जाणारी परत्वाची भावना ही संस्थात्मक असल्याचे सिमोन निदर्शनास आणून देते. आपण पुरुष नसल्यामुळे दुय्यम आहोत अशी सिग्मंड फ्रॉइड यांनी केलेली मांडणी पुढे घेऊन जातानाच सिमोन त्याचा संबंध लिंगाशी असून सत्ता या घटकांशी असल्याचेही प्रतिपादन करते. पुरुष म्हणजे बिनचूक मानव. या उलट स्त्री म्हणजे सदोष पुरुष.

पुरुष ही एक अटळ वस्तुस्थिती! स्त्री हे निव्वळ प्रासंगिक वास्तव! एक अपघात! असे सेंट थॉमसचे मत सिमोन खोडून काढते. तिच्या मते कुणीच पहिल्याप्रथम स्वतःला दुय्यम समजून दुसऱ्या व्यक्तीचे श्रेष्ठत्व स्वीकार करत नसतो. दुय्यम व्यक्तीला दुय्यमत्व दिले जाते, कारण कुणीतरी स्वतःला श्रेष्ठ ठरवण्यासाठी इतर लिंगाच्या व्यक्तींच्या जीवशास्त्रीय फरकाचा आयुध म्हणून वापर करत असतात. मानवाच्या अस्तित्वासाठी व प्रजोत्पादनासाठी पुरुषाइतकीच स्त्रियांची सुद्धा गरज आहे. त्यामुळे स्त्रियांना पुरुषांच्या इतकाच सामाजिक दर्जा मिळायला हवा. मनोविश्लेषण शास्त्राच्या दृष्टिकोनातून स्वतःच्या जगण्याला योग्य आकार द्यायचा असेल तर स्त्रीने स्त्रीसुलभ व तथाकथित पुरुषी दृष्टिकोन यामधून स्वतःला योग्य काय याचा नीट विचार केला पाहिजे. स्त्रीला आत्मनिर्भर व्हायचे असेल तर पुरुषातील सत्तेची ईर्षा आणि मालकी हक्काचे भावना कमी व्हायला हवी. पुरुषाला स्त्रियांना अंकित ठेवण्याचे फायदे माहित आहेत परंतु ज्या दिवशी पुरुषाला स्वतंत्र, सक्षम स्त्रीच्या सहवासाचे फायदे कळतील, त्या दिवशी तो तिच्यावरील पकड सैल करण्याचा विचार करू लागेल अशा प्रकारचा आशावाद सिमोन व्यक्त करते.

## ४.६ स्त्री जन्मत नाही, तर घडवली जाते :

सिमोन द बोव्हूआरच्या समग्र चिंतनात वरील वाक्य महत्त्वाचे ठरते. स्त्रीवादी चळवळीस नवे व अधिक भक्कम वैचारिक अधिष्ठान या सिद्धांकनामुळे प्राप्त झाले. स्त्रियांच्या दुर्बलता, असहायता व परावलंबित्व या दोषांची कारणे त्यांच्या जडणघडणीत असल्याचे प्रतिपादन सिमोन करते. मुलगा व मुलगी यांना भिन्न पद्धतीने वाढवले जाते. त्यांच्यावर भिन्न संस्कार केले जातात. मुलाला "मुलगा" म्हणून समाज काही विशिष्ट गोष्टी करण्यास प्रवृत्त करतो. तर याच जडणघडणीच्या काळात मुलीला "स्त्री" म्हणून काही गोष्टी करण्यास भाग पाडले जाते. या संगोपनात केल्या जाणाऱ्या भेदभावाचा स्त्री व पुरुष यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोलवर परिणाम होतो. त्याचीच परिणती पुरुषाची कर्तेपणावर आधारित, तर स्त्रियांची दुर्बल व पुरुषांवर अवलंबून अशी व्यक्तिमत्त्वे तयार होतात. बालपणापासूनच स्त्रीमध्ये अशी परावलंबित्वाची भावना तयार केली जाते. स्त्रीवर असहायता लादून तिच्या शारीरिक सौंदर्य व त्याग यांचे अवाजवी कौतुक केले जाते. बालपणापासूनच कुटुंब, धर्म, समाज, शिक्षण यांसारख्या संस्था तिला ठराविक साच्यात बसवण्याच्या कामी लागून जातात. त्याचा परिणाम होऊन स्त्रिया सर्वकालिक असहाय, परावलंबी व दुर्बल मानसिकतेत ढकलल्या जातात. पितृसत्ताक समाज व्यवस्था उपरोक्त घटकांच्या बाबतीत तत्पर दिसत असते. मात्र स्त्रीच्या बौद्धिक क्षमता, शारीरिक क्षमता, कर्तृत्व यांचा मात्र उपहास करते. ज्या प्रकारची सामाजिक विषमता स्त्रियांना भोगावी लागते त्याचा परिणाम म्हणून स्त्रिया मानसिक व बौद्धिकरित्या खचतात. स्त्रियांच्या आचरणातूनही या खचलेपणाचे अवशेष दिसू लागतात. तिच्या आचरणावरून तिची दुर्बलता व असहायता नैसर्गिक आहे असे वाटू लागते. याचे कारण पितृसत्ताक समाज व्यवस्था स्त्रियांची दिनचर्या ताब्यात ठेवते.

स्त्रीचे स्वयंपाकघर पण तिला संयम आणि स्वस्थ बसून वाट बघण्याचे धडे देते. स्त्रियांसाठी विशिष्ट खेळ, कामे, सवयी या सर्वांचे गौरवीकरण करून पितृसत्ताक समाज व्यवस्था स्त्रियांचे आचरण व विचार प्रक्रिया नियंत्रित करत असते. रोजचीच पण कंटाळवाणी, पुरुषांना पुरक व एकसुरी कामे स्त्रियांच्या वाटणीत ये. रांधा- वाढा- उष्टी काढा आणि त्यासोबतच अपत्य संगोपन यातच स्त्रियांचा संपूर्ण दिवस व्यतीत होत असेल तर स्व कर्तृत्वाने काहीतरी वेगळे व

भव्य करण्याचा विचारही त्यांच्या मनाला शिवत नाही. तसेही ही कामे शारीरिक श्रमाची असून त्यात बुद्धीचा कसं लागेल असे कोणतेही काम स्त्रियांवर पितृसत्ताक व्यवस्था सोपवत नाही. स्त्रियांचे आयुष्य निरस व चूल आणि मूल यांभोवतीच फिरणारे बनते ते यामुळेच, अशी सिमोन मांडणी करते. वरील सिद्धांकनास स्त्रियांच्या संदर्भातील अस्तित्ववादाचा सिद्धांत असे मानले जाते. व्यक्तीचे अस्तित्व हे त्याच्या शरीराबरोबरच मानसिक जाणिवेवर अवलंबून असते, हे अस्तित्ववादाचे मूलभूत गृहीतक आहे. या सिद्धांताच्या आधारे त्यांनी स्त्री-पुरुष यांच्यातील सामाजिक भेद स्पष्ट केला आहे. पूर्णार्थाने स्त्री म्हणून ओळखले जायचे असेल तर तिला स्त्रीत्व नावाचा एक गूढ गुणधर्म ही अंगी बाणवावा लागतो. स्त्रीला मिळणारे दुय्यम स्थान हे नैसर्गिक नसून ज्या प्रकारे तिला वाढवले जाते, तिच्यावर संस्कार केले जातात त्यातून ते निर्माण होते.

## ४.७ सिमोन द बोव्हुआरच्या स्त्रीवादी मांडणीवरील टीका :

सिमोन द बोव्हूआरच्या संपूर्ण विवेचनात समता अधिष्ठित समाज निर्मितीसाठी पुरुषांच्या भूमिकेत कशा पद्धतीने बदल व्हावेत याविषयीची पुरेशी स्पष्टता नाही. तसेच स्त्रियांनी कुटुंब, शृंगार, मातृत्व यांना दूर ठेवावे अशा पद्धतीची भूमिका सिमोन घेताना दिसते. टीकाकारांच्या मते कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि मातृत्व यांना दूर न ठेवता देखील सन्मानाचे व कर्तुत्वाचे आयुष्य जगता येणे शक्य आहे.

वरीलप्रमाणे सिमोन द बोव्हूआरच्या भूमिकेवर टीका होत असली तरीही तिच्या पूर्वी कोणत्याही विचारवंताने अशा प्रकारचे सिद्धांत मांडले नव्हते. स्त्रीत्व, मातृत्व, त्यागमुर्ती अशा निरर्थक गौरवपूर्ण उद्गारांनी स्त्रियांना तहहयात निरस व पुरुषांना पूरक अशी कामे करायला उद्युक्त केले गेले. सिमोन अशा सर्वांचा समाचार घेताना दिसते. स्त्रियांची मानसिकता बदलण्यात, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होण्यात, तसेच स्त्रियांचे स्त्रीत्व, त्यांचे कुटुंबातील स्थान, त्यांची पुनरुत्पादन क्षमता आणि त्याविषयी निर्णय घेण्याचा त्यांचा हक्क, कामाच्या ठिकाणी स्त्रियांचे होणारे शोषण अशा प्रश्नांविषयी जागरूकता निर्माण होण्यात सीमोन यांच्या द सेकंड सेक्स या पुस्तकाचे व त्यांच्या एकूणच स्त्रीवादी विचारांचे मोठे योगदान आहे; कारण स्त्रियांच्या सामाजिक दर्जाची इतकी सखोल कारणमीमांसा त्यांच्या पूर्वी कोणीही केली नव्हती. समस्त जगातील स्त्रिया व स्त्रीवादी विचारवंत यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवण्याचे काम या पुस्तकाने केले. सबंध जगातील स्त्रियांना खडबडून जागे करण्याचे काम या पुस्तकाने व सीमोनच्या विचारांनी केले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

## ४.८ विषय विवेचन : बहुसंस्कृतिवाद

विविधता, बहुलता आणि बहुसंस्कृतीवाद या एकमेकांशी संबंधित संकल्पना आहेत. बहुसंस्कृती या शब्दातच विविधता अंतर्भूत आहे. विविध संस्कृतींचे सहअस्तित्व असलेला समाज ही स्थिती सद्यकाळात जवळजवळ सर्वच देश-प्रदेशात दिसून येते. मानवी इतिहासातही एखाद्या प्रदेशातील समाजात विविधता असल्याचे स्पष्टपणे दिसते.

एकोणीसाव्या आणि विसाव्या शतकात राष्ट्रवादाची सुरुवात आणि प्रसार झाला. राष्ट्र म्हणजे 'एका प्रदेशात राहणारे एकाच वंशाचे किंवा धर्माचे, एकच भाषा बोलणारे, समान इतिहास असणारे लोक' ही राष्ट्रवादाची पाश्चिमात्य रूढ समज सुरुवातीपासून प्रचलित

असली तरी, सद्यकाळात बहुतांश राष्ट्रांत भाषा, धर्म, संस्कृती अशी विविधता आहे. बहुसंस्कृतीवाद असा जेव्हा उल्लेख होतो, तेव्हा या राजकीय संकल्पनेचा संबंध वैविध्यपूर्ण समूहांच्या, प्रामुख्याने अल्पसंख्यांक समूहांच्या हक्कांच्या जतनाशी असतो. एखाद्या प्रदेशातील किंवा राष्ट्रातील विविधतेला हाताळण्याचे दोन मार्ग पाश्चिमात्य राष्ट्रांत दिसून येतात. ते दोन मार्ग आहेत एकजिनसीकरण (Assimilation) आणि बहुसंस्कृतीवाद (Multiculturalism). एकजिनसीकरण प्रक्रियेत समाजातील विविधतेचा त्याग करुन त्या समाजाचे एकजिनसी अस्तित्व निर्माण करणे अभिप्रेत असते. बहुसंस्कृतीवादामध्ये सांस्कृतिक वेगळेपणा टिकवण्यासाठी प्रयत्न केला जातो.

बहुसंस्कृतीवाद ही एक विचारप्रणाली म्हणूनही कार्यरत असलेली दिसून येते. दुसऱ्या महायुद्धाच्या नंतर आणि प्रामुख्याने १९६०-७० च्या दशकापासून युरोपच्या किंवा पाश्चिमात्य राष्ट्रांच्या सार्वजनिक जीवनात आणि राजकीय व्यवस्थेमध्ये बहुसंस्कृतीवाद विचारसरणी आणि तिच्या धोरणांची चर्चा केंद्रभागी आली. उदारमतवाद व समुदायवाद या दोन विचारसरणीच्या दृष्टीतून मुख्यत: बहुसंस्कृतीवादाची चर्चा केली जाते. उदारमतवाद व्यक्तीच्या अधिकारांवर भर देतो तर समुदायवाद गटांच्या अधिकाराची चर्चा करतो. दुसऱ्या महायुद्धानंतर, १९४५ नंतर युरोपात मोठ्या प्रमाणात स्थलांतरे झाली आणि सांस्कृतिक विविधतेमध्ये वाढ झाली. तेव्हापासून बहुसंस्कृतीवादाची चर्चा सुरु झाली. पाश्चिमात्य बहुसंस्कृतीवादाच्या धोरणांची सुरुवात १९६०-७० च्या दशकापासून झाली.

## ४.९ वील किमलिका :

वील किमलिका हे कनेडियन तत्ववेत्ते आहेत. बहुसंस्कृतीवादावरील जागतिक स्तरावरील मोठे तत्ववेत्ते म्हणून वील किमलिका हे १९९० नंतर पुढे आले. कॅनडामधील ओटावा विद्यापीठातील तत्त्वज्ञान विभागात ते प्राध्यापक आहेत. आणि कॅनेडियन सेंटर फॉर फिलॉसॉफी अँड पब्लिक पॉलिसीचे ते संशोधन संचालक आहेत.

*वील किमलिका यांचे बहुसंस्कृतीवादावरील महत्वाचे ग्रंथ :*

Multicultural Citizenship (१ ९९५),

Finding Our Way: Rethinking Ethnocultural Relations in Canada (१ ९९८)

Politics in the Vernacular: Nationalism, Multiculturalism and Citizenship (२००१ ),

Multicultural Odysseys: Navigating the New International Politics of Diversity (२००७)

कॅनडा हा देश बहुसंस्कृतीवाद पुरस्कृत करणारा देश मानला जातो. कॅनडाची भाषिक, धार्मिक, वांशिक अशी वैविध्यपूर्ण समाजरचना पाहिली तर तिथल्या बहुसंस्कृतीवादाचे स्वरूप लक्षात येईल. कॅनडामध्ये मोठ्या प्रमाणावर झालेली स्थलांतरे हा तिथल्या विविधतेमागचा महत्वाचा घटक आहे. कॅनेडियन फिलॉसॉफर वील किमलिका यांनी १९९० च्या पासून कॅनडा, अमेरिका, युरोप याशिवाय जगभरातील सांस्कृतिक विविधता, बहुसंस्कृतीवाद यावर, आणि त्यासोबतच अल्पसंख्यांक व मूलनिवासी समुदायाचे हक्क या मुद्द्यांवर लेखन, विश्लेषण केले आहे. किमलिका बहुसंस्कृतीवादाचे १९९० पूर्वीचा

बहुसंस्कृतीवाद आणि १९९० नंतरचा बहुसंस्कृतीवाद असे दोन टप्पे करतात. त्यांच्या मते, १९९० पूर्वीच्या टप्प्यात पाश्चिमात्य राष्ट्रांत बहुसंस्कृतीवाद स्वीकाहार्य होता आणि त्यामागची भूमिका ही सामावून घेण्याची होती. तर, १९९० नंतर यात बदल होऊन ही भूमिका राष्ट्रवादी अस्मिता असणारी आणि बहुसंस्कृतीवादाची, विशेषतः स्थलांतरितांच्या प्रश्नांच्या संदर्भात टीका करणारी आहे. त्यामुळे बदलत्या एकविसाव्या शतकात बहुसंस्कृतीवादाचे स्वरूप कसे असायला पाहिजे या प्रश्नाबद्दल ते उहापोह करतात.

**वील किमलिका यांचे बहुसंस्कृतीवादावरील विचार :**

बहुसंस्कृतीवादाची मुख्यत: उदारमतवाद, बहुलवाद(Pluralism), समुदायवाद आणि कॉस्मोपोलीटन (विश्वबंधुत्व) अशा दृष्टीकोनातून मांडणी केली जाते. किमलिका हे उदारमतवादी प्रकारातील बहुसंस्कृतीवाद मांडतात. वील किमलिका यांनी अल्पसंख्यांक समूह, मूलनिवासी समुदाय आणि स्थलांतरित समूह असे तीन गट समोर ठेवून बहुसंस्कृतीवादासंदर्भात मांडणी केली आहे

## ४.१० बहुसंस्कृतीवाद आणि गटांचे भिन्न हक्क :

सांस्कृतिक विविधता हे समकालीन समाजाचे मुख्य वैशिष्ट्य बनले आहे. किमलिका अल्पसंख्यांक तसेच सांस्कृतिक विभिन्नता असणाऱ्या समूहांच्या सांस्कृतिक आणि त्याचबरोबर सामाजिक, राजकीय हक्कांची मांडणी करतात. गटांच्या भिन्न हक्कांची (group-differentiated rights) गरज ते अधोरेखित करतात. त्यांच्या मते, व्यक्तींच्या स्वायत्ततेसाठी याची आवश्यकता आहे. भाषिक, वांशिक-सांस्कृतिक आणि धार्मिक विविधतेचे संरक्षण करणे आणि प्रोत्साहन देण्यासाठी अल्पसंख्याक गट हक्कांना महत्व आहे.

किमलिका यांचा असा युक्तिवाद आहे की "उदारमतवादामध्ये व्यक्ती आणि समाज यांच्यातील संबंधांचा देखील विचार होत असतो. एखाद्या व्यक्तीच्या समुदायातील आणि संस्कृतीमधील सहभागाचा विचार उदारमतवादात केला जातो. त्यामुळे वील किमलिका बहुसांस्कृतिक नागरिकत्वाचा पाठपुरावा करताना असा युक्तिवाद करतात की समूहाचे हक्क (Group Rights) हे उदारमतवादी विचार परंपरेचा भाग आहेत. समूह हक्कांना उदारमतवादामध्ये स्वातंत्र्य आणि समानतेसाठी आवश्यक म्हणून पाहिले जाऊ शकते. अल्पसंख्यांक समूहांसाठी ते पुढील तीन प्रकारच्या हक्कांची आवश्यकता सांगतात.

१) **सांस्कृतिक हक्क** : यामुळे अल्पसंख्य समूह सार्वजनिक जीवनात त्यांचे सांस्कृतिक हक्क, स्वातंत्र्य याचा उपभोग घेऊ शकतील. याकरता बऱ्याच वेळेस सांस्कृतिक स्वातंत्र्यासाठी त्या देशातील प्रचलित कायदे, धोरणांपासून अशा समूहांना सवलत हवी असते. उदा. कॅनडा येथे शीख समूहाने हेल्मेट घालण्याच्या नियमापासून सवलतीची मागणी केली, ज्यामुळे त्यांना पगडी घालण्याचे स्वातंत्र्य मिळेल.

२) **स्वयं – शासनाचा हक्क** : एखाद्या देशातील ठराविक प्रदेशात जर एखाद्या अल्पसंख्य समूहाचे अनेक पिढ्यांपासून वास्तव्य असेल तर अशा वेळी त्या समुदायाकडून स्वयं – शासन हक्काची मागणी केली जाऊ शकते. उदा. वेल्स, आयरिश समूह.

३) **विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क :** या हक्काची आवश्यकता वंचित घटकांच्या सबलीकरणासाठी असते. भारतातील अनुसूचित जाती-जमातीचे हक्क या प्रकारात येतात.

## ४.११ बहुसंस्कृतिवाद आणि पाश्चिमात्य राष्ट्रे :

वील किमलिका यांनी युरोप किंवा पाश्चिमात्य राष्ट्रातील बहुसंस्कृतिवाद धोरणाचे दोन टप्पे सांगितले आहेत. १९६०-७० ते १९९० हा पहिला टप्पा आणि १९९० पासून पुढचा दुसरा टप्पा. राष्ट्रवाद केंद्रित विचारप्रवाह असणाऱ्या युरोपात दुसऱ्या महायुद्धानंतर विविधतेबाबत दृष्टीकोण बदलण्यास सुरुवात झाली. १९७० च्या दशकानंतरच्या पहिल्या टप्प्यात पाश्चिमात्य लोकशाही राष्ट्रांनी बहुसंस्कृतीवाद धोरणे आणि अल्पसंख्यांक अधिकार याच्या माध्यमातून विविधतेला मान्यता देणे, विविधतेचे सामीलीकरण करणे असे धोरण अवलंबवले असल्याचे स्पष्ट दिसते. या धोरणांना देशांतर्गत तसेच, आंतरराष्ट्रीय पातळीवर समर्थन मिळाले.

## ४.१२ बहुसंस्कृतीवादाची पीछेहाट ?

१९९० च्या दशकानंतर बहुसंस्कृतिवाद धोरणे आणि समर्थन याबाबतीत पाशिमात्य राष्ट्रांमध्ये माघार आलेली दिसते. राष्ट्रनिर्मिती, सामायिक मुल्ये व अस्मिता आणि एकात्म नागरिकत्व या गोष्टी पुन्हा सार्वजनिक विश्वात केंद्रस्थानी आल्या. विविधतेचे सामीलीकरण करण्याच्या धोरणाविषयी बहुसंख्य समूहामध्ये भीती निर्माण झाली. ही भीती देशीवादी (nativism) आणि लोकप्रिय राजकीय चळवळीच्या स्वरुपात प्रकट होताना दिसते. बहुसंस्कृतीवादाची जी विविध रूपे आहेत त्यापैकी काहींसमोर पीछेहाटीचे संकट दिसते. मूलनिवासी समुदाय, राष्ट्रीय अल्पसंख्य समुदाय यांच्या संदर्भात अशी पीछेहाट किंवा विरोध दिसून येत नाही. बहुसंस्कृतीवादाला होणारा हा विरोध मुख्यत: स्थलांतरित समूहांच्या संदर्भात केला जाणारा विरोध आहे. शिवाय, हा विरोध सरसकट सर्व पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये झालेला नाही. कॅनडा सारखे देश स्थलांतरितांच्या संदर्भात सामिलकीचे धोरण राबवत आहेत.

## ४.१३ बहुसंस्कृतिवाद नागरीकीकरण (Multicultural Citizenship) :

Multicultural Citizenship (१९९५) या ग्रंथात वील किमलिका बहुसंस्कृतीवाद नागरिकीकरण प्रक्रियेत कसा उपयुक्त ठरू शकतो याबद्दल लिहितात. बहुसांस्कृतिक नागरीकतेच्या पूर्वअटींमध्ये राज्य - अल्पसंख्य समूहांच्या संबंधांतील विश्वासार्हता (desecuritization), तसेच मानवी हक्कांच्या अस्तित्वाबद्दल व संरक्षणाबद्दल सर्वमान्यता या दोन बाबी महत्वपूर्ण आहेत.

**राज्य - अल्पसंख्य समूहांच्या संबंधांतील विश्वासार्हता (desecuritization) :**

राज्याला काही वेळ अशी भीती असते की अल्पसंख्य समूहाला विशेष हक्क व राजकीय सोयी दिल्या तर ते शेजारील शत्रू राष्ट्राशी सहकार्य करतील. दुसऱ्या महायुद्धापूर्वी डेन्मार्क व बेल्जियम या देशांना अशी भीती होती की तिथले जर्मन भाषिक नागरिक त्या देशांपेक्षा जर्मनीशी निष्ठा ठेवतील. आता पाश्चिमात्य लोकशाही राष्ट्रांमध्ये राष्ट्रीय अल्पसंख्य

समुदायाबद्दल हा भीतीचा मुद्दा राहिला नाही. मात्र, अरब व मुस्लीम स्थलांतरित नागरिकांकडे बघण्याचा हा दृष्टीकोण काही प्रमाणात अस्तित्वात आहे. इस्त्राइल मध्ये तुर्की आणि अरब अल्पसंख्य समुदायाकडे अशा पद्धतीने ते शत्रू राष्ट्राशी जवळीक ठेवतील अशा भीतीने काही प्रमाणात बघितले जाते. अशी परिस्थिती जिथे असते तिथे. राज्य – अल्पसंख्य समुदाय या संबंधांकडे, किंवा वांशिक संबंधांकडे राज्य सुरक्षेच्या (Securitization) दृष्टीने पाहिले जाते.

बहुतांश पाश्चिमात्य लोकशाही राष्ट्रांमध्ये राज्य – अल्पसंख्यांक संबंध हा विषय सुरक्षा मुद्द्यापासून बाहेर असलेला विषय आहे. हा विषय लोकशाही राजकीय प्रक्रियेचा भाग आहे. बहुसांस्कृतिक नागरीकरणाची ही एक महत्वाची पूर्वअट आहे.

**मानवी हक्कांच्या संरक्षणाबद्दल सर्वमान्यता (Human Rights Protection) :**

यामध्ये अल्पसंख्यांक समूहाला दिलेला स्वयं – शासनाच्या संस्थांमधील व्यक्तींच्या सुरक्षेचा मुद्दा येतो. पूर्वी या गोष्टीकडे उदारमतवादाशी विपरित राजकीय संस्कृती म्हणून पहिले जायचे. तिचं दृष्टी बर्याच वेळा सध्याच्या काळात स्थलांतरित समूहाबद्दल पाह्यला मिळते. अल्पसंख्य समूहाला विशेष तरतूद म्हणून दिलेली स्वयं – शासनाची व्यवस्था लोकशाही आणि मानवी हक्क यांच्याशी सुसंगतच आहे. आता याबाबत सर्वमान्यता तयार झाली आहे की अल्पसंख्यांक स्वयं शासन हे उदारमतवादी लोकशाही आणि घटनात्माकता यानुसार चालते.

वरील दोन पूर्वअटी जिथे अस्तित्वात नसतात तिथे बहुसंस्कृतीवादाचा उगम होण्याची शक्यात कमी आहे.

## ४.१४ समालोचन :

वील किमलिका राष्ट्रीय एकतेचे प्रगतीशील राजकीय संसाधन म्हणून महत्व अधोरेखित करतात.  स्थलांतर आणि बहुसांस्कृतिकतेच्या समेट कसा करता येईल यावर त्यांनी उहापोह केला आहे.

बहुसंस्कृतीवादाशी ते राष्ट्रीय व सामाजिक एकतेला सलग्न करतात. वांशिक-सांस्कृतिक अल्पसंख्यांकांच्या संदर्भात, किमलिका एक सामायिक नागरी ओळख निर्माण करण्याच्या दृष्टीने खूप आशावादी आहे. कॅनडासारख्या बहुराष्ट्रीय, बहुवंशीय राज्यात राष्ट्र राज्याशी संबंधित सामायिक ओळख विकसित करणे कठीण असू शकते असे किमलिकाने नमूद केले आहे. ते कॅनडामध्ये विविध सांस्कृतिक गट आणि विविध प्रकारचे सामजिक संबंध असलेल्या खोल वैविध्यपूर्ण परिस्थितीचा संदर्भ देतात. कोणताही जादुई उपाय किंवा राष्ट्रीय उद्दिष्टे ते सादर करत नाहीत. परंतु कॅनडा अबाधित, एकात्म राहायचा असेल तर आपल्याला सामायिक ओळखीची भावना विकसित करण्यासाठी काम करावे लागेल असा युक्तिवाद वील किमलिका करतात.

एकंदरीत, समकालीन जागतिक प्रश्नामध्ये स्थलांतरित समूह, आश्रयीत समूह यांचे प्रश्न कळीचे बनत चालले असताना बहुसंस्कृतीवादाची वादचर्चा महत्वाची ठरते. नागरिकत्व आणि त्याभोवतीचे  राजकीय विवाद यासंदर्भातही बहुसंस्कुतीवाद विचार आणि धोरणे यांची प्रासंगिकता आहे. उदारमतवाद, समुदायवाद, तसेच ऐतिहासिक अन्यायाचे परिमार्जन करणारा दृष्टीकोण अशा विविध परिप्रेक्ष्यातून साकल्याने या प्रश्नाचा अभ्यास झाला पाहिजे.

वील किमलिका देश – प्रदेशनिहाय सांस्कृतिक विविधता आणि त्यासंदर्भातील धोरणे या विभिन्न अनुभवांवर बोलत असले तरी, ते जागतिक पातळीवर यासंदर्भात एकमान्यता निर्माण करण्याच्या ध्येयाबाबत आशावादी आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्त्रीवाद व्याख्या आणि संकल्पना स्पष्ट करा.

२) स्त्रीवादाच्या लाटा म्हणजे काय ते सविस्तर स्पष्ट करा.

३) सिमोन द बोव्हुआरच्या स्त्रीवादी विचारांवर असलेला अस्तित्ववादाचा प्रभाव स्पष्ट करा.

४) सिमोन द बोव्हुआर ने स्पष्ट केलेला परत्व (Otnerness) आणि स्त्री अस्मिता / ओळख यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

५) 'स्त्री जन्मत नाही घडवली जाते' ही उक्ती विस्तृतपणे स्पष्ट करा.

६) बहुसंस्कृतीवादाचा उदय कसा झाला ते सांगा.

७) वील किमलिका यांनी बहुसंस्कृतीवादाच्या संदर्भात अल्पसंख्य घटकांचे कोणते अधिकार सांगितले आहेत?

८) बहुसंस्कृतीवादी नागरीकीकरणासाठी वील किमलिका यांनी कोणत्या पूर्वअटी सांगितल्या आहेत?

९) बहुसंस्कुतीवादाची पीछेहाट यासंदर्भातील विवाद स्पष्ट करा.

१०) २१ व्या शतकात बहुसंस्कृतीवादाची प्रासंगिकता याबद्दल टीप लिहा.

**अधिक वाचनासाठी उपयुक्त संदर्भग्रंथ सूची :**


1. The Second Sex (1949), Simon de Beauuvoir
2. संदर्भासह स्त्रीवाद, वंदना भागवत (संपा)
3. Multicultural Citizenship (1995), Will Kymlicka
4. International Approaches to Governing Ethnic Diversity (2015), Edited by Jane Boulden and Will Kymlicka
5. The Politics of Multiculturalism and Redistribution: Immigration, Accommodation and Solidarity in Diverse Democracies", Will Kymlicka, Keith Banting and Daniel Westlake, in Markus Crepaz (ed) Edward Elgar Handbook on Migration and Welfare (Elgar, 2022), 21 0-229

   "Minority Rights", Will Kymlicka, in Robyn Eckersley and Chris Brown (eds) Oxford Handbook of International Political Theory (Oxford University Press, 2018)


❄❄❄❄❄❄❄